म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. ३३९४.

IRBK-0103394
IRBK-0103394

२० (१)/ ५१० ग्रं०

11 MAY 1970 पुरवणी वाचनासाठीं मंजूर ३३९४.

‘ किशोर ’ प्रकाशन : १

# विजय

अनुक्रम
वि. भाग
क्रमांक
नों. दि.

विष्णु विनायक बोकील

वाचनालय शाखा
बा. क्र. ३३९४ नों. दि.

IRBK-0103394

IRBK-0103394

किं

— एकमेव विक्रेते —
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशिव, पुणें २.

— प्रकाशिका —
सौ. सुमति कुलकर्णी
किशोर प्रकाशन
४४० शनिवार, पुणें २.

— मुद्रक —
न. वि. सरदेशपांडे
आदर्श मुद्रणालय
३९५।५ सदाशिव, पुणें २.

(सर्व हक्क सुरक्षित)

प्रथमावृत्ति १९४८
द्वितीयावृत्ति १९४८
तृतीयावृत्ति १९५०

'लेखक' म्हणजे काय
याचा तिळमात्र बोध नाहीं
परंतु
'आमचे वडील लेखक आहेत'
असा विनाकारण अभिमान बाळगणाऱ्या
माझ्या
— रमेश, आशा आणि चंचल —
या चिमण्या पांखरांस
स्नेहपूर्वक अर्पण !

**वि. वि. बोकील**

लेखकाची ओळख

## श्री. विष्णु विनायक बोकील, बी. ए, बी. टी.

(जन्म १९०७)

कादंबरी, लघुकथा, नाटक, चित्रपटकथा इत्यादि वाङमयाच्या सर्व दालनांत यांनीं अप्रतिम यश मिळवलें आहे. विशेषत: बालवाङमयांत यांनीं आपल्या लेखणीच्या जादूनें स्वत:साठीं मानाचें स्थान निर्माण करून ठेवलें आहे. यांच्या 'वसंताच्या लीला' न आवडणारा मुलगा शोधून सांपडायचा नाहीं. यांच्या 'मीनाच्या गोष्टी' बालवाङमयांत अजोड ठरलेल्या आहेत.

श्री. बोकील हे पुणें येथें नूतन मराठी विद्यालय, हायस्कूल, या संस्थेंत गेलीं पंधरा वर्षें शिक्षकाचें काम करीत आहेत. ते एक निष्णात शिक्षक म्हणून बालांना प्रिय आहेत. शिवाय मानसशास्त्र जाणणारे म्हणून थोरांनाहि त्यांच्याविषयीं अतिशय आदर वाटतो. श्री. पंडित कुलकर्णी यांच्या संपादकत्वाखालीं पुणें येथें दरमहा मुलांसाठीं प्रसिद्ध होणाऱ्या 'किशोर' मासिकास त्यांचें बिनमोल सहाय्य होत असतें.

श्री. बोकील यांच्या कादंबऱ्या महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्या आहेत. 'द्वंद्व,' 'फोल आशा', 'मंगळागौरीच्या रात्रीं', 'सात पावलें', 'मायेची शाल' इत्यादि त्यांच्या कादंबऱ्या नांव घेण्यासारख्या आहेत.

श्री. बोकील अजून थांबले नाहींत. त्यांची लेखणी दुर्दम्य आत्मविश्वासानें वाङमयाच्या प्रांतांत स्वैरसंचार करीत आहे. मराठी वाङमयाचे चहाते त्यांच्या पुढील कृतींची आतुरतेनें वाट पहात आहेत.

# प्रस्तावना

कादंबरीला प्रस्तावनेचें शेपूट जोडण्याचा माझा शिरस्ता नाहीं. पण एक गंमत झाली—! अन् तो शिरस्ता मोड-ण्याचें ठरवलें—!

काय झालें—!

परवांचे दिवाळी अंक एका दुकानांत मांडून ठेवलेले होते. ऐन दिवाळीचे दिवस होते. गिऱ्हाइकांची ही गर्दी होती. चित्रें पाहून जिभल्या चाटीत उभे असलेले लोक त्या गर्दींत होते; दहा पांच अंक चाळून एखादा स्वस्तांतला अंक विकत घेणारे होते; सगळे अंक पाहून एकहि अंक न घेणारे देखील तेथें होते. म्हणजे नेहमींचाच हा प्रकार !

—पण त्या मंडळींत एक निराळ्याच थाटाचा अवलिया होता. तो करी काय—? तर एक अंक हातांत घेई. 'चित्र भिकार आहे.' ही त्याची टीका सुरू होई. नंतर लेखकांचीं नांवें तो वाचूं लागे. त्या त्या लेखकांच्याविषयीं या टीका-काराचे काय काय उद्गार बाहेर पडत तें सगळें कांहीं मला आठवणें शक्य नाहीं. पण—लेखकांच्या पश्चात् त्यांचे वाचक काय म्हणत असतात हें ऐकण्यासारखें असतें यांत संदेह नाहीं. मात्र तो लेखक गेंड्याचें कातडें पांघरून तेथें उभा असावा !

हो ! तेव्हां त्या गृहस्थानें दोन चार अंक पालथे घातले. दहा पांच लेखकांना लोळवलें—आणि एका मुलांच्या मासिकाजवळ येऊन तो ठेपला—!

'ही बच्चे लोकांची पंगत. अष्टवर्ग ! लंगोटी लावून वाचण्याचा हा अंक—'

—म्हणजे आंत डोकावून पाहण्याच्याहि आधीं ही टीका! हा आपला आदर्श टीकाकार!

—अगदीं हीच माझी तक्रार आहे !

—आणि म्हणूनच ही कादंबरी मी लिहिली आहे !

'मुलांसाठीं वाङमय' ह्याचा अर्थ काय? मोठ्या माणसांसाठीं जें वाङमय असतें तें कांहीं कारणामुळें मुलांनीं वाचूं नये असें आपण म्हणतों. तसें मुलांचें वाङमय मोठ्यांनीं वाचूं नये असा कांहीं कुणी दंडक घातलेला नाहीं.

मोठ्यांसाठीं लिहिलेल्या कादंबरींतून वसंतराव नायक असतो आणि लीलाबाई नायिका असतात—आणि त्यांचे लोकप्रिय खेळ कादंबरीभर चालू असतात. मुलांच्यासाठीं लिहिलेल्या कादंबरींत नायक वयानें लहान असतो. नायिका त्याची थोरली बहीण किंवा आई असेल. याहि कादंबरींत प्रेम आहेच. पण ह्या प्रेमाचा प्रकार निराळा आहे.

—पण सामान्य वाचकाला वसंतराव आणि लीलाबाई ही जोडी पाहिजे असते. आणि ती जोडी या मुलांच्या कादंबरींत दिसत नाहीं म्हणून तो नाकाचा शेंडा उडवतो आणि सर्वांना ऐकूं जाईल अशा आवाजांत म्हणतो—

"हँ:! लंगोटी लावून वाचण्याची ही कादंबरी!"

छे:! असल्या टीकाकाराचें समाधान करण्याच्या भानगडींत न पडणें उत्तम!

मी एक शिक्षक आहें. सुमारें अकरा वर्षे वयाच्या मुलांपासून ते सोळा वर्षे वयाच्या मुलांपर्यंत मानवी स्वभावाच्या छटान् छटा मला परिचित आहेत. गेलीं १६।१७ वर्षें मी या चिमुकल्या मेंदूंचें निरीक्षण अगदीं जवळून करीत आलों आहें.

फडके मुलांना आवडतात. खांडेकर आवडतात. साने-गुरुजी प्रिय आहेत. इतरहि कांहीं लेखक मुलांना कमी-अधिक प्रमाणांत आवडतात. कदाचित् मुलांचा मी शिक्षक असल्याकारणानें माझ्यावरहि ते लोभ दाखवतात.

पण फडक्यांचें वैशिष्टय मुलांना आकलन होत नाहीं. खांडेकरांचें मानव्य मुलांच्या आवाक्याबाहेरचें आहे. माड-खोलकरांचें राजकारण मुलांच्या मेंदूंत उतरत नाहीं. साने-गुरुजींच्या कादंबऱ्या वाचून मुलांचे डोळे पाणावलेले मी पाहतों--पण गुरुजींचा दिव्य संदेश मुलांच्या मनाची पक्कड घेऊं शकत नाहीं. मुलें वाचतात; पण तें केवळ गमतीचें वाचन ठरतें.

मुलांचा दोष नाहीं. त्यांच्यासाठीं तें वाङ्मय नाहीं.

फडक्यांचा सुधीर, सकीना--मुलांच्यासाठीं नाहींत!

--अनेक मुलें माझ्या भोंवतीं गोळा होत आणि म्हणत, "सर, आमन्ची एखादी कादंबरी लिहा कीं—"

"म्हणजे? त्यांत काय लिहूं—?" मी चेष्टेनें म्हणे!

"त्यांत क्रिकेट मॅच दाखवा, झालंच तर आम्ही मधल्या सुट्टींत सांखळी खेळतों तें--" माझ्या लक्षांत आलं.

लहान असतांना ज्या ज्या गोष्टी मी केल्या असतील त्या त्या गोष्टी मुलांना पाहिजे आहेत! कादंबरीचा नायक मुलगा पाहिजे--आणि तो अगदीं त्यांच्यासारखा पाहिजे. तो रुसला पाहिजे; त्यानं भांडलं पाहिजे; त्यानं मारामारी केली पाहिजे--त्यानं बक्षिसं मिळविलीं पाहिजेत; लहान-पणीं आपण जें केलं तें त्या बालनायकानें केलं पाहिजे--

--आणि म्हणूनच ही कादंबरी मीं लिहिली. मुलांना ही आवडली तर मी खचित धन्य होईन !

--पण म्हणून मोठ्या माणसांना यांत आवडण्यासारखें कांहींच नाहीं असें मी म्हणणार नाहीं ! कादंबरीचा नायक लहान असला तरी त्याची आई मोठी आहे. त्याचे वडील मोठे आहेत; इतर मोठीं माणसें असणारच कीं ! दृष्टिकोन निराळा असेल—परंतु गोष्टींत मोठीं माणसें येणारच कीं!

--एवढ्याचसाठीं मी म्हणतों कीं, ' मुलांसाठीं वाङ्मय ' हें लेबल पाहून दचकण्याचें कारण नाहीं. आणि आज आपण मोठीं माणसें असलों तरी पूर्वीं कधीं तरी लहान होतोंच कीं ! पुन:प्रत्ययाचा आनंद कांहीं थोडा नसतो !

—विष्णु विनायक बोकील

## — १ —

सहा पस्तीसची सकाळची मनमाड पॅसेंजर धाडधाड करीत निघून गेली. खिडकींत टांगून ठेवलेल्या पिंजऱ्यांतून पंखांचा फडफडाट झाला. 'विजय, ऊठ,' ही आवडत्या पोपटाची कर्कश हांक कानांवर पडतांच विजय डोळे चोळीत अंथरुणावर उठून बसला. चष्म्याच्या वर्तुळा-वरून पाहणाऱ्या आजोबांच्या वांकड्या मानेनें पोपटानें विजयकडे पिंजऱ्याच्या गजांतून वाकून पाहिलें. मनांत इच्छा असून विजय जागचा उठला नाहीं किंवा 'अरे लबाडा, आलो हं' असें ओरडत पिंजऱ्याच्या दिशेनें धांवत गेला नाहीं. पोपटानें पुन्हां एकदां साद घातली. विजयचें तोंड केंविलवाणें झालें. डोळे पाण्यानें भरून आले. दहा वर्षांच्या मुलानें रडणें चांगलें दिसत नाहीं ह्या आईच्या उपदेशाची त्याला आठवण झाली. आपलें रडें कुणाला दिसूं नये म्हणून त्यानें हाताच्या पंजानें डोळे कोरडे केले!

पण डोळे कोरडे केले म्हणून मनांतले कढ कांहीं एकाएकीं शांत होत नाहींत. नळाचें तोंड बंद केलें म्हणून काय धरणांतलें पाणी कधीं आटलें आहे? राहून राहून विजयला दुःखाचे उमाळे येतच होते. आज दुपारच्या गाडीनें त्याला वडिलांच्या बरोबर पुण्याला जावयाचें होतें. पुढील शिक्षणासाठीं त्याला थोरल्या वहिणीच्या घरीं या-पुढें रहावें लागणार होतें. येथलें सर्व वैभव सोडून त्याला

--आणि म्हणूनच ही कादंबरी मीं लिहिली. मुलांना ही आवडली तर मी खचित धन्य होईन!

--पण म्हणून मोठ्या माणसांना यांत आवडण्यासारखें कांहींच नाहीं असें मी म्हणणार नाहीं! कादंबरीचा नायक लहान असला तरी त्याची आई मोठी आहे. त्याचे वडील मोठे आहेत; इतर मोठीं माणसें असणारच कीं! दृष्टिकोन निराळा असेल—परंतु गोष्टींत मोठीं माणसें येणारच कीं!

--एवढ्याचसाठीं मी म्हणतों कीं, 'मुलांसाठीं वाङमय' हें लेबल पाहून दचकण्याचें कारण नाहीं. आणि आज आपण मोठीं माणसें असलों तरी पूर्वीं कधीं तरी लहान होतोंच कीं! पुन:प्रत्ययाचा आनंद कांहीं थोडा नसतो!

—विष्णु विनायक बोकील

— १ —

सहा पस्तीसची सकाळची मनमाड पॅसेंजर धाडधाड करीत निघून गेली. खिडकींत टांगून ठेवलेल्या पिंजऱ्यांतून पंखांचा फडफडाट झाला. 'विजय, ऊठ,' ही आवडत्या पोपटाची कर्कश हांक कानांवर पडतांच विजय डोळे चोळीत अंथरुणावर उठून बसला. चष्म्याच्या वर्तुळावरून पाहणाऱ्या आजोबांच्या वांकड्या मानेनें पोपटानें विजयकडे पिंजऱ्याच्या गजांतून वाकून पाहिलें. मनांत इच्छा असून विजय जागचा उठला नाही किंवा 'अरे लबाडा, आलो हं' असें ओरडत पिंजऱ्याच्या दिशेनें धांवत गेला नाहीं. पोपटानें पुन्हां एकदां साद घातली. विजयचें तोंड केंविलवाणें झालें. डोळे पाण्यानें भरून आले. दहा वर्षांच्या मुलानें रडणें चांगलें दिसत नाहीं ह्या आईच्या उपदेशाची त्याला आठवण झाली. आपलें रडें कुणाला दिसू नये म्हणून त्यानें हाताच्या पंजानें डोळे कोरडे केले !

पण डोळे कोरडे केले म्हणून मनांतले कढ कांहीं एकाएकीं शांत होत नाहींत. नळाचें तोंड बंद केलें म्हणून काय धरणांतलें पाणी कधीं आटलें आहे ? राहून राहून विजयला दुःखाचे उमाळे येतच होते. आज दुपारच्या गाडीनें त्याला वडिलांच्या बरोबर पुण्याला जावयाचें होतें. पुढील शिक्षणासाठीं त्याला थोरल्या वहिणीच्या घरीं यापुढें रहावें लागणार होतें. येथलें सर्व वैभव सोडून त्याला

दूरदूर, परक्यांच्या घरीं रहावें लागणार. परकेच नाहीं तर काय? दोन वर्षांपूर्वी त्याच्या बहिणीचें लग्न झालें आणि तिनें त्यानंतर आपल्या घरांत फक्त एकदोन वेळांच पाऊल टाकलें असेल आणि त्या त्या वेळीं तिच्या सहज बोलण्यांत आलेला ‘आमच्या घरीं’ ‘तुमच्या घरीं’ असला भेदभाव चाणाक्ष विजयच्या लक्षांत चटकन् आला. आणि त्या क्षणीं त्यानें मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली कीं, ताई आतां आपली नाहीं. तिच्यांत झालेला हा नवीन बदल त्याला उमगला नाहीं; पटला तर बिलकूल नाहीं. आईला त्यानें विचारलें पण आईचें उत्तर त्याला समजलें नाहीं. मुली लग्न झाल्यावर दुसऱ्याच्या होतात म्हणजे काय होतें तें खूप विचार करून देखील त्याच्या लक्षांत येईना. त्यानें तो नाद सोडून दिला.

त्या ताईच्या घरीं त्याला यापुढें राहावें लागणार! म्हणजे, विजय स्वत:शींच विचार करूं लागला : आपला पोपट आपल्याला हांका मारून उठवणार नाहीं. रोज सकाळ-संध्याकाळ स्टेशनच्या मोडक्या बांकावर बसून आगगाडी पाहयला मिळणार नाहीं. त्याला एकदम खांद्यावर उचलून घेऊन एंजिनामध्यें कोळशाच्या ढिगावर बसवणारा त्याचा आवडता पटेल ड्रायव्हर त्याला पुण्याला कसा दिसणार? सगळे गार्ड, ड्रायव्हर त्याचे दोस्त होते. कुणीं त्याला संत्रीं द्यावींत, कुणीं ‘झेल’ म्हणून म्हणत मोसुंबीं त्याच्या अंगावर हलकेच भिरकावून द्यावीं—तीं सर्व दोस्त राष्ट्रें, त्यांचीं तीं हिरवीं तांबडीं निशाणें, त्यांच्या त्या जादूच्या शिट्ट्या, त्यांचे ते हंसरे चेहेरे—या सर्व गोड गोष्टींना त्याला मुकावें लागणार. त्याचे वडील तंबाकू खात असत. तंबाकूची

गुळणी तोंडांत धरून ते तिकिटाचें कपाट उघडीत आणि तिकिटें द्यायला सुरुवात करीत. त्यांनीं बाजूस टाकलेल्या कपाटाच्या भल्या भक्कम किल्ल्या तो उचलून घेई व प्रत्येक किल्लींत तोंडानें वारा घालून इंजिनाची शिट्टी आपल्याला कशी जमेल तें पाहूं लागे. इकडे एका उभ्या यंत्रांत तिकीट घालून फट्फट् असा आवाज काढण्याचें वडिलांचें काम चालू असे. विजयला त्या यंत्राची फार गंमत वाटे. त्या आवाजासारखा आवाज तोंडानें काढण्याचा प्रयत्न तो करी. पण, वडिलांनीं 'गप रे' म्हणून खुणावलें कीं तो गाडी वळणांत आली कीं नाहीं हें पाहण्यासाठीं बाहेर पळून जाई.

रुळांतून येणारा खटखट आवाज ऐकून तो लंगड्या सदू पोर्टरला नेहमीं विचारी कीं 'हा आवाज कसला?' सदू तोंडांतली पिचकारी रुळावर शिताडून म्हणे, "तुम्ही लिवण शिका गुमान! उगा ह्येंच कशाला आन् त्येंच कशाला असा कशापायीं तरास घ्येतां?" आणि मग विजयला तो खांद्यावर उचलून घेई. एक जडसा गोळा अडकवलेलें कडें सदू हातांत घेई तेव्हां विजयला पुन्हां लहर येई.

"ही काठी कशाला—" त्याची शंका पुढें येई.

"ही काठी नव्हं! याला लाईण क्लीअर म्हणत्यात! ही काठी डरावर हातांत घ्येतो आन् रस्त्यांत दुसरं कुनी आलं तर त्याला झोडपून काढतो.—" सदू खोकत खोकत सांगू लागे.

"म्हणजे मनी चुलीवरचें दूध प्यायला लागली कीं आई तिला मारते—तसं?" विजय खांद्यावर आंठी चढवून म्हणे.

२९.७.५१ ९८०३ क्रमांक नों. दि. ११।७।५१

"अगं आक्षी वरुञ्जर! शंभर मार्क--"

सदू पोर्टर नेहमीं मार्कांची ही अशी उधळपट्टी करीत असे. कारण त्याच्या जन्मांत त्याला कोणत्याहि मास्तरानें दहापांच मार्कांपलीकडे जाऊं दिलें नसावें!

गाडी वळणांत आली म्हणजे एंजिन प्रथम दिसूं लागे. तें दिसल्याबरोबर ड्रायव्हर कोण असावा तें विजयला कसें कुणास ठाऊक, ताबडतोब समजे. एंजिनच्या आकारावरून आणि रंगावरून त्यानें कांहीं विशिष्ट आडाखे मनाशीं बांधून ठेवलेले असावे. गाडी दिसूं लागतांच तो सदूला ओरडून सांगे,-"फरामजी ड्रायव्हर—"

त्याला खिजवण्यासाठीं सदू मुद्दामच मान हलवून प्रत्युत्तर करी,-"अबदुल्ल्या--पैज आपली तुपली—"

साशंक मुद्रेनें परंतु जोरानें विजय विचारी, "ठरलं. लागली बीट. कशाची पण-"

आणि सदू हातांतलें हिरवें निशाण मोकळें सोडीत निर्विकार मुद्रेनें उत्तर करी—"पांढऱ्या कोंबडीची--"

यावर "शीः शीः शीः!" असे उद्गार काढीत, तोंड वांकडें करून विजय तेथून पळून जाई! विजयला कोंबडी म्हटलं कीं कमालीचा तिरस्कार वाटत असे. एवढा चांगला सदू पण कोंबडी कसा खातो हें कोडें विजयला कधींच सोडवतां आलें नाही. सदूची ही युक्ति होती. कामाच्या वेळीं विजय दूर जावा असें त्याला वाटलें म्हणजे तो पांढऱ्या कोंबडीची किंवा तिच्या अंड्याची पैज लावी आणि अपेक्षेप्रमाणें विजय दूर निघून जाई.

गाडी थांबल्यावर माणसांची धांवपळ सुरू होई. विजय कौतुकानें ती सारी गंमत पहात स्टेशनच्या मोडक्या बांकावर

उभा राही. बसून पाहिलें तर गंमत कमी होईल ही त्याला भीति वाटे. माणसं येतात, जातात; गाडी येते, थांबते आणि निघून जाते. विजयला मोठें आश्चर्य वाटे. "हीं माणसें येतात कुठून, जातात कुठें ? अन् कशाला—"

खण् खण् असा स्टेशनच्या खोलींतून येणारा आवाज ऐकून त्याला मोठी मौज वाटे. तर्कानें तो ओळखी कीं गाडी जाणार आतां. एक सुंदर स्वप्न नाहींसें होणार ! क्षणभर क्षणभरच त्याला वाटे कीं गाडींत जागा नसेल तर एंजिनच्या पुढच्या बाजूला कितीतरी जागा रिकामी आहे, त्या जागेवर आपली घरांतली लहानशी खुर्ची आहे ती सहज मावेल. बस्स् ! तिकीट नको, पास नको, कांहीं नको. एंजिनच्या पुढें बसावें, लाईन क्लिअरची काठी हातांत धरावी अन् वाटेंत कुणी आलें तर त्या काठीनें त्याला पिटाळून लावावें. गंमत होईल, नाहीं !

पण त्याच्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या एकाहि ड्रायव्हरनें त्याची ही इच्छा पुरी केली नाहीं. गाडी गेल्यावर स्टेशन भकास दिसूं लागे. खेळ खलास ! स्टेशनबाहेर पडणाऱ्या लोकांचीं तिकिटें गोळा करण्याचें काम त्याच्या वडिलांनाच करावें लागे. निदान हें काम तरी वडिलांनीं आपल्याला द्यावें ही त्याची रास्त मागणी होती. पण हेंहि सौख्य त्याला आजवर अनुभवायला मिळालें नाहीं.

'चला घरीं—' म्हणून तिकिटाचें कपाट बंद करून लठ्ठ किल्ल्यांचा जुडगा खिशांत टाकीत त्याचे वडील म्हणत. विजय वडिलांच्या पाठोपाठ घरीं जायला निघे. या वेळीं त्याला वडिलांचा भयंकर अभिमान वाटे. आपले वडील या स्टेशनाचे मालक आहेत. वाटेल तो ड्रायव्हर आला

तरी 'जाऊं का ?' म्हणून आपल्या वडिलांना विचारल्याशिवाय त्याला जातां यायचें नाहीं.

स्टेशनपासून घर लांब नव्हतें. प्लॅटफॉर्म संपला कीं त्यांच्या बंगल्याची बाग सुरूच. दीड मिनिटाची चाल. पण तेवढ्या अल्पावधींत शेंकडों विचार विजयच्या डोक्यांत विजेच्या वेगानें येऊन जात. एकदां त्याला वाटे, आपणहि वडिलांच्या प्रमाणें स्टेशनमास्तर व्हावें. पण पटेल, फरामजी, अब्दुल्ल्या ही मंडळी एंजिनांत चाक धरून बसलेली त्याला दिसली कीं वाटे, याच्यांतच खरी गंमत आहे. सदू पोर्टर सिग्नलचा दांडा ओढूं लागला किंवा गाडी सुटल्याची, आल्याची घंटा देऊं लागला कीं वाटे, याच्यांतहि काय कमी मौज आहे? रोज हे विचार त्याच्या मनांत येत आणि विरून जात.

वडील त्याला नेहमीं चेष्टेनें म्हणत, "विजय, तूं अन्नासाठीं दारोदारीं भीक मागणारा भिकारी झालास तरी चालेल मला; पण स्टेशनमास्तर कधींहि होऊं नकोस." मनांतल्या मनांत विजयला वडिलांच्या अज्ञानाची कींव येई! स्टेशनमास्तर होण्यांत किती मौज आहे हें आपल्या वडिलांना त्या जागेवर असून समजूं नये?

स्टेशनपासून एकदोन मैलांवर लहानसें खेडें होतें. मराठी चार इयत्तांपर्यंत शाळा त्या गांवांत होती. त्याच शाळेंत विजय मराठीचीं मूळाक्षरें शिकला. शाळेंत जाणें आणि येणें एवढ्या दोनच गोष्टी शाळेसंबंधींच्या त्याला फार आवडल्या. सदू नाहीं तर भिकाऱ्यांच्या डोक्यावरून त्याची ने-आण करण्यांत येई. भिकापेक्षां सदू त्याला फार आवडे. सदूच्या तोंडांतला पानाचा तोबरा खलास झाला म्हणजे

सदू बृहस्पतीचा काका होता. विजयला वाटे, सदूच मास्तर झाला असता तर? पण सदू जोरानें मान हलवून म्हणे, "नग बाबा! मास्तरची खड्ची आपल्याला नग. लिवणं अन् वाचून दावायचं आपल्या बाला सुधरायचं न्हाई! अन् गनितं मायंदळ करावीं लागत्यात त्येचं काय व्हं! 'अ' कामाला आला आन् 'ब' शीक पडला म्हून 'क' यावून आला तर संमद्याना किती दाम द्येवावा--? राम, राम, राम! मी तर अशा चुकारतट्टांना कामावरून फटक्यासरशीं काढून लावीन. विजयसाहाब, त्यें लिवणं पुसणं तुमचं काम; शिगनळी वढायचं काम आमचं."

भिका अबोल होता आणि कर्तव्यतत्पर होता. वाटेंत चिंचेचीं खूप झाडें होतीं. विजयनें त्याची करुणा भाकली तरी शाळेला उशीर होईल या सबबीवर त्यानें विजयला कधींही इकडे तिकडे होऊं दिलें नाहीं. वाटेंत भेटणाऱ्या प्रत्येक गाईला, तिच्या वासरांना, शेळ्यांना, कुत्र्यांना कडकडून भेटण्यासाठीं विजय चुळबूळ करी. पण सदूचा स्वभाव निराळा आणि भिकाचा पडला त्याच्या थेट उलट. भिकाचा एक गुण मात्र विजयला एकदम पसंत होता. तरुण असल्यामुळें त्याच्या अंगांत ताकद होती. पळण्याची इशारत देतांक्षणींच तो एंजिनासारखा धांवत सुटे. अशा रीतीनें खऱ्याखुऱ्या नाहीं तरी या काल्पनिक एंजिनावर बसण्याचें सौख्य विजयला अपूर्व वाटे.

पुण्याला गेल्यावर ह्या साऱ्या गोष्टींना तो आंचवणार होता. मोठें होणें म्हणजे असल्या गंमती नाहींशा होणें हाच जर अर्थ असेल तर विजय कायमचा लहान रहायला तयार होता. यावर त्याची आई म्हणे—

" विजय, कसं रे तुला कांहीं कळत नाहीं? अरे, मी लहान होतें—मी मोठी झालें—"

विजयला हा शोध विलक्षण वाटला. तो डोळे मोठे करून म्हणाला. " तूं लहान होतीस? सदूच्या मुलीसारखी परकर नेसत होतीस? खरंच सांगतेस मला–?"

" आतां तुला कसं सांगितलं म्हणजे खरं वाटेल? अरे, लहान मुलं मोठीं होतात. तूं सुद्धां मोठा होशील. मिशासुद्धां येतील—" हं! हें ठीक आहे. मिशांचा उल्लेख विजयला पसंत पडला. त्याच्या फरामजी ड्रायव्हरच्या लांबरुंद मिशा असत. त्या खऱ्या आहेत का खोट्या आहेत हें त्यानें अनेकवार ओढून पाहिलें होतें, लहान मुलांना भीति दाखवायला मक्याच्या कणसांचा तुरा घ्यावा न लागतां आपल्याला देखील भरपूर मिशा येतील हें आश्वासन त्याला आवडलें. पण मोठें व्हायचें म्हणजे पुण्याला जावें लागणार! आईला सोडून दूरदूर—!

आईला सोडून जाणें त्याला जिवावर आलें! रागाच्या भरांत किरकोळ ठेवून दिलेल्या चापट्या तो आज अजिबात विसरला. पण परवांच्या दिवशींच तिनें चाटून पुसून काढायला त्याच्या हवालीं केलेलें श्रीखंडाच्या वड्यांचें पातेलें तो इतक्यांत कसा विसरेल!

त्याचा पाठीवरचा भाऊ अजून पाळण्यांतच झोंपत असे. गेल्या महिन्यांतच त्याला तिसरें वर्ष लागलें. घरांत रात्रीं झाकपाक करण्याचे वेळीं आई विजयला साईचें पातेलें चाटून स्वच्छ करण्यासाठीं देई. घरांत सणानिमित्त लाडू झाले तर त्याचा भुगा विजयला प्रथम मिळत असे. हें सर्व त्याला सोडावें लागणार! मनी मांजरी तरी बरोबर घ्यावी

म्हणून त्यानें परोपरीनें आईची विनवणी केली. पण आईची त्यालाही तयारी नाहीं. काल रात्रीं झोपण्याच्या वेळीं तो आईच्या गळ्यांत दोन्ही हात टाकून म्हणाला होता, "मग आई, मला एकट्याला कां पुण्याला धाडतेस! मनीला शिकायला नको, पोपट अडाणी राहिला तर चालेल, सदूला तर एक अक्षर वाचतां येत नाहीं. मग मलाच शिकून काय करायचं आहे? मी सदूचं काम करीत राहीन. मग तर झालं कीं नाहीं--?"

पोराला पोटाशीं घेत मातामाउली सद्‌गदित आवाजानें म्हणाली होती, "विजय, तुला शिकलं पाहिजे. सदूचं काम त्याचा मुलगा करील. पण तुला खूप खूप शिकायचं आहे. उद्यां कांहीं वर्षांनीं आपला देश स्वतंत्र होणार आहे. थांब, मधेंच कांहीं विचारूं नकोस; ह्या स्वतंत्र देशांत तूं फार फार मोठा माणूस होणार आहेस; अन् मग तूं विमानांत बसून आपल्या वेड्या आईला भेटायला येशील. अन् मग सगळे लोक म्हणतील 'विजयमहाराज की जय!' अन् मग तुझी वेडी आई तुला निरांजनानं ओवाळील; 'औक्षवंता हो' म्हणून तुला आशीर्वाद देईल. अन् मग मला वाटेल कीं आपला विजय कित्ती कित्ती छान आहे! विजय, खरं सांग, मी तुला मनापासून आवडते नं--"

उत्तराऐवजी विजय तिला जास्तच बिलगला!

"मग तूं माझं ऐक. उद्यां रडायचं नाहीं. ह्यांच्या बरोबर पुण्याला ताईकडे जायचं, मन लावून अभ्यास करायचा. सुटी झाली कीं ह्यांना मी तुझ्याकडे धाडून देईन. सुट्टींत घरीं यायचं. मग फटाकडे आणायचे. घरांत करंजा,

लाडू–खूप खूप खाऊ करायचा. तूं रडला नाहींस तर मला फार फार आवडशील––"

आणि विजय झोपला तेव्हां त्याच्या गालावरचे ओघळ पुसतांना तिला स्वत:ला भडभडून आलेंच.

—विजयच्या मनांत आलें कीं आज उठूंच नये. आपग वेळेवर जागे झालों नाहीं तर गाडी निघून जाईल––पण एवढें कुठें होतें त्याचें नशीब शिकंदर ! कपबशांचा आवाज स्वयंपाकघरांतून येत होता आणि मधेंच आईनें हांक मारलेली त्याला ऐकूं आली. विजय उठला. आंतल्या बाजूस मंजुळा केरवारे करीत होती.

" उठला वाटतं माझा राजा––" म्हणून म्हणत तिनें विजयकडे प्रेमळपणानें पाहिलें. विजयनें तिच्याकडे डोळे भरून पाहिलें. आज मंजुळेला सोडून तो दूर जाणार होता· विजय आंत गेला. पाळण्यांत शांतपणें झोपलेल्या धाकट्या भावाकडे त्यानें पाहिलें. पण नेहमींप्रमाणें त्याच्याजवळ तो गेला नाहीं. झोपेंतल्या झोपेंत पिण्यासाठीं हालणारे विनूचे ओठ पाहून विजयला मोठी गंमत वाटे. पण आज त्याचें मन उदास झालें होतें.

त्याला नेणारी गाडी अकरा पंचावनला त्या स्टेशनवर येत असे. पांच दहा मिनिटें उशीर होणें अगदीं शक्य होतें. विजयच्या भोळ्या मनाला वाटलें आज गाडी खूप उशीरा यावी––किंवा येऊंच नये. पण त्याला अनुभवानें पटलें होतें कीं गाडी येणार. रोजच्याप्रमाणें आजही गाडी येणार आणि आपल्याला घेऊन ती जाणार. आईनें जेवण्याच्या वेळीं शेवटीं दहीभात कालवून दिला होता; गोड दहीं होतें, सायीचे तुकडे लांवून देखील दिसले असते. पण त्याला

एक घास गिळणें जड जाऊं लागलें. आईकडे न पाहतां तो तसाच धांवत मोरीवर हात धुण्यास गेला. अलिकडच्या स्टेशनाहून गाडी सुटण्याची घंटा झाली. घंटेच्या आवाजावरून विजयनें ताडलें कीं भिकाचें हें काम! इतक्या खणखणीतपणानें घंटा वाजायला भिकाचे लठ्ठ दंडच पाहिजेत. थोड्या वेळानें सदू आला. त्याचा भाऊ आला. मुलगी आली. मंजुळा आली. भिकाची आंधळी आईसुद्धां विजयला आशीर्वाद द्यायला आली.

विजयच्या सामानाच्या दोन कातडी बॅगा स्टेशनवर जाऊन पडल्या. दांतओठ चावून विजयनें रडण्याला बंधारा घातला. भोंवतालीं जमलेली सर्व मंडळी त्याच्याशीं बोलत होती; पण एकालाहि त्यानें शब्दानें उत्तर दिलें नाहीं. पायाशीं घोंटाळणाऱ्या मनी मांजरीला त्यानें आवेगानें वर उचलून घेतलें आणि तिच्या पाठीवर आपले गाल घासले. पोपटाच्या पिंजऱ्याजवळ तो गेला. मांजरी समोर दिसतांच शुकमहाराज संतप्त झाले. त्यांच्या समाधानासाठीं विजयनें मनीला खालीं सोडलें——आणि पिंजऱ्यांतल्या आजोबांकडे टक लावून पाहिलें. पोपटाची अर्थशून्य बडबड सुरू झाली——पण विजयला खांद्यावर उचलून नेण्यासाठीं सदूनें आपले दोन्ही हात पुढें केले.

विजयला पोहोंचवायला सबंध स्टेशन लोटलें होतें. कुणी त्याच्या हातावर कांहींतरी गोडधोड ठेवीत होते तर कुणी त्याच्या कोटाच्या खिशांत रुपया आठ आणे बळेंबळें कोंबीत होते. विजयच्या आईच्या नकाराला कुणी सुद्धां जुमानीत नव्हते. विजय कांहीं एक न बोलतां आईच्या कडेवर बसलेल्या विनूच्या पायाशीं खेळत उभा होता.

गाडीचें एंजिन वळणांत दिसूं लागलें--सदूनें संवयीप्रमाणें विजयला उद्देशून म्हटलें, "फरामजी बाबा—" विजयनें खिन्नपणानें मान हालवली. 'अबदुल्ल्या' ड्रायव्हर असल्याची त्याची खात्री होती. पण आव्हानाची भाषा आज त्याच्या तोंडून निघणें शक्य नव्हतें.

गाडी स्टेशनांत येऊन उभी राहिली. सेकंड क्लासच्या रिकाम्या डब्यांत विजय वडिलांच्या पाठोपाठ चढूं लागला. भिकानें त्याला अलगद वर उचलून ठेवलें. 'अबदुल्ल्या' मळकट विजारीला तेलकट हात पुशीत त्यांच्या डब्यासमोर येऊन उभा राहिला. "सलाम अलेकुम्--" बादशाहाला कुर्निसात करावा त्या थाटानें त्यानें विजयला अभिवादन केलें. विजयनें प्रत्युत्तर केलें नाहीं. तो वेड्यासारखा अबदुल्ल्याच्या तोंडाकडे पाहूं लागला! विजयच्या वडिलांशीं थोडा वेळ बोलणें झाल्यावर अबदुल्ल्या हंसत हंसत विजयला म्हणाला, "म्हणजे पुण्याला जाऊन तुम्ही आमचे साहेब होऊन येणार तर! बडी खुषीकी बात है। लेकिन हमारे लडके तो बिलकुल पागल है। विजयसाहाब, आप बडे हापिसर बन जाये तो—"

भिकानें घंटा बडवली आणि लाईन क्लिअरचें कडें ड्रायव्हरच्या हातांत आणून दिलें. अबदुल्ला इंजिनच्या दिशेनें चालूं लागला. विजयची आवड ध्यानांत येऊन तो जातां जातां मागें वळून पहात म्हणाला--"आरामसे बैठना, ऐसा जोरसे चलाऊंगा की देख रहे—"

एरव्हीं विजय आनंदानें नाचला असता. वाऱ्याच्या गतीनें गाडी धांवूं लागली म्हणजे विजयला कमालीचा आनंद वाटे. आजचा ड्रायव्हर याच कारणामुळें त्याला

अतिशय आवडत असे. पण आज गाडी जागची हालली नसती तरच त्याला आनंद वाटला असता. एंजिननें शिटी दिली. 'संभाळून जा हं–' म्हणून आईनें तोंड कसेंसेंच करून म्हटलें. मंजुळा वांकडी मान करून त्याच्याकडे टक लावून पाहूं लागली. विजयच्या डोळ्यांत पाणी सांचूं लागलें. आईनें आपल्या कमरेस खोवलेला रुमाल झटकन् उपसून काढला आणि विजयच्या हातांत मुकाट्यानें दिला.

गाडी चालू झाली. वळण संपेपर्यंत विजय दाराशीं उभा होता. विनू आईच्या कडेवर होता. आपण विनू असतों तर—? थोड्या वेळानें आई दिसेनाशी झाली. गाडी झपाट्यानें मार्ग आक्रमीत होती. विजयचे वडील चंची सोडून बसले होते. सुपारी कातरत कातरत ते विजयला म्हणाले, "दारांत उभा राहूं नकोस. इकडे येऊन बैस. डोळ्यांत कोळसा जाईल—"

अक्षर न बोलतां आईनें दिलेला रुमाल दांतानें घट्ट दाबून धरीत तो खिडकीशीं बसला. वडिलांबरोबर तो अनेक वेळां या रस्त्यानें आजवर आला–गेला होता. वाटेनें दिसणारीं झाडेंसुद्धां त्याच्या परिचयाचीं झालीं होतीं. समोर दूरवर दिसणारें खोपटें हरबाचें होतें. हरबाचा मुलगा विजयच्या वयाचा होता. पण शिकण्यासाठीं बापानें त्याला दूर पाठवायचें नाहीं असें ठरवलें होतें. विजयला वाटलें, आपल्या अण्णांना हरबा भेटला असता तर किती छान झालें असतें?

'भुताचा माळ' म्हणून त्या गांवांत प्रसिद्ध असलेलें टेकाड दिसेनासें झालें. विजयनें बाहेर पाहण्याचें सोडून दिलें. अण्णा खिडकीला टेकून बसलेले त्याला दिसले. त्यांनीं डोळे

मिटून घेतलेले होते. तरी त्यांना झोप लागलेली नाहीं हें त्यानें ओळखलें. विजय त्यांच्याकडे भीतभीत पाहात स्वत:शींच विचार करूं लागला. हा आपल्यावर जुलूम कां? अण्णा उद्यां परत येतील. विनू घरींच आहे. पण आपण मात्र दुसरीकडे राहयचं! कां म्हणून! आईनें त्याला खूप समजावून सांगितलें होतें तरी त्याला हें पटेना कीं शिकायला दूर जावें लागतें तर शिकायचें तरी कशाला! इंग्रजी येण्याची इतकी जरुरी आहे तर अण्णांनीं शिकवावें कीं! तेवढ्यासाठीं शाळेंत कशाला जायचें?

—आणि विनू या वेळीं चटईवर पडला असेल, पिंजऱ्यांतल्या पोपटाकडे तो पहात असेल. मनी त्याच्या पायाशीं अंगाचें कडबोळें करून डुर्डुर घोरत पडली असेल. अन् आई मंजुळेला धुण्याचे कपडे काढून देत असेल—! आईला आपली आठवण होत असेल का? आपण घरांत नाहीं हें पाहून तिला वाईट वाटत असेल का?

—आणि न कळत विजयच्या डोळ्यांतून अविरत अश्रु-प्रवाह चालू झाला. अशीच गाडींतून उडी टाकावी, पळत जाऊन आईच्या समोर उभें राहावें आणि तिच्या ओंच्यांत तोंड लपवून पोटभर रडावें असें त्याच्या वेड्या मनाला वाटूं लागलें. विजयनें चपापून रुमालानें डोळे पुसले. पण पाणी हटेना, अण्णांना आपलें रडणें समजूं नये म्हणून त्यानें तोंड फिरवलें—आणि—आणि रडतां रडतां झोंप केव्हां लागली हें त्याला समजलें नाहीं.

—तो जागा झाला तेव्हां गाडी पुण्याच्या भव्य स्टेशनांत शिरत होती. गाडी दौंडला आली केव्हां आणि पुण्याच्या रस्त्याला लागली केव्हां हें त्याला झोंपेंत समजून आलें नाहीं. त्याचा अब्दुल्लचा आतां दौंडला मागें राहिला.

त्याच्या ऐवजी कोणीतरी अनोळखी मनुष्य एंजिनवर चाक धरून बसला असेल. आणि एजिनहि निराळेच असणार!

"हं—उठा. विजयबापू, आपलं पुणं आलं–" म्हणून म्हणत अण्णांनीं चंची गुंडाळून खिशांत टाकली व ते जाग्यावरून उठले. जड अंतःकरणानें विजय गाडीतून खालीं उतरला! आई या वेळी काय—! मोठ्या प्रयासानें त्यानें तो विचार डोक्यांतून काढून टाकला. भोंवतालच्या माणसांची गर्दी टाळीत टाळीत तो वडिलांचे मागोमाग निघाला. ताईच्या लग्नासाठी हो यापूर्वी आला होता. त्यावेळीं त्यानें वडिलांना प्रश्न विचारून विचारून भंडावून सोडलें होतें. त्या वेळीं पुण्यास नुकतीच सुरू झालेली बसगाडी आपल्याला पाहिजे हा हट्ट धरून तो टांगा स्टँडजवळ हटून उभा राहिला होता. वडिलांनीं संतापून त्याचा कान धरला होता पण आईनें बोट धरतांक्षणींच निमूटपणें तो तिच्याबरोबर टांग्यांत चढून बसला. आज ती बसगाडी दिसली तरी त्यानें तोंडावाटे शब्द काढला नाही. डोक्यांत हजारों प्रश्न गर्दी करीत होते तरी त्यानें वडिलांना एकहि प्रश्न विचारला नाहीं. सकाळीं गाडींत बसतांना जें वादळ उठलें होतें त्याचा जोर थोडाबहुत ओसरला असला तरी अजून छातींत कांहींतरी चावत असल्याचा त्याला संशय येत होता. वडिलांच्याबरोबर तो टांग्यांत चढून बसला——! ताईचें घर येईपर्यंत तो रस्त्यांतली मौज पहात होता. ताईचें घर आलें. टांगा थांबला. दारांतून अंगण दिसत होतें. त्याची ताई अंगणांत दोरीवर कपडे वाळत घालीत होती.

"अग बाई, अण्णा अन् विजय——!" असे म्हणून ती लगबगीनें घरांत पळाली.

*

# — २ —

सासू, सासरा, नवरा, एक लहान दीर आणि परकरांतल्या दोन चिमुरड्या नणंदा एवढ्या घोळक्यांत सुनंदा संसार करीत होती. मुलाच्या लग्नांत मनाप्रमाणें मान पान झाले नाहींत म्हणून सासू कष्टी होती. तिला सुनेच्या भावाचें एवढें अगत्य असण्याचें काय कारण होतें? ओढगस्तीच्या संसाराला ठिगळें लावण्यासाठीं सरकारी नोकरींतून पेन्शन घेतल्यावरहि प्राथमिक शाळेंत पुन: नोकरीच्या खोड्यांत स्वत:ला अडकावून घेणारा सुनंदेचा सासरा घरांत कांहींहि पहात नसे. बाहेरचा ताप त्याला सहन करावा लागत होता तेवढा त्याला पुरून उरणारा होता. घरांत पुन्हां झवकड नको या विचारानें त्यानें पत्नीस एका अक्षरानें न विचारण्याचा निर्धार केला असावा. व्याह्यांचा मुलगा शिक्षणासाठीं आला म्हणून त्यांना त्याचा विशेष त्रास होण्याचें कारण नव्हतें. म्हणूनच त्यांनीं अण्णांच्या विनंतीला मान दिला. सुनंदेचा नवरा मातृभक्त होता. आणि दिवसा तो घरीं नसेच मुळीं. कलेक्टर कचेरींत मानेवर खडा ठेवून काम करतांना बिचाऱ्याचा जीव रंजीस येई. सुनंदेचा दीर आणि नणंदा कशीं होतीं तें विजयला पुढें अनुभवानें समजून आलें. आईच्या पदराआड इतके दिवस दडलेल्या मुलाला विरंगुळा वाटावा असें हें घर नव्हतें.

पण अण्णांनीं ठरवून टाकलें कीं यापुढें पोराच्या शिक्षणाची आबाळ करून चालणार नाहीं. आपण नोकरी-

निमित्त गांवोगांवीं हिंडणार, मुलाच्या शिक्षणाची हयगय करून कसें चालेल ? मुलीच्या सासऱ्याचा त्यांनीं सल्ला घेतला, सुनंदेच्या नवऱ्याला त्यांनीं विनंति केली–आणि विजयला पुण्याला व्याहयांच्या घरीं ठेवण्याचें ठरलें. विजयच्या आईला त्याची काळजी वाटत होती. दहा वर्षांचा पोरगा, आईला कधींहि सोडून न राहणारा मुलगा परक्या ठिकाणीं कसा रमेल ही चिंता तिला छळीत होती. पण विजयची आई फार शहाणी होती. कायमचें कल्याण होत असेल तर तात्पुरता त्रास सहन केला पाहिजे ह्या विचारानें तिनें आपलें दुःख गिळून टाकलें. मुलाला दूर ठेवूं नये असें प्रथम तिला वाटलें होतें–पण पोराला पोटाशीं धरलें तर त्याची वाढ खुंटते हें तिला पटलें. मांजरीचीं पिलें देखील फार हाताळलीं तर वाढीस लागत नाहींत; मोठ्या झाडाच्या सांवलीखालीं लहान रोपें जळून जातात लहान रोपें उन्हानें तापलीं पाहिजेत, पावसानें भिजलीं पाहिजेत, थंडीनें गारठलीं पाहिजेत–तरच तीं टिकतात, जोमानें वाढीस लागतात आणि अखेरीस त्याला फळेंफुलें येतात.

मोठ्या कष्टानें तिनें विजयला दूर ठेवण्यास परवानगी दिली. विजयची दुःखी कष्टी मुद्रा पाहून तिला भडभडून येत असे—पण तिनें स्वतःच्या मनावर कमालीचा ताबा ठेवला. विजयला घेऊन जाणारी गाडी दिसेनाशी झाल्यावर तिनें जो आकांत मांडला तो विजयला दिसला नाहीं हेंच बरें झालें. आपल्या काळजाचा तुकडा कोणीतरी निर्दयपणानें तोडून नेला आहे असें त्या माउलीला झालें. त्या दिवशीं तिला जेवण गेलें नाहीं, खावेंसें वाटलें नाहीं, प्यावेंसें वाटलें

नाहीं. घरांत करमेना, मन रमेना—कश्शांत लक्ष लागेना. घरांत उभें वारें सुटलें. विजयचें जुनें दप्तर पाहतांक्षणीच तिला रडूं कोसळलें. विजयची जुनी मोडकी छत्री, त्याचा फाटका सदरा, त्याचा अपरा कोट, त्याच्या खेळाची मोडकी ट्रंक–आई होणे म्हणजे केवढें पाप आहे हें तिला त्या दिवशीं पुरेपूर पटलें. विजयला यांतलें कांहीं कळलें नाहीं तेंच छान झालें.

विजयच्या आईनें मुलीला भेटून सर्व खुलासा यापूर्वीच केला होता. सुनंदा अल्लड होती. अजून तिला आईच्या हृदयाची कालवाकालव कशी होते याचा अनुभव नव्हता. माहेरून ती सासरीं गेली त्या दिवशी फक्त तिला थोडेसें चुकल्या चुकल्यासारखें झालें. परंतु मुली ज्या तत्परतेनें परिस्थितीशीं एकरूप होतात ती तत्परता मुलांच्या वांट्याला आलेली नाहीं. सुनंदा माहेर विसरली. सासरच्या सुखदुःखाशीं ती लवकरच एकतान झाली. तिला वाटलें, विजयहि तिच्याप्रमाणेंच एकदोन दिवस मनांत खट्ट होईल आणि नंतर विसरेल—

नव्या घरांतील पहिला दिवस विजयला अतिशय जड गेला. राहून राहून त्याला आईची आठवण होत होती. तहान लागली तर स्वतःच्या घरीं त्याला आईची परवानगी घेण्याची काय जरूरी होती? पण या घरांत त्याला ताई-जवळ पाणी मागावें लागलें. स्वतःच्या घरीं तो निःशंक मनानें वावरत असे, पण या ठिकाणीं तो दबून दबून वावरूं लागला. कपाटांत ठेवलेल्या पेंढा भरलेल्या सिंहाचें डोकें पाहण्याची त्याला इच्छा झाली. त्यानें कपाटाला हात लावलादेखील—पण सुनंदेच्या दिरानें त्याला वजावलें, "हात लावायचा

नाहीं. आमच्या घरांतल्या कोणत्याहि वस्तूला हात लावला तर आई रागावते. आधीं तिला विचारलं पाहिजे—!"

विजयनें विंचू डसल्याप्रमाणें वेगानें हात मागें घेतला. नकळत तो दोन घरांची तुलना करूं लागला. त्याच्या घरीं असले कायदेकानू मुळींच नव्हते. त्याच्या घरांत मुलांनीं जिनसा उचलून घ्याव्या, निरखून पाहाव्या, पाहतां पाहतां फुटल्या तर फारसा बोभाटा करूं नये, पुढच्या वेळीं जरा जपून पाहाव्या अशा तऱ्हेची दिलखुलास शिस्त होती. एकदां घरी त्यानें आईच्या फणी-कुंकवाच्या पेटीतला आरसा फोडला होता. आईचीं दोन उणीं उत्तरें त्याला ऐकून घ्यावीं लागलीच. पण आरसा कसा जपून घ्यावा हें शिक्षण त्याला आईनें दिलें.

या घरांत पोपट नाहीं, मनी मांजरी नाहीं, दूध देणारी म्हैस नाहीं—मग या ठिकाणीं करमावें तरी कसें? या घरांत मुलांनीं धांगडधिंगा करण्याची सोय नाही—, घराच्या मालकिणीचें डोकें उठण्याची भीति होती. वाड्यांत दहाबारा बिऱ्हाडें होतीं. अंगण सर्वांच्या उपयोगासाठीं होतें. पण बहुतेक घराच्या मालकांच्या मुलांनाच तें आंदण दिल्यासारखें होतें. अंगणांत बाग नव्हती, फुलझाडें नव्हतीं. प्रत्येक बिऱ्हाडाच्या दाराशीं कोळशाचें फाटकें पोतें आणि शेणाचे वाळवलेले गोळे. घराच्या भिंती अजून साफ आडव्या झाल्या नव्हत्या, पण केव्हां आडवें होतां येईल याची उत्सुकतेनें वाट पाहात त्या आला दिवस ढकलीत होत्या. प्रत्येक बिऱ्हाडाच्या दारांत एक अर्धवट पदर सुटलेली काथ्याची दोरी बांधलेली असे. तीवर फाटक्या कपड्यांच्या नक्षत्रमाळा लोंबत असत. घरांच्या भिंतींना गेल्या कित्येक वर्षांत रंग

ही चीज काय असते याचा पत्ता नव्हता. वाड्यांतले नळ गळके होते, मोऱ्या सदोदित तुंबलेल्या असत. मोरीवर मोलकरणी भांडीं घाशीत, आपटीत, फोडीत आणि एक-मेकींची वर्में काढून अष्टौप्रहर वर्दळीवर येत. हा वाड्याचा थाट असा होता.

घरांत चार दिवस राहिल्याशिवाय माणसांच्या स्वभावाची पारख होत नाहीं. अण्णा मधून मधून येत. चारदोन तास मुक्कामाला राहात आणि पुन्हां नोकरीवर रुजूं होण्यासाठीं धांवत पळत निघून जात. त्यांना वाटे, सुनंदाची सासू शिस्तीची आहे. त्यांना वाटे, सुनंदाचा दीर अबोल आहे. त्यांना वाटे, सुनंदाच्या नणंदा लाजाळू आहेत. सुनंदाचा नवरा अजून पोर आहे. आईच्या तंत्रानें वागण्यांत त्याचें कल्याण आहे असें त्यांना वाटे. व्याह्यांच्या विषयीं त्यांचें फार चांगलें मत होतें. म्हातारपणीं देखील कामाचा कंटाळा नाहीं असा हा तत्पर मनुष्य पाहून त्यांना कौतुक वाटे ! विजयला ह्या लोकांच्या सहवासांत ठेवल्यामुळें आपण कांहीं चूक करीत आहों असा त्यांना क्षणभरदेखील संदेह वाटला नाहीं. व्याह्यांचे हे उपकार फुकट घेण्याचा त्यांचा मानस नव्हता, उचलून पैसे देणें त्यांना शक्य होतें—पण व्याह्यांना पैसे देणें त्यांना चमत्कारिक वाटलें. विजयच्या शिवणाचा खर्च ते स्वत: येऊन जाऊन करणार होते आणि दर खेपेस मुलीच्या जवळ कोणास न सांगतां दहा रुपये, वीस रुपये देऊन फेड करीत जाण्याची त्यांची इच्छा होती. हो! शहरच्या माणसांना उगाच नसते खर्च काय म्हणून ? त्यांनीं तरी आपला मुलगा धर्मावर कां वाढवावा ? आणि आपण तरी त्यांचा धर्म पत्करण्याची लाचारी कां दाखवावी ?

सुनंदेची सासू अतिशय धोरणी होती. व्याहयांच्या पुढें बोलतांना ती साखर पेरी. आणि इतर कोणीहि आलें तरी तिची जीभ साखरेंत घोळलेली आणि तुपानें माखलेली असे. आतां आपले आयुष्यांत कांहीं उरलें नाहीं. पोराचें लागीं लागलें म्हणजे गंगेंत घोडें न्हायलें अशा तऱ्हेची तिची निरिच्छपणाची भाषा ऐकून विजयचे अण्णादेखील कौतुकानें मान डोलावीत आणि असली समंजस विहीण लाभल्याबद्दल स्वतःला कृतार्थ मानीत.

दाखवायचे दांत निराळे असतात आणि चावायचे दांत निराळे असतात हें सत्य पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. अण्णांच्या देखत सुनंदेच्या सासूनें—माईनें—विजयला पोटाशीं धरला, त्याच्या डोक्यावरून तिनें हात फिरवला आणि कानशिलावर बोटें मोडून प्रेमभरानें म्हटलें, " बहीण आहे त्याची. राहील बरं का, अण्णा; आमच्या घराचा गुण आहे. चार महिन्यांनीं त्याला सुट्टींत न्यायला आलांत तर सुखासुखी यायचा नाहीं तुमच्याबरोबर. पहाच तुम्ही!"

अण्णा मनांत आनंदून म्हणाले, "तुमच्या ओटींत त्याला घातला आहे. मुलगी तर आतां तुमचीच आहे. या मुलाची तुम्हीच धर्माची आई व्हा म्हणजे झालं. पोरगा थोडा आई–वेडा आहे म्हणून काळजी वाटते–"

" मग आतां सोडाच. मलाहि चार मुलं आहेत. तुम्ही पाहतांच आहां. पोरांत पोर काय जड आहे—?"

विजयला मोठ्या माणसांचें हें बोलणें ऐकू आलें पण त्यांतला फारच थोडा भाग त्याला समजला. त्याचें लक्षच नव्हतें. ' आई ' हा शब्द कुणी उच्चारला कीं त्याचा चेहरा कावराबावरा होई.

—दुसऱ्या दिवशीं सकाळीं अण्णांनीं विजयला शाळेंत नेलें. शाळेची तीन मजली प्रचंड दगडी इमारत पाहून त्याचा ऊर दडपून गेला. तेथील मुलांचा गोंगाट, धांवपळ, आरडाओरड हा प्रकार प्रत्यक्ष पाहिल्यावर आणि ऐकल्यावर प्रथम तो भांबावून गेला. त्याच्या गांवच्या शाळेंत तो राजा होता. खेडेगांवीं स्टेशनमास्तर ही सामान्य व्यक्ति समजण्यांत येत नसते. अर्थात् त्याच्या मुलालादेखील एक विशिष्ट दर्जा आपोआप चिकटतो. पण शहरच्या इंग्रजी शाळेंत कुठला आला आहे राजा अन् कुठला आला आहे प्रधान ! सर्वजण सारख्याच मापानें मोजले जाणार !

दुसऱ्या मजल्यावर मुख्याध्यापकांची कचेरी होती. दाराशींच खाकी रंगाचे गणवेष परिधान केलेले शाळेचे शिपाई मुलांच्या तक्रारी, सूचना, विनंत्या ऐकत उभे होते. एकादा बूटसूटवाला शिक्षक चष्म्याचीं वर्तुळें परीटघडी रुमालानें पुशीत येई, कुणाच्या तरी कानाशीं लागल्यासारखें करी आणि गडबडीनें निघून जाई. कोणी कुणाचा नाहीं. जो तो आपण बरें आणि आपलें काम बरें अशा थाटानें येत होता आणि जात होता. वडिलांचें बोट धरून गोंधळलेल्या मुद्रेनें विजय दाराशींच उभा होता. त्यांना कोणी विचारलें नाहीं, पुसलें नाहीं. मुख्याध्यापक अजून आले नव्हते. ते येईपर्यंत थांबा असें एका अक्कडबाज मिशावाल्या शिपायानें उत्तर केलें आणि आपला संबंध सुटला असें समजून तो कामाला निघून गेला. शाळा सुरू होण्यास अजून दहा पंधरा मिनिटें अवकाश होता.

कठड्याला धरून विजय मुलांच्या खेळण्याची गंमत पाहूं लागला. त्याच्या वयाचीं खूप मुलें हातांत हात अडकवून

सांखळीचा खेळ खेळत होतीं. उन्हानें आणि धांवण्याच्या श्रमानें त्यांचे चेहरे लालबुंद पडले होते. त्यांच्या अंगांतले शर्ट घामानें चिंब झाले होते. एका मुलाचे केस सारखे कपाळावर सरकत होते. ते डाव्या हातानें मागें झटकल्या-सारखें करून तो 'आला ऽ ऽ रे' अशी आरोळी ठोकीत धूम पळूं लागे. विजयच्याच वयाचा तो मुलगा होता. विजय क्षणभर स्वत:ला विसरून गेला. त्या मुलाचें नांव आपल्याला कळावें असें त्याला वाटूं लागलें. इतक्यांत कोणीतरी 'दाते' म्हणून ओरडलें. तो मुलगा धांवतां धांवतां थांबला! त्या मुलाचें नांव कळल्यानें विजयला समाधान वाटलें. का कुणास ठाऊक दातेविषयीं त्याच्या मनांत सूक्ष्म अशी आपुलकीची भावना निर्माण झाली.

इतक्यांत त्याच्या पाठीवर कुणीतरी हात ठेवल्याचा त्याला भास झाला. खरोखरीच त्याच्या पाठीवर एका पोक्त अशा व्यक्तीनें हात ठेवला होता. "काय पाहिजे बाळ, तुला?" म्हणून त्या गृहस्थांनीं खालीं वांकून प्रेमळपणानें विचारलें. विजयला तो स्पर्श परिचित वाटला. तो आवाज त्याच्या कानांत भरून राहिला. अगदीं थेट असेंच आई त्याला म्हणाली असती!

विजयच्या ऐवजीं अण्णांनीं पुढें होऊन खुलासा केला. उपरिनिर्दिष्ट गृहस्थ हातांतल्या पुस्तकांची चाळवाचाळव करीत म्हणाले, "होय का? युवराजांना दाखल करण्या-साठीं आलांत? ठीक आहे. मी या शाळेंत शिक्षक आहें. माझं नांव कोकीळ. तुम्ही आंत बसा थोडा वेळ. मुख्याध्यापक येतीलच आतां. बहुतेक वेळ झालाच आहे. चला, मी तुम्हांला त्यांच्या खोलींत बसवतों—" इतकें बोलून त्यांनीं

विजयचा हात धरला आणि बापलेकाला आंतल्या खोलींत नेऊन बसवलें.

घंटेच्या घणघणाटासरशीं चौकांतला गोंगाट ओसरूं लागला. विजय खिडकींतून बाहेर पाहूं लागला. मघाचा दाते नांवाचा मुलगा एक एक पायरी वगळून हरणाच्या गतीनें जिना वर चढून येतांना त्याला दिसला. तो सरळ आंत आला. कोकिळांच्या मागच्या बाजूस उभा राहून तो हलकेच म्हणाला, " सर, तुमचा पहिला तास आहे आमच्या वर्गा-वर—" आणि खिडकीशेजारीं उभ्या असलेल्या विजयकडे त्यानें सहज पाहिलें. विजयनें त्याच्याकडे उलट पाहिलें. एक शब्दहि उच्चारला गेला नाहीं. पण पुढें निर्माण होणाऱ्या स्नेहसंबंधाची पहिली सलामी दोघांच्याहि नजरेनें पुरेपूर दिली होती.

कोकीळ निघून गेले. त्यांच्या पाठोपाठ तो मुलगाहि कपाळावरचे केस मागें सारीत निघून गेला. नंतर त्यांना फार वेळ वाट पहावी लागली नाहीं. नखशिखान्त खादी पेहेरलेले, परंतु पाश्चिमात्य पद्धतीचा पोषाक केलेले गृहस्थ धीरगंभीर पावलें टाकीत खोलींत शिरले. मुख्याध्यापक ते हेच असावे असें त्यांच्या रुबाबावरून विजयनें ताडलें. गृहस्थ रुबाबदार होते यांत शंकाच नाहीं. डोळ्यांना जाड भिंगांचा चष्मा, दाभणकाठीं कोरलेल्या मिशा, ढगळ कोट आणि अघळपघळ विजार असें हें त्यांचें थोडक्यांत स्वरूप होतें. चेहरा धीरगंभीर, पण डोळे मिस्कील; देह उंचापुरा आणि मनाची उंची त्याहीपेक्षां दोनचार बोटें जास्तच पण कमी नाहीं. भव्य छाती आणि त्यांत तितकेच भव्य विचार. असा हा मुख्याध्यापक त्या शाळेच्या

भव्यपणाला साजेसा होता, कीं शाळा त्यांच्या भव्यपणाला साजेशी होती हें झटकन् सांगतां आलें नसतें. अण्णांनीं जागचे उठून त्यांना नमस्कार केला; न कळत विजयचेहि दोन्ही हात जोडले गेले.

टेबलावर पत्रांचा ढिगारा पडला होता, तरी मुख्याध्यापकांनीं प्रथम त्यांच्या कामाची चौकशी केली. अण्णांच्या आगमनाचा हेतु कळतांच त्यांनीं आपल्या डोक्याच्या मागल्या बाजूला हात लावला आणि काळजीच्या सुरांत म्हटलें—

"पहिलींत जागा नसेल असं मला वाटतं आहे. तरीपण तुम्ही परगांवाहून आलां आहांत. तुमची निराशा मी करणार नाहीं. हा तुमचा मुलगा का? चुणचुणीत दिसतो आहे. काय रे बाळ, तुझं नांव काय--?"

विजय त्यांच्या चष्म्याकडे पाहात उत्तरला, "विजय-"

"ठीक; नांवाप्रमाणें तुझा विजय झालाच पाहिजे—"

विजयला शिपायानें वर्गांत नेऊन बसवलें. वर्गांत पाऊल टाकतांना अगदीं दाराशेजारींच पुढच्या बांकावर बसलेला मुलगा दाते होता. पुन्हां दोघांचे चार डोळे भेटले. दातेच्या शेजारीं कुणी बसलें नव्हतें. त्या रिकाम्या जागेवर विजय जाऊन बसला. कोकिळ गुरुजींनीं विजयकडे हंसून पाहिलें आणि शिकवण्यास सुरुवात केली. धडा कोणता होता, गुरुजी वर्गांत काय सांगत होते याकडे विजयचें बिलकूल लक्ष नव्हतें. नवीन आलेल्या मुलाकडे सर्व मुलें मधून मधून पहात होतीं, आणि विजयहि त्यांच्याकडे वळून वळून पहात होता. मुलांची नैसर्गिक उत्सुकता अतृप्त राहूं न देण्याइतका समजुतदारपणा कोकिळ गुरुजींच्या अंगीं होता असें दिसलें.

त्यांनीं हातांतील पुस्तक मिटून ठेवलें आणि विजयला वर्गाची ओळख करून दिली. अर्थात् विजयलाहि पण आपली ओळख वर्गाला करून देणें भाग पडलें.

पहिला तास केव्हां संपला तें कळलें नाहीं. नंतर दुसऱ्या तासाला एक नाकांत बोलणारे चष्माविभूषित शिक्षक वर्गावर आले आणि त्यांचें पाऊल वर्गात पडल्यावरोबर वर्गांत एकदम शांतता पसरली. विजयला जाणवण्याइतका हा फरक ठळक होता.

विजयनें प्रश्नार्थक मुद्रा करून दातेकडे पाहिलें. पण दाते समोर पहात होता. विजयनें त्याच्या खांद्याला स्पर्श केला--आणि शिस्त विघडली! 'उभा राहा' म्हणून गुरुजींनीं विजयला आज्ञा केली. "सर,--सर,—तो नवीन मुलगा--" दाते अर्धवट जागचा उठून म्हणाला. "तूंहि त्याच्याबरोबर उभा राहा तर--"

शिक्षकमजकुरांच्या शिस्तीच्या कल्पना अतिशय कडक आणि कांटेकोर होत्या. सर्व धंद्यांत बुवावाजी असते. शिक्षकवर्ग कांहीं अपवाद नाहीं. इंचभर ज्ञान पुरवायचें आणि वारभर दिल्याचें अवसान आणायचें, असा एक धूर्त वर्ग असतो. मुद्रा गंभीर ठेवली, नेहमीं सखोल आणि भरगच्च ज्ञानाच्या लंब्या चवड्या बाता मारल्या, आणि वर्गांत करडा अंमल ठेवला कीं यांचें सोंग पूर्ण होतें. हें स्वतः हंसायचे नाहींत, दुसरा कुणी हंसतांना दिसला तर त्यांना आकाश कोसळून पडण्याची भीति वाटायची. मुलांनी बोलतां कामा नये, हंसतां कामा नये, हालतां कामा नये-- चिनीमातीच्या बाहुल्याप्रमाणें त्यांनीं स्तब्ध राहिलें पाहिजे. दुसऱ्या वर्गांतून हंसण्याचा आवाज आला तर यांच्या

कपाळाला आंठी चढे. विजयच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह चालू झालेला पाहतांच वर्गातील सर्व मुलें त्याच्याकडे टवकारून पाहूं लागलीं. "बैस खालीं. आल्या दिवशींच तुला धडा मिळाला हें तुझ्या भावी यशाच्या दृष्टीनें ठीकच झालें—" गुरुजी गंभीरपणानें म्हणाले.

परंतु विजयच्या रडण्यानें घोटाळा केला. मधल्या सुट्टींत त्याला वर्गातल्या मुलांनीं घेरलें. विजयला मध्यें ठेवून सर्वांनीं त्याच्या भोंवतीं हातांची सांखळी धरली आणि "हाय हाय हुई हुई!" अशा तऱ्हेच्या आरोळ्या ठोकीत रानटी लोकांचें नृत्य आरंभिलें. विजय प्रथम भांबावून गेला. त्या वर्तुळाची कोंडी फोडण्याचा त्यानें खूप प्रयत्न केला. परंतु मुलें बेभान होऊन त्याला अडवून धरीत होती. विजयला सर्वांत जास्त वाईट वाटलें त्याचें कारण पण दाते. दाते सर्वांचा म्होरक्या होता. या नवीन मुलाच्या मूर्खपणामुळें एक तासभर आपल्याला विनाकारण उभें राहावें लागलें हें शल्य त्या बालमनांत सलत होतें. त्या अपमानाचा हा असला विचित्र बदला तो उगवून घेत होता. मुलांचें ओरडणें आणि नाचणें याला सीमा राहिली नाहीं. एका मुलानें विजयला समोरच्या मुलाकडे ढकलावें, त्या मुलानें तें टपाल पुन्हां समोर ढकलून द्यावें—असला अंगझटीचा प्रकार सुरू झाला. सुदैवानें तास सुरू झाल्याची घंटा याच वेळीं झाली म्हणून विजयचे यापुढील हाल वांचले. तरी पण विजयच्या मनावर ह्याचा परिणाम झालाच.

"पुढच्या तासाला त्यानें दातेचा शेजार सोडून दिला. वर्गाच्या अगदीं थेट मागच्या बांकावर तो एकटाच बसून राहिला. गुरुजनांच्या शिकवण्याकडे त्याचें अजिबात लक्ष

लागलें नाहीं. दातेचा त्याला अतिशय राग आला होता. वर्गातील सर्व मुलें त्याला एकाएकीं दुष्ट वाटूं लागलीं. आपण कोणाचें कांहीं केलें नसतां सर्वांनीं एका मुलाच्या चिथावणीमुळें आपला असा अपमान, छळ करावा ह्याचें त्याला राहून राहून वाईट वाटूं लागलें. वर्गातलें त्याचें लक्ष उडालें. शंभर दीडशें मैल दूर असलेल्या एका छोटयाशा स्टेशनावर तो उतरला. प्लॅटफॉर्मच्या टोकाशीं असलेल्या घरांत तो गेला. 'आई' म्हणून त्यानें हांक मारतांच त्याची आई धांवतच बाहेर आली. आणि—

"काय रे, ए शंभ्या, बहिरा आहेस का? किती वेळां ओरडायला लावशील मला--?" दुसऱ्या तासाचे शिक्षक कपाळावर आंठयांचें जाळें चढवून बोलत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. विजय घाबरून जागचा उठला. त्याला शिक्षकांच्या प्रश्नाचें स्वरूप माहीत नव्हतें. तो उत्तर तरी काय देणार? त्याचा हा गोंधळ पाहून मुलांनीं कां हंसूं नये?

--छे:! एकंदरींत शाळेंतला पहिला दिवस अपेक्षेप्रमाणें त्याला चांगला गेला नाहीं. शाळेविषयीं आकर्षण वाटावें, शाळेंत मन रमून जावें असा प्रकार घडून आला नाहीं. शाळा सुटल्याची घंटा होतांच विजयनें वाघ पाठीस लागावा अशा घाईनें शाळेचें आवार सोडलें आणि तडक घर गांठलें!

विजय घरीं आला मोठया आशेनें. निदान अण्णा तर आपल्याला घरीं दिसतील या आशेनें तो धांवत पळत आला. पण त्याचे अण्णा त्याला घरांत दिसले नाहींत; भिरभिरत्या डोळयानें त्यानें घराच्या तिन्ही खोल्या बारकाईनें विचरून

काढल्या. त्याची भीति खरी ठरणार कीं काय? अण्णांचा कोट कुठेंहि दिसत नव्हता. आपल्याला शाळेंत पोंचवून अण्णा गाडीनें निघून तर गेले नसतील? अन् मग आतां आपलं कसं होणार? आपलं आहेच कोण मुळीं इथं?

सैंपाकघरांत मुलें थालिपीठ खात होतीं. सुनंदा दुभत्याच्या कपाटांतून कसली तरी बरणी काढीत उभी होती. मोठ्या माणसांपैकीं ताई एकटीच आहे असें पाहून थोडासा धीर येऊन विजय येणारा हुंदका मोठ्या कष्टानें आवरून म्हणाला, "ताई! अण्णा--" त्याच्याकडे लक्ष जाऊन सुनंदा म्हणाली, "थालिपीठ खायचं असेल तर त्याच्या पानांत–"

तिच्या या प्रेमळ सूचनेकडे लक्ष देण्याइतका त्याचा जीव थाऱ्यावर होता का--? तो अधिऱ्या मुद्रेनें म्हणाला, "पण अण्णा कुठें गेले आहेत?" सुनंदेनें त्याचा कातर आवाज ऐकून त्याला पोटाशीं धरायला पाहिजे होतें यावेळीं. —पण ती तरी अशी काय पोक्ती पुरवती आजीबाई लागून राहिली होती! उलट तिला गंमत वाटून ती चेष्टेचा सुरांत म्हणाली,

"अण्णांना अन् आईला आतां काय जन्मभर गळ्यांत बांधून बसणार आहेस का? तूं एक रिकामटेंकडा आहेस–पण अण्णांना नोकरी–चाकरीचे उद्योग आहेत. चावटपणा पुरे आतां. खायला बैस. अण्णा दुपारीं चारच्या गाडीनं गेले. त्यांनीं तुझीं पुस्तकं अन् वह्या बाहेरच्या टेबलावर आणून ठेवल्या आहेत. अन्--"

"पण सुनंदेचें समग्र भाषण ऐकावयाला विजय त्या ठिकाणीं उभा राहिला नाहीं. अण्णा गेले हें ऐकतांच त्याच्या काळजानें ठाव सोडला. आपल्या छातींत कांहींतरी चावत

असावें असा त्याला दाट संशय येऊं लागला. घरांत कांहीं तरी अडकल्याचा त्याला भास झाला. त्याचें डोकें जड झालें. त्याची जीभ ओढल्यासारखी झाली. पायांत शक्ति नसल्यासारखें झालें–आणि त्यानें तेथून धूम ठोकली. जगांत आपलें कोणी नाहीं, आईनें आपल्याला दूर लोटलें. वडिलांनीं आपल्याला एकटें सोडून दिलें. कशासाठीं ? 'शिक्षणासाठीं म्हणे!' पण हें शिक्षण मला नको. शिकायची बिलकूल इच्छा नाहीं. मला आई पाहिजे. अण्णा पाहिजेत—

माडीवर जाऊन विजय ढसढसां रडूं लागला! अण्णांनीं सकाळीं शाळेंत जातांना त्याला थोडयाशा पेपरमिंटाच्या वडया दिल्या होत्या. त्या अजून त्याच्या खिशांत होत्या. आठवणीसरशीं त्यानें खिशांत हात घातला. त्या वडया त्यानें बाहेर काढल्या व खिडकींतून अंगणांत भिरकावून दिल्या! अण्णांनीं आपल्याला फसवलं, आईनं आपल्याला दूर लोटलं. आणि आपल्याला या तुरुंगांत आणून टाकलं. होय! तुरुंग असाच असेल! असल्याच घराला तुरुंग म्हणत असतील. आणि मग या तुरुंगांतून आपली सुटका नाहींच का—?

तिन्हीसांजा झाल्या, दिवे लावण्याची वेळ आली तरी विजय खालीं गेला नाहीं. तोंपर्यंत त्याची चौकशी करण्याचें कुणाला प्रयोजन वाटलं नाहीं. थोडया वेळानें जिन्यांत पावलें वाजलीं. विजयनें घाबरून डोळे कोरडे केले व तो अंग चोरून जाग्यावर उभा राहिला. सुनंदेची सासू, माई माडीवर दिवा लावण्यासाठीं आल्या असाव्या. अंधारांत त्यांना विजयची रडकी मूर्ति दिसली नाहीं. टेबलावरचा दिवा लावून त्यांनीं काडयाची पेटी टेबलाच्या खणांत टाकून

दिली आणि खालीं जाण्यासाठीं त्या मागें वळल्या तोंच विजयकडे त्यांचें लक्ष गेलें. माईचें बोलणें रोखठोक होतें. त्या बोलण्यात मायेचा, ममतेचा लेशहि नव्हता. त्या किंचित् तुसडेपणानें म्हणाल्या, "लाज नाहीं वाटत का रे तिन्हीसांजा रडायला? बारा वर्षांचा घोडा झाला आहे अन् रडतोय् वर! भरल्या घरात तिन्हीसांजा रडून आमच्या घराचा काय खेळखंडोबा करायचा विचार आहे तुझा? पुन्हां रडतांना दिसलास तर याद राखून रहा. ते तुझे लाड तुझ्या आईपुढें कर. इथं माझ्याशीं गांठ आहे सरळ वागलास तर ठीक आहे. नाहींतर—! अभद्र कार्टं मेलं!"

विजय त्या दिवशीं रात्रीं पानावर बसला पण जेवला नाहीं. जेवणानंतर पुस्तक डोळ्यासमोर धरून बसला पण त्यानें एक ओळहि वाचली नाही. झोंपण्यासाठीं गादीवर लवंडला पण बराच वेळ त्याला झोंप आली नाहीं. त्याला खूप खूप रडावेंसें वाटत होतें. पोटभर रडून घ्यावेंसें वाटत होतें. पण मघाशीं माईंचा अवतार त्यानें पाहिल्यावर तो मनांतून भेदरला होता. रडण्याचीहि त्याला भीति वाटूं लागली. त्याचा जीव गुदमरून गेला. त्याला आई पाहिजे होती आणि ती तर या वेळीं शंभर दीडशें मैल दूर होती! रात्रीं बारावर एक वाजतां रडून रडून दमल्यामुळें त्याचा डोळा लागला.

★

## — ३ —

सकाळीं तो जरा उशिरानेंच उठला. रात्रींच्या जागरणामुळें त्याचे डोळे चुरचुरत होते. अजून त्याची झोंप पुरती झाली नव्हती पण त्याला कालपासून माईंचा विलक्षण धाक वाटूं लागला होता. शेजारीं झोंपलेलीं मुलें उठून गेलेलीं दिसलीं, तेव्हां आतां मुकाट्यानें खालीं जावें हें बरें या विचारानें तो उठून उभा राहिला. त्याचें सर्वांग जड झालें होतें. पायांत शक्ति नसल्याचा त्याला भास होऊं लागला. अंथरुणापासून दूर होऊन तो खालीं बसला आणि गुडघ्यांत त्यानें तोंड लपवलें.

खालून माईंचा शब्द त्याच्या कानांवर आला, ' सूनबाई, बंधुराजांना उठवा तुमच्या ! त्यांना म्हणावं, तुमच्या बापानं तुम्हांला इथें शिकायलं ठेवलं आहे. आठ आठ वाजेपर्यंत झोंपा काढायला पाहिजे असतील तर म्हणावं आपला रस्ता धरा—' सुनंदेचीं पावलें जिन्यांत वाजलीं. विजय उठून उभा राहिला. सुनंदा कपाळावर आंठ्या चढवून वर आली. भावाची गादी गुंडाळीत असतां ती हलक्या आवाजांत म्हणाली, " घरीं छळायला मिळालं नाहीं म्हणून बहिणीचा छळ करायला इथें आलास हो, बाबा ! तुझ्यामुळं मला खेटरं खावीं लागताहेत. जरा लवकर उठलास तर बिघडेल का ? अन् लक्षांत ठेव, इथं मी तुझी गादी गोळा करायला येईन म्हणून वाट पाहायची नाहीं. ज्याची त्यानें गादी गोळा करावी असा सासूबाईंचा नियम आहे—"

'विजयला कोठून धीर आला कोणास ठाऊक. तो बहिणीच्या तोंडाकडे रोखून पहात म्हणाला, "तुला जर माझा एवढा त्रास होत असेल तर दे मला आईकडे पाठवून ! मी म्हटलं होतं का कीं मला इथें ठेवा म्हणून? माझं अडलं नाहीं या घरांत राहृयला--" घाबऱ्याघाबऱ्या त्याच्या तोंडावर हात ठेवून सुनंदा म्हणाली, "माझे आई, असं कांहीं बोलून माझा आणखी छळवाद मांडू नकोस. तुझ्या पायां पडतें मीं. कुणाला कांहीं बोलूं नकोस इथें. मला मुकाटयानं मुकाटयानं जेवढं तुझं करतां येईल तेवढं मी करून ठेवीन. पण मोठया माणसांचीं मनं दुखवून त्यांना नसता वाईटपणा येईल असं कांहीं बोलूं नको."

विजयला एका दिवसांत बहिणीच्या सासरीं काय आहे तें पूर्णपणें कळून चुकलें. त्याच क्षणीं त्याच्या मनानें घेतलें कीं आपल्यामुळें ताईला त्रास होईल असें वागावयाचें नाहीं. ताईचा आधार काय किमतीचा आहे हें त्यानें ओळखलें. विजय खालीं निघून गेला. प्रत्येक गोष्टींत त्याला परके-पणाचा वास येत होता आणि अशा ठिकाणीं आपण काय करावें हें न सुचल्यामुळें तो जास्तच घोटाळयांत पडे. त्यांच्या घ ीं सर्वांना तोंड धुण्यासाठीं एका डब्यांत राखुंडी करून ठेवलेली असे. पण इथें प्रत्येकाच्या पायरीप्रमाणें व्यवस्था दिसत होती. सुनंदेच्या नवऱ्याचा ब्रश होता. खुद्द सुनंदा काय वापरीत असे हें त्याला समजलें नव्हतें. मुलांना बाटलींतली काळी राखुंडी ठेवलेली होती. आपण काय घ्यावें हें त्याला कळेना. जिज्ञासा म्हणून त्यानें सुनंदेच्या नवऱ्याचा ब्रश उचलून हातांत घेतला आणि त्याच क्षणीं बाळू ओरडला, "आई ! दादाचा ब्रश घेतो आहे ग तो--!"

विजय दचकला. त्याच्या हातांतला ब्रश मोरींत गळून पडला. माईनीं कपाळाला हात लावला. सुनंदा पुढें धांवली. अगदीं साधा प्रसंग. पण आपण कोणतीहि गोष्ट केली तरी त्यांत चूक निघायचीच. हा काय प्रकार आहे हें त्या अजाण बालकाच्या डोक्यांत शिरेना. आणि त्याला तें कोणी धड समजावून सांगेना ! त्यानें तरी काय करावें ?

माईनीं मुलांच्या पिऊन राहिलेल्या चहांत थोडें दूध घातलें आणि लाल चहाचा कप विजयच्या पुढें ठेवीत म्हटलें, "आजचा एक दिवस गय करतें पण उद्यांपासून हें असं चालायचं नाही हं ? तुझ्या घरीं तूं इंद्राच्या ऐरावताची झूल घालून मिरवलास तरी त्यांत माझं कांहीं वेंचत नाहीं, तुझी आई जाणे अन् तूं जाणे ! पण आमच्या घरांत राहयचं तर आमच्याप्रमाणं राहिलं पाहिजे. सकाळीं साताच्या आंत आंघोळी झाल्या पाहिजेत. तुझ्या बापाच्या घरीं लांकडं अन् कोळसा मिळत असतो फुकट. पण ही शहरवस्ती आहे. इथं आम्हांला शेणाला पैसा मोजावा लागतो. वेळेवर आलास तर चहा मिळेल. नाहींतर बहिणीच्या गळयांत गळा घालून माडीवर रडत बस खुशाल ! दुपारीं सुट्टींत खायला पाहिजे असेल तर घरीं यावं लागेल. आमचा बाळूसुद्धां घरीं येऊन खाऊन जात असतो. हातासरशीं ताटवाटी विसळून जागच्या जागीं ठेवली पाहिजे. इथं आम्ही नोकर–चाकर ठेवलेले नाहीत. ज्याची गादी त्यानं घालायची अन् गोळा करून ठेवायची. इथं शाळेंतले मित्र घरीं आणायचे नाहींत. सारं कांहीं आधीं सांगून ठेवतें—"

इंडियन पीनल कोडांत देखील एवढीं कलमें नसतील. चहा पितां पितां विजय खालीं मान घालून मुकाट्यानें ऐकत

होता. त्याचें मन बंडखोर होऊं पहात होतें. माईनीं उच्चारलेल्या सर्व गोष्टी त्यानें बिनबोभाट करून दाखवल्या असत्या. पण माईनीं एखाद्या चोर दरवडेखोराला बजवावें असें दरडावून आपल्याशीं कां बोलावें हें त्याला कळेना! ह्याच गोष्टी माईना खालच्या आवाजांत सांगतां येत नव्हत्या का? आईला एखादे वेळीं कपबशा विसळून द्यायला त्यानें कधीं नाहीं म्हटलें होतें? मंजुळेच्या हातांतील केरसुणी ओढून केर काढण्याची सुद्धां त्याची तयारी असे. आई त्याला केर काढूं देत नसे त्याला त्यानें काय करावें!

विजयनें मनाशीं निर्धार केला कीं या वेळीं आपण गप्प राहावें हेंच चांगलें. या घरांत आपलें फार दिवस पटणार नाहीं. म्हणजे ही बाई पटवून घेणार नाहीं हें स्पष्ट दिसतें आहे. आपण सुट्टींत घरीं गेलों म्हणजे आईला अन् अण्णांना सगळं खरंखरं सांगून टाकूं. आपली आई खरोखर फार चांगली आहे. तिला हें सारं समजलं तर ती पुन्हां आपल्याला या घरीं धाडायची नाहीं. अन् याही उप्पर तिनें ऐकलें नाहीं तर आपण रडूं, ओरडूं—काय वाटेल तें करूं. पण पुन्हां या घरांत पाऊल टाकायचं नाहीं.

विजयनें तोंड वांकडें करीत तो गारठणक झालेला चहा कसाबसा संपवला आणि आंघोळीसाठीं सदरा काढला. प्रत्येक गोष्टींत त्याला तुलना करून पाहण्याचें न कळत व्यसन जडूं लागलें. घरीं आई त्याच्या डोक्याला तेल लावीत असे; आणि तो नको नको म्हणाला तरी त्याला न जुमानतां स्वतः त्याला आंघोळ घालीत असे. मानेला

शिकेकाई लावून माल खसखसून घांसणें, पाठीला साबण लावणें इत्यादि आई करीत असलेल्या गोष्टी त्याला आठवूं लागल्या आणि न कळत त्याचे डोळे पुन: भरून येऊं लागले. बाळू समोर उभा होता. त्याच्या देखत आपली शोभा होऊं नये म्हणून विजयनें घाईघाईनें डोक्यावर तपेलीनें पाणी घेण्यास प्रारंभ केला.

विजय त्या दिवशीं शाळेंत गेला तेव्हां आणखी त्याच्या निराशेंत थोडीशी भर पडणार होती. काल त्याच्याशीं अत्यंत गोडींत बोलणारे कोकिळ गुरुजी पहिल्या तासाला वर्गावर आले नाहींत. त्यांच्या ऐवजीं दुसरेच एक गृहस्थ वर्गावर आले. एका धीट मुलानें चौकशी करण्याचें धाडस केलें. त्या शिक्षकांनीं खुलासा केला. तो ऐकून विजयला अत्यंत वाईट वाटलें. वर्गालाहि पण वाईट वाटल्याचें दिसत होतें. कोकिळ गुरुजी हे विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक होते. त्यांच्या तासाला विशिष्ट मर्यादा न ओलांडतां मोकळे-पणानें बोलणें, हंसणें वगैरे मुलांना आवडणाऱ्या गोष्टी निःशंक मनानें करतां येत असत. आणि कोकिळ गुरुजी कधीं लहर लागली म्हणजे किती छान छान गोष्टी सांगत असत. पण शाळेच्या सोयीसाठीं वेळापत्रक बदलावें लागलें होतें. कोकिळांना सर्वांत वरच्या वर्गाचें काम देण्यांत आलें. यापुढें ते ह्या वर्गावर येणें शक्य नव्हतें.

आकाश ढगांनीं झांकाळून गेलें होतें. झाडाचें पान-देखील हालत नव्हतें. सगळीकडे अंधार दाटला होता. एक मुलगा सहज विजयला म्हणाला, “ चल नं खेळायला. असा विचार करीत काय बसतोस--? ” विजयनें त्या

मुलाकडे पाहिलें. त्या मुलाच्या डोळ्यांत सरळपणा होता. आर्जव होतें. पण विजयनें नकारात्मक मान हलवली. तो मुलगा थोड्याशा हेटाळणीच्या सुरांत ' हूं: ' म्हणून मान उडवीत निघून गेला. एकदोन थेंब जमिनीवर ठिबकले. पावसाची सर समोरच्या पत्र्यावर ताशा वाजवूं लागली. चौकांत खेळणाऱ्या मुलांची पांगापांग झाली. कपाळावरील केंस ओल्या हातानें मागे सारीत दाते विजयजवळ येऊन थांबला. दातेचे डोळे लकाकले. त्याच्या डोक्यांत कसला तरी गंमतीचा विचार डोकावून गेला असावा. भोंवतालीं गोळा झालेल्या मुलांना खूण करून तो विजयजवळ आला. खोट्या विनयानें जमिनीपर्यंत हात वांकवून बादशाही कुर्निसात ठोकून तो म्हणाला, " शाहेनशाह, गरीब परवर, बंदा लाचार आहे. आपण हुकूम फर्मावा कीं आपल्या रडण्यासाठीं हौद बांधण्याची कोशीस करतों--" हें नाटकी थाटानें पाठ केलेलें त्याचें भाषण ऐकून मुलें खो: खो: हंसूं लागलीं. जोरानें टाळ्या पिटूं लागलीं.

--आणि कोणी प्रथम सुरुवात केली कुणास ठाऊक. एकजण दुसऱ्याच्या अंगावर कोसळला. खालीं पडलेला मुलगा संधि साधून उठला आणि समोर दिसणाऱ्या मुलावर त्यानें झडप घातली. कमरेला पाठीमागून विळखा घालायचा व मुलगा खालीं पाडायचा हें अभिनव तंत्र मौजेचें ठरलें. पांच मिनिटांच्या अवधींत त्या गॅलरीला रणांगणाचें स्वरूप आलें. सगळ्यांचा म्होरक्या दाते होता. मुलांच्या दांडगाईला सुरुवात अगदीं सहज होते. पण त्या दांडगाईचें पर्यवसान कशांत होईल याचा कोणालाच अंदाज नसतो. मुलांच्या अंगीं आगाऊ अंदाज बांधण्याची करामत असती तर त्यांना

मुलें म्हणणें जड गेलें असतें. दांडगाईचें स्वरूप क्षणाक्षणाला पालटत जातें. लगेच बाजू आपोआप ठरतात. तट पडतात. हिरीरीनें पुंडाई लढवली जाते. अगदीं हाच प्रकार याहि वेळीं घडून आला.

विजयला एका मुलानें त्या गर्दीत ओढलें. विजयनें त्या रणधुमाळींत भाग घेण्याचें निक्षून नाकारलें. त्यानें त्या मुलाला जोरानें दूर ढकललें. पण ह्या प्रकारानें विजय वर्गाची सहानुभूति गमावून बसला. जो दोन हात करायला भितो तो मुलगा लहान मुलांच्या मेळाव्यांत अप्रिय ठरतो. सर्व वर्ग विजयकडे खुनशी मुद्रेनें पाहूं लागला. दाते त्वेषानें त्याच्या पुढें उभा राहून म्हणाला, "भित्री भागूबाई ! रडकी रडूबाई ! बांगड्या कुठें आहेत, बगडे !"

हें आव्हान विजयला सहन होणारें नव्हतें. आपल्या कानांचीं पाळें तापलीं असावीं असा त्याला भास झाला. छाती पुढें काढून समोर असलेल्या दात्याच्या थोबाडांत त्यानें एक सणसणीत ठेवून दिली. या अनपेक्षित हल्ल्यामुळें दाते गाल चोळीत एकदोन पावलें मागें सरकला. आतां त्याच्या इज्जतीचा हा प्रश्न होता. सर्व मुलांच्या देखत एका नवीन आलेल्या मुलानें थोबाडींत मारावी हें दृश्य अपूर्व होतें. पण तें हंसण्यावारी घालवण्याइतकें साधें नव्हतें.

दातेनें पाय आडवा घालून विजयला खालीं पाडलें. दोघांची चांगलीच जुंपली.

विजय हाडापेरानें मजबूत होता. आजवरचें अकरा वर्षांचें आयुष्य खेड्यांत गेल्यामुळें तो शहरांतल्या मुलांपेक्षां जास्त निरोगी होता. दंगलीचा पूर्वार्ध त्याच्या बराच

अंगलट झाला. पण भांडण जों जों रंगूं लागलें तों तों विजय आपल्या मनची रुखरुख पूर्णपणें विसरूं लागला. एका शिष्ट मुलानें आपल्यावर अन्याय करावा, आपली कांहीं चूक नसतां विनाकारण त्यानें आपल्याला खालीं पाडावें हें त्याला सहन झालें नाहीं. होतां होतां तो चांगलाच भडकला !

दाते–विजय ही जोडी घंटा होऊन गेली तरी एकमेकांना खालीं पाडण्यांत गर्क होऊन गेली. मुलें सभोंवतीं कडे करून मौज पहात होतीं. प्रोत्साहनाच्या गर्जना मधून मधून उमटत होत्या—आणि एकाएकीं मुलें चूप झालीं.

"काय प्रकार आहे ! घंटा झालेली ऐकूं नाहीं आली?" हे चष्माविभूषित गुरुजींनीं करडया आवाजांत काढलेले बोल कानांवर पडतांच मुलें चपापून वर्गाच्या आंत पळालीं. देखरेखनिसांचा आवाज ऐकतांच दातेनें चढाईचें धोरण सोडून दिलें. त्यानें बदललेल्या पवित्र्याचें कारण लक्षांत न येऊन विजय झुंजतच राहिला आणि नेमका जाळ्यांत सांपडला. देखरेखनिसांना काय दिसलें? गरीब बिचारा दाते खालीं पडला आहे, त्याचा शर्ट पार फाटून गेला आहे, त्याच्या पायांवर, हातांवर ओरखाडे उठले आहेत आणि त्याच्या छाताडावर बसून विजय त्याच्या झिज्या उपटतो आहे आणि त्याला यथेच्छ बुकलून काढतो आहे. हातचें कांकण पाहयला आरसा न मागणारे ते शिस्तप्रिय गुरुजी होते. त्यांचा निश्चय ठरला !

विजयला त्यांनीं दंडाला धरून उभें केलें आणि खालीं पडलेल्या दात्याची सहानुभूतीनें ते चौकशी करूं लागले. आणि खरेंच दातेच्यावर ही लढत चांगलीच शेकली होती. विजयच्या बलाबलाविषयींचा त्याचा अंदाज बराच चुकला

होता. विजयच्या रडक्या ध्यानामुळें तो अजिबात चकल्या- सारखा झाला. हे रडके वीर आपल्याला रडवतील अशी पूर्वकल्पना त्याला असती तर कदाचित् तो स्वतः विजयच्या वांटेला गेला नसता. प्रथम प्रथम जरी दाते विजयी होता तरी पुढें तो थकला. खडकवासल्याच्या पाण्यापेक्षां नगरच्या ओसाड भूमींतील पाणी जास्त जिवंत ठरलें. दाते मनांतून वरमला होता आणि सोडवणुकीची वाट पहात होता!

त्या त्रासाला सबंध वर्ग उभा होता. सामुदायिक शिक्षा मान्य करण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें आणि उभें राहून पाय ठणकत होते तरी गुरुजींचे खडे तात्त्विक बोल त्यांना ऐकून घ्यावेच लागले. लहान मुलांचीं भांडणें ज्या वेगानें निर्माण होतात त्याच वेगानें तीं अंतर्धान पावतात. मोठ्या माणसांनीं थोडा वेळ नारसिंह अवतार धारण केला म्हणजे काम भागतें. सर्वत्र दरारा बसतो—आणि भांडणाचें मूळ विसरून जातें. पण बालमनाची ही विसराळू ठेवण लक्षांत न येणारे शिक्षक राईचा पर्वत करतात, अवास्तव महत्त्व देतात आणि एक प्रकारें आग धुमसत राहायला न कळत मदत करतात. प्रस्तुत शिक्षकांनीं नेमकी हीच चूक केली. अर्थात् ह्यांत त्यांचा दोष नव्हता. त्यांच्या दृष्टीनें त्यांनीं तसें वागणें रास्त ठरलें असतें. सद्‌गुणांचा अतिरेक हेंसुद्धां एक भयंकर व्यसन आहे. हे गुरुजी शिस्तीचे परम भोक्ते होते. एक वेळ वर्गांतील अभ्यास राहिला तरी चालेल पण मुलांनीं उत्तम नागरिक बनलें पाहिजे ह्यावर त्यांचा कटाक्ष होता. पण त्यांच्या लक्षांत ही गोष्ट कोणीतरी जरूर आणून द्यायला पाहिजे होती कीं मुलें हीं मुलेंच राहणार. त्यांना जरब दाखवून, शिक्षा करून, तीं क्षणभर दबलीं जातील हें खरें

आहे. पण त्या जरबेचा परिणाम कायम स्वरूपाचा होणार नाहीं. मोठ्या माणसाप्रमाणें मुलें शांतताप्रिय कशीं राहूं शकतील—?

एक तासभर त्यांनीं मुलांना वाणीच्या प्रखर चाबकानें फोडून काढलें. मुलें खालीं माना घालून ऐकत होतीं. उपदेश ऐकण्याचा मुलांना मनापासून कंटाळा असतो. पण या वेळीं त्यांना ऐकून घेणें भाग होतें. कान उघडे ठेवून तीं ऐकण्याचें ढोंग करीत उभीं होतीं. पण मनांतल्या मनांत त्यांचा विचार चालला होता. होय! ह्या सर्व घोटाळ्याला कारण झालेला मुलगा झोडपून काढला पाहिजे, हाच विचार त्यांच्या मनांत घर करूं पहात होता. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं तो मुलगा म्हणजे दाते नव्हता. सर्वांनीं अर्धवट माना वर करून विजयच्या दिशेनें पाहिलें.

बिचारा विजय! आपल्यापुढें काय वाढून आलें आहे याची त्याला कल्पनाहि नव्हती. आपण कांहींहि आगळीक केली नसतां सर्वांच्या द्वेषाचें लक्ष्य झालों आहों हें त्याच्या ध्यानीमनीं देखील नव्हतें.

महिनाभर कांहीं विशेष असा प्रकार घडून आला नाहीं. पावसाळ्याला तोंड लागलें कीं सुरवंट बाहेर पडूं लागतात आणि त्यांच्या बरोबरीनें मुलांच्या स्टंपा बॅटीहि बाहेर निघूं लागतात. क्रिकेट हा खेळ विदेशी आहे. त्याचें फार स्तोम माजविलें जाऊं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून जपणारी शिक्षक मंडळी आपल्यांत आहेत. क्रिकेटच्या खेळाविषयीं त्यांनीं अकारण मनांत अढी धरली असली तरी सामान्य विद्यार्थी हा खेळ हौसेनें खेळतात.

मोडक्या स्टंपा, बॅटीसारखें दिसणारें एखादें फळकूट आणि

बुचाचा चेंडू. एवढ्या साधनसामुग्रीवर उद्यांचे सेंचरी बॅट्स्-मन बेहद्द खूष असतात. त्यांना खेळण्यासाठीं चापलेली चोपलेली जमीन नसली तरी चालते. आंब्याएवढे दगड त्या जमिनीवर असले तरी घरीं इकडचें भांडें तिकडे करतांना तोंड वांकडें करणारा बहाद्दर ग्राउंडवर घामाघूम होईल. पण मजुरासारखा राबेल. त्यांच्यांत मर्चंट असतात, ब्रॅडमन असतात, पी. बाळूहि असतात. वर्गांत कवितेची एखादी ओळ पाठ म्हणून दाखवायची तर दहा वेळां अडतील. पण जगांतल्या क्रिकेटबहाद्दरांचीं नांवें त्यांच्या जिभेच्या शेंड्या-वर खेळत असतात. विद्यार्थिजगांत अत्यंत निष्ठेनें खेळला जाणारा हाच एक खेळ आहे !

राजकारणी विश्वांत पसरवून दिलेले वारे विद्यार्थ्यांच्या डोक्यांत प्रवेश करूं शकत नाहींत. विद्यार्थी म्हटला म्हणजे क्रिकेटची त्याच्या अंगीं आवड नाहीं असें सहसा आढळून यायचें नाहीं.

विजयचा वर्ग अपवाद कसा असेल? दातेनें पुढाकार घेतला. रात्रीं दिव्यापुढें बसून त्यानें वर्गबंधूंना उद्देशून एक नोटीस काढली. नोटीस पुढीलप्रमाणें वेड्यावांकड्या आणि अशुद्ध अक्षरांत लिहिली होती—

“ सुरू होणार ! सुरू होणार !
लौकरच सुरू होणार !
आपल्या वरगाची क्रिकेटचि टिम जोराने सुरूं होणार ?
मघल्या सुट्टीत चवकशी करा : क्यापटन दाते.”

दुसऱ्या दिवशी वर्ग चालू असतां ही नोटीस हातोहात कशी फिरली हें गूढ समजायला मूलच व्हावें लागेल ! त्या दिवशीं मधल्या सुट्टींत मुलांनीं सभा भरवली. कोणत्याहि

नगरपालिकेच्या सभा चालविण्याचें तंत्र माणसें लहान वयांतच पैदा करीत असतात! आरडाओरड करणें, उखाळ्यापाखाळ्या काढणें आणि सभा उधळून लावण्याचा धाक घालणें इत्यादि तंत्रें मुलांना शिकवावीं लागत नाहींत. पहिल्या प्रथम एका मुलानें मूळ मुद्याला हात घातला!

"दाते काय म्हणून कॅप्टन? मी आमच्या घराच्या अंगणांत रोज खेळत असतों. माझा धाकटा भाऊ चेंडू टाकतो अन् मी बॅटिंग करतों. आमची आठ दिवस मॅच चालू आहे. अजून मी औट गेलों नाहीं—" हा त्याचा दावा होता!

दुसऱ्या एका मुलानें आपलें घोडें पुढें दामटलें. त्याचें म्हणणें कीं बॅटिंगपेक्षां चेंडू टाकून दुसऱ्याला औट घेणें फार अवघड आहे. नम्रता धारण करून तो पुढें म्हणाला, "प्रोफेसर देवधरांना खेळतांना मी पाहिलं आहे. पण त्यांना सुद्धां औट घेणारा बॉलर मी पाहिला आहे. मग बॅटिंग करणाऱ्यापेक्षां बॉलरच श्रेष्ठ नाहीं का? मीं फर्स्टक्लास बोलिंग करतों—"

तिसरा त्याला डिवचण्यासाठीं म्हणाला, "मग प्रोफेसर देवधर तुला खूप घाबरत असतील, नाहीं रे? तुझी अन् त्यांची रस्त्यांत गांठ पडली तर ते पळून जात असतील, नाहीं—?"

दातेनें त्यांना शांत करून वस्तुस्थितीची पुढीलप्रमाणें जाणीव करून दिली. "मी कॅप्टन होणार. पहिली माझी ही कल्पना आहे. ज्याला आमच्या टीममध्यें यायचं नसेल त्यानं येऊं नये. बॅट माझी आहे. चेंडू माझा आहे. अन् वडिलांच्या मागें लागून निदान दोन स्टंपा तरी मी आणणार

आहे. तुम्हांला जर सामान दुसरीकडे कुठें मिळत असेल तर पहा. माझं सामान आहे तर मीच कॅप्टन होणार. उघड आहे, तुम्ही सामान आणा, तुम्ही कॅप्टन व्हा "

ही घोषणा कानीं पडल्यावर वर्गांत स्मशानशांतता पसरली. दाते याचा मुद्दा बिनतोड होता. ससा आपल्या हातांत नाहीं तर आम्हीच पारधी हा हेका कोण चालू देणार! आपलें म्हणणें गळीं उतरत चाललें आहे हें पाहून दाते पुनश्च आवेशानें म्हणाला, "आणि शिवाय आपण दुसऱ्या वर्गाशीं मॅच घेऊं तेव्हां टिफिनचा खर्च मी स्वतः करणार आहें. टिफीन नाहीं तर मॅच कसली! भत्ता, पेरू, काकड्या—"

यावर कोणी तोंडांतून अक्षर काढील काय? तोंडाला सुटलेलें पाणी आंवढ्यासरशीं गिळून सर्वांनी एकमतानें दातेचा हा हक्क तावडतोब मान्य केला!

विजयच्या समोर ही सभा भरली होती. मधल्या सुट्टींत धांवत घरीं जा आणि भरल्या पोटीं पळत परत ये, हा घाईचा प्रकार त्याला अनुभवानें त्रासदायक वाटला आणि दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा होता. विजयला घराचें वातावरण नकोसें झालें होतें. शाळा तरी त्याला मनापासून कुठं आवडत होती? पण दगडापेक्षां वीट मऊ या न्यायानें त्याला शाळा जवळ करावीशी वाटे, एवढाच त्यांतला अर्थ. घरीं जाऊन माईच्या तोंडून एखादा वांकडा शब्द ऐकून घेण्यापेक्षां शाळेच्या आवारांत भटकणें त्याला पसंत पडूं लागलें. मधल्या सुट्टींत घरीं कां येत नाहीं म्हणून सुनंदेनें त्याला एकदोनदां विचारले होतें. तेव्हां 'भूक लागत नाहीं

हें उत्तर त्यानें पुढें केलें. सुनंदेनें यावर त्याला छेडलें नाहीं. तिची काळजी तिला भरपूर होती.

सभा चालू असतां मुलांनीं त्याच्या उपस्थितीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं आणि त्यानेंहि वादविवादांत भाग घेतला नाहीं. आपण मुलांच्या मर्जीतून उतरलों आहों एवढें समजण्याइतपत त्याला अक्कल होती. हा आपल्यावर अन्याय आहे. चोरी कुणी करावी आणि फांशी कुणाला द्यावें हें त्या मुलांना समजावून देण्याची त्याला अनिवार इच्छा होती. पण तो गप्प राहिला. आपल्याविरुद्ध निर्माण झालेल्या वातावरणांत आपलें न्यायाचें बोलणें कोणी ऐकून घेणार नाहीं ही खात्री वाटत असल्यामुळें त्यानें तो मुद्दा उकरून न काढण्याचें ठरविलें. पण क्रिकेट हा खेळ त्याचा अतिशय आवडता होता.

हा खेळ तो प्रथम कुणापासून शिकला हें त्याचें त्यालाहि सांगतां आलें नसतें. पण त्याच्या वयाच्या मानानें त्यानें या खेळांत बरेंच प्राविण्य मिळविलें होतें. स्टेशनामागचें मोकळें मैदान त्याच्या मालकीचें होतें. आईच्या मागें लागून त्यानें खेळाचीं आयुधें आणवून घेतलीं होतीं. स्टेशनवरील पोर्टरांची आणि फैलवाल्यांचीं मुलें त्याला एका शिट्टीनें केव्हांहि गोळा करतां येत असत. त्याची लहर लागली तर तो इतरांना बॅटीला हात लावूं देई. नाहीं तर यानें चेंडू मारावे आणि इतरांनीं पळत सुटावें हा जमाना होता. कधीं कधीं पटेल ड्रायव्हर एंजिनमधून खालीं उतरे आणि लाईन क्लिअर हातांत पडेपर्यंत जो पांच–सात मिनिटांचा अवधि सांपडे त्या वेळांत चौफेर टोले लगावी. पटेल ड्रायव्हरला मात्र मागितल्याबरोबर विजयच्या हातून बॅट मिळे. कारण

दर पपेटीच्या सनाचे वेळीं पटेल बॅट, चेंडू आणि बंदूक फिरवणारी कळीचा सोजीर किंवा ताशा बडवणारें माकड असल्या तऱ्हेची सुंदर भेट त्याला आठवणीनें आणून देत असे.

फरामजीनें विजयला लेगब्रेक आणि ऑफब्रेक कसा टाकावा हें सोदाहरण दाखवून दिलें होतें. फरामजी तर क्रिकेटवेडाच होता. विजयचे वडील त्याला अखेरीस चिडून म्हणत, "फरामजी, तूं काय पागल आहेस का? गाडी घेऊन जायची नसेल तर तसं सांग म्हणजे मी कंट्रोलरकडे रिपोर्ट करतों. तूं काय लहान आहेस आतां?"

फरामजी मोठा गमत्या होता. हातांतला चेंडू विजयच्या रोखानें तो उंच उडवी आणि विजयच्या वडिलांच्या हनुवटीला हात लावून लटक्याच भीतीनें म्हणे, "अरे दोस्त वामनराव, असा घुस्सा कशाला करते तुमी? कंट्रोलर तर या वख्ताला मुरगी, पुलाव खाऊनशान् आराम पडला अशेल. त्येला कशाला खालीपिलीं तरास देते. ज्यातो बाबा, ज्यातो. हे नोकरीमंदी लई तरास. कवांतर फटकन् नोकरी छोडून देल आन व्हेरिटीमाफक जगभर चेंडू टाकीत नाय हिंडेल तर नांवाचा फरामजीच नाय! विजयबाबा, साहेबजी उद्यां या वख्ताला जरूर येईल हं आमी—"

विजयचे गुरु हे असे नादी होते. त्यांच्या देखरेखीखालीं तो तयार झाला होता.

वर्गाच्या इतर चळवळींपासून तो अलिप्त असे. बरोबरीच्या मुलांत मिसळण्याची ऊर्मि त्याच्या मनांत कधींच निर्माण झाली नाहीं. वर्गात पाठ चालू असत तरीसुद्धां तो निर्विकार मुद्रेनें वर्गात शेवटच्या बांकावर एकटाच बसून

राही. वेळ काढण्याचें धोरण ठरून ओझ्यासारखें झालें होतें. कशांतच त्याला उत्साह वाटत नसे.

पण वर्गात क्रिकेटच्या गप्पा सुरू झाल्यावर मात्र त्यानें कान टवकारले. आयुष्यांत रस वाटण्यासारखा एवढा एकच विषय त्याला उरला होता. मुलांच्या सूचना, प्रतिसूचना तो लक्षपूर्वक ऐकूं लागला. एकदम त्याच्या मनाचा निश्चय झाला. तो पुढें होऊन म्हणाला, "मला चांगलं खेळतां येत आहे—"

सर्व मुलांचे डोळे त्याच्यावर रोखले गेले. जणु काय ह्या नवीन मुलाच्या विधानाची सत्यता त्याच्या डोळ्यांत ते पारखून घेत होते. एक किंचित् उदार मताचा मुलगा त्या स्तब्धतेचा भंग करून म्हणाला, "मग आज संध्याकाळीं ग्राउंडवर ये."

विजयला या उत्तरानें अस्मान ठेंगणें वाटलें. क्रिकेटच्या खेळांतील ही मौज लक्षांत घेण्यासारखी आहे. राजकारणी लोकांनीं जातीयतेच्या मुद्यावर क्रिकेटला कसून विरोध केला आहे. पण क्रिकेटमुळें असा एखादा भयंकर प्रसंग ओढवल्याचें कुणाच्या आढळांत आलें नाहीं त्याचप्रमाणें क्रिकेटचा खेळ माणसांच्या मनांतील हेव्यादाव्याचें विषारी वारें घालवून देण्यास मदत करतो. एरव्हीं विजयला त्या मुलांनीं आपल्यांत मिसळूं दिलें नसतें—पण क्रिकेट या विषयापुरता विजयचा सहवास त्यांनीं मान्य केला.

—आणि सर्व गोष्टी सुरळीत चालल्या असत्या तर विजय आपला एकलकोंडेपणा साफ विसरला असता. घराची आणि आईची आठवण त्याला सुसह्य झाली असती आणि खेळण्याच्या नादांत तो आपलें दुःख दडपून टाक

शकला असता. पण ग्राउंडवर निराळेंच वातावरण दिसूं लागलें.

कौशल्याच्या बाबतींत विजय सोडला तर बाकीचे सगळे एकाच माळेचे मणी होते. त्यांत दाते खेळाडू या दृष्टीनें अगदीं कुचकामाचा होता. पण त्याला दुलीपसिंहाचें नांव ऐकून पाठ होतें. त्यानें पी. विठ्ठलला एकदां मुंबईच्या रस्त्यावर पाहिला होता. वडिलांच्या बरोबर त्यानें मुंबईला एकदोन नांवाजलेले सामने पाहिले होते. प्रोफेसर देवधर तर त्याच्या बंगल्याच्या मागच्या बाजूला रहात होते. एवढ्या ज्ञानाच्या जोरावर तो खूप बढाया मारी. खेळण्याच्या सामानाचा मालक म्हणून कप्तानपद तर त्यानें उघडउघड बळकावलें होतें. आणखी एक त्याचा गुण विजयच्या निदर्शनास आला. दुसऱ्याचा उत्कर्ष सहन करण्याचें औदार्य दातेच्या अंगीं बिलकूल नव्हतें. एखादा मुलगा चांगली टोलेबाजी करूं लागला कीं तो हुकूम सोडी—" तूं आतां रिटायर हो." खेळणारा मुलगा हटून बसे. तो म्हणे, " मला आऊट काढा. मी तसा कां जाईन...?" यावर दाते हिरवा निळा चेहरा करून ओरडे, " सामान माझं आहे. माझं ऐकायचं नसेल तर टीममधून चालता हो, कांहीं अडणार नाहीं आमचं तुझ्यावांचून. मी एकटा शंभर रन्स काढीन. वेळ पडली तर दोनशेंसुद्धां काढीन. मर्चंट कसा तें मी प्रत्यक्ष पाहिलं आहे— "

' मग तें कावळ्या-चिमणीनं सुद्धां पाहिलं आहे— " एक शिवरामपंत खवचटपणानें मधेंच म्हणाले.

" मग तूंहि जा आमच्या टीममधून. मी एकटा दोन्ही बाजूनं बोलिंग टाकीन. मनकडचं बोलिंग मी पाहिलं

आहे—" दाते. त्या दिवशीं खेळाऐवजीं वादविवाद रंगांत येई. दुखावलेला खेळाडू तावातावानें टीममधून नांव काढून घेई. पण पुन्हां दुसऱ्या दिवशीं त्वयार्थं मयार्थं करून दाते त्याला टीममधें दाखल करून घेई.

परंतु एकंदरीनें पहातां दातेचें कप्तानपद फार जणांना अवघड वाटूं लागलें. त्याच्या लहरीप्रमाणें खेळाचे नियम बदलत असत. दाते खेळूं लागला कीं क्रिकेटचे नियम अतिशय लवचिक होत. त्याला दोन पित्तू लागत. लागोपाठ तीन वेळां खेळण्याचा त्याचा हट्ट विलक्षण असे. पण इतरांना तो मान्य करावाच लागे. नाहीं तर दाते स्टंपा खाकोटीला मारून चालूं लागे. 'सबकुछ हम्' हा त्याचा दंडक होता. विजय धूर्तपणानें त्याच्या वांटेस गेला नाहीं. एके दिवशीं शेजारच्या वर्गाशीं मित्रत्वाचा सामना ठरला.

कप्तान दाते त्या दिवशीं दुपारीं बारा वाजतां सर्व सामानासह ग्राउंडवर हजर झाला. निदान दिसण्यांत तरी तो कप्तान शोभत होता हें कबूल केलें पाहिजे. मुंजींतले रेशमी कपडे चढवून तो एका उंच दगडावर उभा होता. इतरांपेक्षां आपण निराळें दिसावें, उठून दिसावें ही त्याची अपेक्षा होती. कोठून तरी पैदा केलेली कोटी कॅप त्याच्या शिरावर झळकत होती. नवें कोरें स्कोअरबुक हातांत धरून तो प्रतिपक्षियांची वाट पहात होता.

" आज आपली सेंचरी. आत्तां वाटल्यास मांडून ठेवा. सेंचरी नाहीं काढली तर बॅट हातांत धरणार नाहीं—" एका बावळट मुलाला दाते पटवून देऊं लागला. सर्वांनीं त्याचीं मुक्ताफळें ऐकलीं आणि कौतुकानें माना डोलावल्या.

पण एक शंकेखोर निघालाच. तो बोललाच, "आज तरी कशाला बॅट हातांत धरतोस ? आम्ही आहोंत कीं—"

दाते डोळे वटारून त्या मुलाकडे पाहूं लागला. पण सुरुवातीसच झगडा नको या विचारानें त्यानें हा उघड अपमान गिळून टाकला आणि इतरांचें लक्ष दुसरीकडे वेधावें म्हणून म्हणाला, "आज केळीं आणलीं आहेत. झालंच तर भत्ता दोन पिशव्या भरून आणला आहे. पेरू आणण्याचा माझा बेत होता. पण आई पैसे देईना. या मोठ्या माणसांना कांहींच समजत नाहीं. एक मॅच खेळावी म्हटलं तर म्हणे, पैसे कशाला ? खेळून खेळून आम्ही काय दमत नाही ? आम्हांला भूक लागत नाहीं——?"

मुलांनीं या प्रश्नाला मात्र मोठ्या भक्तिभावानें होकारार्थी उत्तर दिलें.

लहान मुलांची मॅच असली तरी चुरस ही मोठ्यांत काय किंवा लहानांत काय सारख्याच प्रमाणांत दिसून येणार. पावसाचे दिवस होते तरी ऊन रणरणत होतं. उन्हानें सर्वांचे चेहरे काळवंडून गेले होते. तोंडाला कोरड पडली होती. अंगाला घामाचे झरे फुटले होते. धांवून धांवून धाप लागली होती. पण एकजण निरुत्साही दिसेल तर शपथ ! आजच्या आपल्या पराक्रमावर सर्व कांहीं अवलंबून आहे या दृढ विश्वासानें प्रत्येकजण प्रयत्नांची शिकस्त करीत होता. टॉस जिंकला दातेनें. बॅटीचें पाणी दाखविण्यास अधीर बनलेल्या बाळानें बॅटिंग पत्करलें. स्कोअरबुकावर पहिलें नांव त्यानें स्वतःचें घातलें.

"तूं कॅप्टन आहेस. पहिला जाऊं नकोस." एकानें सूचना केली.

" मर्चंट नेहमीं पहिला जात असतो. मला सगळं माहीत आहे. तुम्ही स्कोअरबुक संभाळा. माझ्या रन्स मी मोजणार आहें. त्या मांडण्यांत जर का चूक झाली तर पहा आपला विचार—" दातेनें बोलतां बोलतां पायाला पॅडदेखील बांधून टाकलें. त्याच्या सल्ल्यानें अकरा नांवें मांडण्यांत आलीं. विजयच्या वांट्याला दहावा नंबर आलेला पाहून एका मुलानें नापसंति दर्शवली, " तो खरंच छान खेळतो. रोज आपण पहात नाहीं का—?" एका मुलाच्या तरी मनांत सत्प्रेरणा जागी झालेली दिसली. पण दाते दुसऱ्याच्या सल्ल्यानें वागणारा कप्तान नव्हता. त्यानें आपलें म्हणणें मागें घेण्याचें साफ नाकारलें.

इतक्यांत प्रतिपक्षियांकडून अंपायरची मागणी आली. विजयच्या हातांत स्कोअरबुक देण्याचें दातेनें प्रथम ठरविलें होतें. फडतूस मुलाला यापेक्षा जास्त चांगलें काम कोणतें देतात ? पण त्याच्या मनांत या क्षणीं निराळीच शंका आली. आपण विजयला शेवटून धाडीत आहों या रागावर त्यानें आपल्या दहापांच रन्स कमी मांडल्या तर—? छट्! त्यापेक्षां त्याला उन्हांत उभं राहयला लावलें तर—?आपण विजयला अंपायर म्हणून धाडण्यांत आणखी कांहीं धोका पत्करीत आहों किंवा कसें हें लक्षांत येण्याच्या आंत त्यानें विजयची रवानगी केली. आणि विजय स्टंपाजवळ उभा राहिल्यावर त्याच्या मनांत तो विचार अकस्मात् चमकून गेला ! पण आतां बाण हातांतून सुटला होता.

मॅचला सुरुवात झाली. पहिल्या चेंडूनें दातेचा त्रिफळा उडवला ! पण दातेनें आरडाओरडा करून दोन्ही अंपायरना पटवून दिलें कीं, हा ट्रायल बॉल आहे. हा देवाचा

डाव असतो—सुरुवातीलाच भांडण जुंपण्याचा योग आला होता; पण काळ आला नव्हता. प्रतिपक्षाच्या कॅप्टननं पड खाल्ली. दोन्ही अंपायरना आपला निर्णय मागें घ्यावा लागला. ‘ झिरोवर गेलास म्हणून असा चिडूं नकोस—’ हा टोमणा द्यायला मात्र दुसरा कप्तान विसरला नाहीं. विशेष त्रास न पडतां एक ओव्हर संपली. म्हणजे बोलरनें एकहि चेंडू सरळ न टाकल्यामुळें दाते जागा धरून होता. तिसऱ्या ओव्हरींत पहिला चेंडू अपेक्षेपेक्षां जास्त उंच उडाला. दातेनें बॅट उगारली पण चेंडू कुठेंतरी कडेला लागून अडवणाऱ्याच्या डोक्यावरून सीमापार निघून गेला. दातेनें गाल फुगवून आपल्या दोस्त मंडळींकडे पाहिलें. टाळ्यांचा कडकडाट झाला. पहिला फटका चाराचा! आतां फक्त शहाण्णव राहिल्या होत्या! अं ऽ ऽ ऽ!

पण दातेच्या पायानें दगा दिला. कुठेंहि उभें राहून चेंडू टोलावण्याचा त्याचा शिरस्ता होता. चेंडू त्याच्या पायाला लागला. ‘ How's that? ’ म्हणून मुलें ओरडलीं. दोन्ही अंपायरनीं एकदम बोटें वर केलीं.

दाते खवळून उठला. “ वा: वा: ! हा कसला औट ! मी क्रीझच्या बाहेर होतों. खोटा आऊट देतां काय— ? ” दाते शरणागति पत्करण्यास राजी होईना आणि या खेपेस विरुद्ध बाजूनें त्यानें निघून गेलेंच पाहिजे हा आग्रह धरला. विजयनें दातेला खूप समजावून सांगितलें. पण दाते त्याच्यावर एकदम उलटून म्हणाला, “ तूं लुच्चा आहेस, तुला दहावा घातला म्हणून हा असा सूड घेतोस काय माझ्यावर? बच्चंजी, उद्यांपासून तूं आमच्या खेळांतून कटाप— ”

अखेरीस सर्वांच्या विरोधापुढें दातेला हार खावी लागली. तोंडाला फेंस येईपर्यंत तो बाचला. पण शेवटीं हातवारे करीत झाडाखालीं जाऊन बसला. आपल्याला मुद्दाम खोटा औट दिला आहे हें आपलें म्हणणें त्यानें सोडलें नाहीं. मॅचमधील त्याचें औत्सुक्य मावळलें. फक्त आतां बॉलिंगच्या वेळीं पाहून घेण्याचें त्यानें ठरवलें. त्याचा हा निर्णय ऐकून एकजण अंगावर शहारे आल्यासारखें करून म्हणाला, " म्हणजे, तूं स्वत: बॉलिंग घेणार आहेस ! "

" शंका आहे काय ? सहा चेंडूंत सहा विकेट्स् नाहीं पडल्या तर पुन्हां चेंडू हातांत धरणार नाहीं—" नहमीचें दळण त्यानें दळलें. मुलांनीं प्रत्यक्ष कपाळाला हात लावला नाहीं-पण त्यांच्या डोळ्यांत निराशेची चमक स्पष्ट दिसून आली.

आजचा दिवस त्यांना शुभदायक नसावा. पांच गडी औट झाले अन् रन्स तितक्याच झाल्या. इतर मुलांच्यांत विचार-विनिमय होऊन विजयला मधेंच धाडावें असें ठरलें. दातेला हा बेत पसंत नव्हता तरी पण धांवांची संख्या पाहून त्यानें " काय लागेल तें करा. मला विचारूं नका. मी जबाबदार नाहीं--" असें रोखठोक बजावलें.

विजयला परत बोलावण्यांत आलें. त्याच्या जागेवर दाते अंपायर म्हणून जाण्यास तयार झाला. कॅप्टनला अंपायर होतां येत नाहीं हा इतरांनीं पुढें केलेला आक्षेप त्यानें ठोकरून लावला. अंपायर म्हणून जाण्यांत त्याच्या मनांत निराळाच डाव होता. विजयवर सूड उगवण्याचा त्याचा अंतस्थ हेतु होता. सुडाच्या कल्पनेपुढें आपला, दुसऱ्याचा

हा भेदभाव वितळून जातो. स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्याच्या ईर्षेनें दाते अंपायर म्हणून उभा राहिला !

पण विजयनें त्याला संधि मिळूं दिली नाहीं. सारा जीव डोळ्यांत आणून तो लढत राहिला. पांच गडी बाद पांच धांवा या वेळीं तो बॅट धरून उभा राहिला. त्याच्या बरोबरचा गडी दहा पांच चेंडू खेळून परत गेला. सहा बाद अकरा धांवा झाल्या. सातवा गडी बाद तेहतीस धांवा झाल्या. होतां होतां नऊ गडी बाद बावन्न धांवा झाल्या. विजयच्या एकट्याच्या बत्तीस धांवा होत्या. शेवटची जोडी खेळूं लागली.

विजय विश्वासानें खेळत होता. बॅट मिरवण्यांत तो गर्क झाला. क्षणभरच तो स्वतःला विसरला. आपली रुखरुख विसरला. आणि तडफेनें खेळूं लागला. त्याच्या बाजूचीं मुलें त्याला सारा संकोच बाजूला ठेवन प्रोत्साहन देऊं लागलीं. दातेचा चेहेरा गोरामोरा झाला. विजय अजून त्याच्या तडाख्यांत सांपडला नव्हता !

विजयच्या स्वतःच्या एकेचाळीस धांवा झाल्या. एकंदर बासष्ट धांवा झाल्या होत्या.

विजयनें गर्रकन् बॅट फिरवली. चेंडू बोलरच्या डोक्या-वरून सीमेपार गेला. आणि विकेटकीपरच्या चपळाईमुळें म्हणा अगर वेंधळेपणामुळें म्हणा एक स्टंप जमिनीवर आडवी पडली. दातेनें औट म्हणन पुकारा केला आणि झाडाकडे पलायन केलें. सारीं मुलें विस्मयचकित होऊन सांवलीखालीं गोळा झाली. चांगला खेळाडू अनायासें खायला मिळाला तर कोण तक्रार करील ? पण हा दात्याचा

आत्मघातकी निरपेक्षपणा पाहून त्याच्या बाजूचीं मुलें त्याला भंडावून सोडूं लागलीं. विजयला आपण औट दिला हें दाते सांगेना. सांगणार काय कपाळ—?

विजय मनांतून खूप जळफळला. उपकारकर्त्याच्या हाताला कडाडून चावण्याची ही दात्याची तऱ्हा पाहून तो अतिशय संतापला. मध्यंतरीं दातेने आपली ढासळणारी लोकप्रियता थोपवून धरण्याच्या इराद्यानें टिफीनचें सामान कागदावर पसरून ठेवलें. विजयला भूक सपाटून लागली होती. पण मानीपणानें त्यानें त्या टिफीनला हात लावला नाहीं. दातेनें त्याला नंतर विशेष आग्रह केला नाहीं. तोंडांत चुरमुऱ्याचा भत्ता कोंबून तो आपल्या भगत मंडळींना समजावून सांगूं लागला, "शंभर धांवा मी सहज काढल्या असत्या. माझा चारचा फटका कसा होता? त्यावरून तुम्हांला छान कल्पना येईल. पण कांहीं माणसांना दुसऱ्याचं बरं पाहवत नाहीं. त्याला काय करणार? आज मी चांगला सेट झालों होतों. रन्स् म्हणजे हातचा मळ होता माझ्या! ठीक आहे. पाहून घेईन. बोलिंग मीच घेणार——! "

"दोन्हीहि बाजूनं तूंच टाकणार का!" खंवट दाणा थुंकून टाकीत एक मुलगा म्हणाला. दातेला तेवढी अक्कल होती. तो उदारपणाचें ढोंग करून म्हणाला, "एका बाजूनं मी अन् दुसऱ्या बाजूनं भिडे—"

मॅचला पुन्हां सुरुवात झाली. दाते चेंडू टाकूं लागला. मुलांना पळतां भुई थोडी झाली. भिडेचा हात दुखत होता. त्याच्याहि बाजूनें कांहीं आशा वाटेना. धांवांची संख्या चढूं लागली. चार गडी बाद झाले, ते स्वतःच्या मूर्खपणानें बाद झाले. आणि धांवांची संख्या पन्नाशी उलटून गेली

होती. मुलें फटाळून गेलीं. दाते दांतओंठ खाऊन चेंडू फेकूं लागला.

अखेरीस मुलांनीं बोलर बदलले तर ठीक आहे, नाहीं तर आपण चेंडू अडवणार नाहीं असें स्वच्छ सांगितल्यावर एका बाजूनें विजय व दुसऱ्या बाजूनें परांजपे ही जोडी चेंडू टाकूं लागली. पण मॅच हातांतून गेली होती हें स्पष्ट होतें सहा गडी खेळायचे आणि दहा धांवा फक्त करायच्या असा हा पेच टाकल्यावर कितीहि जगन्मान्य बोलर आणला तरी तो काय रडणार? पांचवा बळी परांजपे यानें घेतला. सहावाहि त्यानें लगेच घेतला. आतां फक्त सात धांवा कमी होत्या. चार धांवा कमी असतांना विजयनें आपला पहिला बळी घेतला. परंतु नवीन आलेल्या जोडीनें उरलेल्या धांवा भरून काढल्या!

पराजय झाला. तो होणारच होता. कर्णधार वारा प्यालेल्या वासरासारखा वागूं लागला तर जगांतला कोणता संघ विजयी होईल? पण पराजयाची तीव्रता बरीच कमी झाली. दुसरा डाव खेळण्याची दात्याला खुमखुम होती. पण पांच वाजून गेल्यामुळें डाव अपुरा राहण्याची भीति होती विरुद्ध बाजूचा कप्तान धोरणी होता. त्यानें पाहिलें, फुकट धांवपळ पाहिजे कशाला? आपल्याला बॅटिंग मिळालें नाहीं तर—?

त्यानें आपलें सैन्य रणांगणावरून काढून घेतलें. विजयघोष करीत त्यांची पलटण निघून गेली. आणि दात्याचें तोंड सुटलें. निःपक्षपातीपणाचा आव आणून तो पराजयाची कारणमीमांसा करूं लागला. "मला खोटा औट दिला नसता तर त्यांची काय बिशाद होती?" नाकपुड्या

फुगवून तो म्हणाला. विजयला आतां मात्र राहवेना. तो उसळून म्हणाला, "तूं खोटा औट अन् मी खरा औट नाहीं का? तूं एकटा शाहणा अन् सारं जग गाढव नाहीं का—?" त्याच्याकडे पाहून दाते कपाळावरचे केंस मागें सारीत मिष्किलपणानें म्हणाला, "आतां तूं रडणार वाटतं—"

विजयचें डोकें बिथरलें. त्यानें खालीं पडलेली स्टंप हातांत उचलून घेतली.

—आणि हां हां म्हणतां दोन तट पडले. विजयच्या आजच्या करामतीवर फिदा असलेले कांहीं प्रामाणिक जीव त्याच्या बाजूला जमा झाले. ज्यांना अजून उरलेल्या चुरमुऱ्याची आशा वाटत होती ते दात्याच्या झेंड्याखालीं गोळा झाले, आणि स्टंपनें चाललेली ही मारामारी रस्त्याला लागेपर्यंत टिकून राहिली. रस्त्यावरच्या लोकांनीं ही मारामारी सोडवली. जातां जातां दातेनें ओरडून विजयला म्हटलें, "उद्यांपासून तूं आमच्या टीममध्यें ये तर खरा—"

विजयनें कपाळावरच्या टेंगळाला हात लावून उत्तर केलें, "माझं अडलं आहे खेटर! बदमाष, हरामखोर—"

पुन्हां लोकांना मध्यस्थी करावी लागली. हाहि विरंगुळा विजयच्या नशिबीं नव्हता! घरीं गेल्यावर त्याचा अवतार पाहून माईंनीं त्याला यापुढें खेळायला जाण्याची सक्त मनाई केली. मानभावीपणानें त्या म्हणाल्या, "दुसऱ्याचा पोरगा घरांत ठेवूं नये म्हणून मी नेहमीं म्हणत असतें. पण माझं मेलीचं कुणी ऐकेल तर नं! आज कपडे फाडून आला, डोक्याला लावून घेतलंन्! उद्यां हा एखाद्या दरवड्यांत-

देखील सांपडायचा. अन् यायचं आपल्यावर! आम्ही लक्ष दिलं नाहीं म्हणून टेपर आमच्यावर यायचं. हें कसलं मुलखावेगळं खेळणं. अन् तुला अभ्यासाला आमच्या घरीं ठेवला आहे का हे धंदे करायला? खबरदार, पुन्हां सुट्टीच्या दिवशीं खेळायला गेलास तर! सुनबाई, अग सुनबाई, तुझ्या या लाडक्या भावाला आवर. मला हें असलं वागणं बिलकुल खपायचं नाहीं, सांगून ठेवतें—"

पुन्हां त्या दिवशीं रात्रीं विजयला आईची आठवण होऊन तो ओक्साबोक्शीं रडला!

★

सहामाहीच्या परीक्षेनें विजयला दगा दिला. आपल्याकडून तयारी चांगली झाली नाहीं हें त्याला समजत होतें. आपण सर्व विषयांत पास होणार नाहीं हेंहि त्याला दिसत होतें. पण सहामाहीचें गुण मांडलेलें प्रगतिपत्रक पाहून त्याच्या डोळ्यांपुढें एकदम अंधेरी आली. तो कोणत्याच विषयांत पास झाला नव्हता. 'खेळ' या विषयाचीसुद्धां त्याच्या शाळेनें परीक्षा ठेवली होती. या विषयांत पास व्हायला अकलेची काय गरज होती ? पण या मामुली विषयांत देखील तो उत्तीर्ण होऊं शकला नाहीं. एका मार्कानें त्याला तेथेंहि तोंडघशीं पाडलें होतें.

सुट्टींत तो घरीं गेला. प्रगतिपत्रक पाहून अण्णांनीं जें चमत्कारिक तोंड केलें तें पाहून त्याच्या जिव्हारीं घाव बसला. ज्या उत्सुकतेनें तो आईच्या प्रेमळ स्पर्शासाठीं धांवत आला ती उत्सुकता तिचें म्लान तोंड पाहतांक्षणींच जागच्या जागीं विरून गेली. आईला तोंड दाखविण्याची त्याला लाज वाटूं लागली. स्वतःच्या घरांत, आईच्यापुढें त्याला एकाएकी विलक्षण परकेपणा वाटूं लागला. आईनें आपल्याला जवळ घेतलें नाहीं, आपल्या तोंडावरून तिनें नेहमींप्रमाणें हातदेखील फिरवला नाहीं याचें त्याला अत्यंत वाईट वाटलें. आई आपल्याशीं कारणापुरतें बोलत आहे हें शल्य त्याला अस्वस्थ करूं लागलें. पर्वताच्या पोटांत

मावणार नाहींत एवढ्या तक्रारी आईजवळ त्याला सांगायच्या होत्या. आईच्याजवळ मनांतली मळमळ काढून टाकण्यासाठीं तो अधीर झाला होता. पण आईचें तें तुटकपणाचें वागणें पाहून त्यानें आवंढा गिळला. आईला आपण दुःख दिलें ही जाणीव त्याला बोंचूं लागली. विनाकारण रागवण्याचा आपल्या आईचा धर्म नाहीं हें त्याला माहीत होतें. आपल्या हातून आगळीक झाली म्हणून ती रागावली. तिनें दोनचार थपडा मारल्या असत्या तरी त्यानें आनंदानें सहन केल्या असत्या. पण आईचें हें मौनव्रत त्याला सहन झालें नाहीं. ही शिक्षा त्याला भयंकर वाटली. आपण एकटेच सर्वस्वीं दोषी नाहीं ही त्याला खात्री वाटत होती. पण हें आईला आतां कसें सांगायचें? रात्रीं तो लवकर झोंपला! रात्रीं एकदीडचा सुमार असेल; अचानक जाग आली त्याला. आई आणि अण्णा पलीकडच्या खोलींत दिव्याशीं बसले होते. आणि खालच्या आवाजांत कांहींतरी गंभीर आवाजानें बोलत होते. एकदोन वाक्यें त्याच्या कानांवर आलीं आणि त्यानें ओळखलें कीं आपल्याविषयींच त्यांचें बोलणें चाललें होतें. त्याची आई रडक्या सुरांत म्हणत होती, "कित्ती माझ्या कल्पना होत्या. तो वांकडा मुलगा नाहीं अशी अजून माझी खात्री आहे. पण—"

"आईला मुलगा कधींच वांकडा दिसत नाहीं. हें व्याहयाचं पत्र वाचून पहा. एकंदरीनं त्यांचीदेखील निराशा झालेली दिसते. एका विषयांत पोरगा पास होत नाहीं म्हणजे काय? आपलाच दाम खोटा, लोकांना बोल लावण्यांत काय अर्थ?" त्याचे वडील म्हणाले, "नाहीं—

मी आईच्या आंधळेपणानें बोलत नाहीं. त्याची चर्या पहा. त्याचे डोळे निरखून पहा. किती वाळला आहे पहा. कुठें तरी, कांहीं तरी त्याचं बिनसलं आहे. आज उद्यां केव्हांतरी तो मन मोकळं करून माझ्याजवळ सांगितल्याशिवाय राहयचा नाहीं. आज मीं त्याच्याशीं बोललें नाहीं. किती कष्टानं मी स्वत:ला आवरून धरलं! आंतड्याला पीळ पडत होता माझ्या! त्याचं तें अचावचा जेवण पाहून मला कोण भडभडून आलं! धड जेवला नाहीं तो. साईचें दहीं वाढ म्हणून हट्ट धरून बसायचा. पण आज त्यानं दहींभाताला बोट-देखील लावलं नाहीं. तुम्हींच सांगा, पोट दुखलं तर घांस गिळत नाहीं; हा नऊ महिने पोटांत वाढलेला गोळा असा हिरमुसलेला दिसला तर मला जेवण कसं गोड लागेल?', त्याची आई रडत म्हणाली. आईचें रडणें ऐकून विजयच्या पोटांत भयंकर कालवाकालव सुरू झाली. आईच्या दु:खाचें कारण त्याला उमगलें होतें!

थोड्या वेळानें अण्णांचे शब्द त्याला ऐकूं आले, "चार अक्षरं शिकला तर पोटाला खाईल, आईबाप काय जन्माला पुरतात कुणाच्या? आतां अकरा वर्षांचा हा मुलगा आहे. ह्याला एवढं कळायला नको? वर्षभर वाट पाहयची. सहामाहीप्रमाणें वार्षिक परीक्षेंतहि नाट लागला तर याला पुण्याला पाठविण्याची सोय नाहीं. याच्या हिताकरितां म्हणून व्याहयांच्या पायां पडलों. पैशाकडे पाहिलं नाहीं. मागेल तें याला मी पुरवलं आहे. नसेल त्याच्या नशिबीं तर होईल आचारी किंवा पाणकी. पोराचं नशीब बापाच्या कपाळावर कोरलेलं नसतं—"

" पण पोराचं नशीब आईच्या हृदयाला घर करीत असतं. जगानं लाथाडलं तरी आईला तें बापुडवाणं वाटतं. नाहीं हो. लोकांचा कांहीं तरी गैरसमज होत असला पाहिजे. माझा विजय वाईट नाहीं, अडाणी नाहीं, मूर्ख नाहीं— "

" जरा हलके बोल. तुझा तो मुलगा आहे आणि माझाहि पण मुलगा आहे. आई मुलाच्या पाळण्याच्या दोऱ्या हलवतें पण त्याच्या आयुष्याच्या दोऱ्या बापाला हलवाव्या लागतात. त्याच्या कल्याणाची काळजी मलाहि पण वाटते आहे. पण पोरगा असं वेड्यासारखं वागूं लागला तर आपण काय करावं ? त्याच्यापुढें कपाळ का फोडून घ्यायचं—?" अण्णा उद्वेगानें म्हणाले.

" कां नाहीं? तुम्हीं नाहीं पण मी त्याच्यापुढें कपाळ आपटून घेईन. वेळ पडली तर त्याच्यासाठीं मी जीभसुद्धां हासडायला कमी करायची नाहीं. माझा विजय चांगला मुलगा आहे. मी कधीं वाईट वागलें नाहीं. मग माझाच मुलगा वाईट कसा निघेल ? मी त्याची समजूत काढीन. मी त्याच्यापुढें पदर पसरेन. आईला हेंहि करावं लागतं-- " असें म्हणून आई डोळे पुशीत आपल्याच रोखानें दारांतून येत असल्याचें विजयला दिसलें. विजय मुकाट्यानें दडून राहिला. त्याची आई त्याच्या गादीजवळ येऊन थांबली. एक जोराचा हुंदका त्याला ऐकूं आला आणि दुसऱ्याच क्षणीं आईनें आपल्याला पोटाशीं घट्ट धरलेलें पाहून विजयनें दोन्ही हातांचा विळखा तिच्या मानेभोंवतीं घातला! विजयच्या डोळ्यांतून मोत्यांचे थेंब आईच्या तोंडावर सरसर ओघळूं लागले. दोन आणि दोन चार नद्यांचा अपूर्व संगम झाला ! विजय स्फुंदत स्फुंदत म्हणाला—

" आई, आई, मी चुकलों ग ! पुन्हां मी असा वागणार नाहीं. खरंच तूं म्हणतेस तसा मी चांगला आहें. पण–पण मला करमलं नाहीं. मी तुझ्यावांचून वेडा झालों. पण पुन्हां मी तुला त्रास देणार नाहीं. मी खूप खूप अभ्यास करीन. पास होईन— " त्या रात्रीं मायलेक गळ्यांत गळा घालून एका उशीवर डोकें ठेवून झोंपी गेलीं !

★

— ५ —

नंतर मग विजयनें माईच्या विरुद्ध आईजवळ एकहि तक्रार गुदरली नाहीं. आपली अभ्यासांतील नालायकी इतकी स्पष्ट असतांना जर आपण तक्रार करूं लागलों तर आपल्यावर आई विश्वास ठेवणार नाहीं असें त्याला वाटलें आणि आणखी एक महत्त्वाचा मुद्दा होता. विजयच्या आश्वासनानें स्वर्ग दोन बोटें उरलेली त्याची आई आनंदाच्या आकाशांत स्वैर भराऱ्या मारूं लागली होती. विजय पहिलींतून दुसरींत गेल्यावर त्याला कसले छान छान कपडे शिवायचे, किती रुपयांचे पेढे वांटायचे आणि त्याला आवडणारें श्रीखंड ओळीनें किती दिवस करावयाचें इत्यादि गोष्टी बोलून दाखविण्यांत ती सदोदित गुंग असे. तिच्या आनंदाचा विरस करण्याचें काम अवघड होतें. आईचा दुःखी-कष्टी चेहरा पहाणें म्हणजे कुणी तरी निर्दयपणानें आपल्या छातींत भाला खुपसणें अशा विचारानें तो या मुद्यावर गप्प राहिला. आईला त्यानें कांहींहि सांगितलें नाहीं.

सुटी भर्रकन् निघून गेली. सुट्टींत विशेष म्हणण्यासारखी गोष्ट म्हणजे अण्णांची पंतोजीपणाची लहर! शिक्षण हा विषय मुंबईंतील भाजी आणण्याइतका सोपा असल्याची पुष्कळांची बालंबाल खात्री असते. अर्थात् हा भ्रम असतो. पण आपल्यापैकीं बहुतेक सर्वजण केव्हां ना केव्हां तरी या

भ्रमाला वळी पडत असतात. अण्णांनीं एक दिवस ठरवून टाकलें. हिस्सेरशीचीं आणि काळकामवेगाचीं उदाहरणें विजयला त्यांनीं स्वतःच्या फावल्या वेळांत शिकवायला सुरवात केली. त्यांची साधीसुधी कल्पना ही कीं अलिकडच्या स्टेशनावरून गाडी निघाली म्हणजे त्या उभ्या यंत्राची खट्खट् किल्ली दाबतांच ज्याप्रमाणें लाइन क्लिअरचा गोळा सट्दिशीं निसटून हातांत येतो--बस्स् अगदीं त्याचप्रमाणें विजयला प्रश्न विचारला कीं लाही फुटल्याप्रमाणें उत्तर ताडकन् पुढें यावें. पण थोड्याच वेळांत त्यांना समजून आलें कीं, हा शिक्षणाचा प्रकार थोडा निराळा असावा. थोडासा आवाज चढवून त्यांनीं प्रश्न विचारले तरी विजय गप्पच. सरतेशेवटीं अण्णांचा स्वाभिमान दुखावल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. त्यांच्या कपाळावरच्या शिरा फुगीर दिसूं लागल्या. चेहरा लालबुंद पडला. संतापानें जीभ अडखळूं लागली. स्पष्ट शब्दोच्चार येईना. हातांतील पट्टी जमिनीला थोपटून थोपटून पिंजण्याच्या बेतांत आली. विजयचें नशीब जोरावर म्हणून मागच्या स्टेशनाहून गाडी पास झाल्याची वर्दी सदूनें याच वेळी आणन दिली नाहींतर संतापाच्या भरांत विजयला पितृराजांच्या हातांतील पट्टीचा थोडा फार प्रसाद खावा लागला असता. सदूचा निरोप ऐकतांच स्टेशनमास्तर गडबडीनें उठले. "कपाळ तुझं अन् माझं" अशाच अर्थाचें कांहीं तरी पुटपुटत अण्णा कामावर निघून गेले. विजयची आई स्वतःशीच हसत भाजी निवडीत आंतल्या बाजस बसली होती.

वडील गेल्यावर आई बाहेर आली. विजयची गोंधळ-लेली मुद्रा पाहून ती मोठ्यानें हंसून म्हणाली, "विजय,

कसलं उदाहरण आहे रे—?" खजील मुद्रा करून विजय खालच्या मानेनें पुस्तकें गोळा करूं लागला. त्याची आई त्याच्या शेजारीं बसली, आणि शिळोप्याच्या गप्पा आपण करतों त्याप्रमाणें सहज म्हणाली, "हीं गवंड्यांचीं अन मजुरांचीं कामं इथून तिथून सगळीं सारखीं. पैसे मात्र यांना भरपूर पाहिजेत. पण एक दिवस काम करतील अन् खुशाल काम अर्धवट टाकून चालते होतील. यांना बोलायची पुन्हां चोरी. माझ्या लहानपणीं या लोकांना लागलेली ही खोड अजून गेलेली दिसत नाहीं. बाई, बाई, बाई ऽ ऽ ऽ! जो गुण बाळा तो जन्मकळा म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. मी नगरच्या शाळेंत होतें त्या वेळीं मीदेखील अशीच तुझ्या-सारखी काहून जात असें—"

विजयला आश्चर्य वाटून तो म्हणाला, "तूं शाळेंत जात होतीस—?"

हंसल्यासारखें करून आई म्हणाली, "आई शाळेंत जात असे याचं तुला आश्चर्य वाटलं? अरे, पण खरं आहे तें. मीसुद्धां तुझ्यासारखी लहान होतें एकदां."

आईचा इतिहास ऐकण्याच्या इच्छेनें विजय दोन गाल दोन्ही हातांवर टेंकवून चटईवर पालथा पडला. त्याची आई सांगूं लागली, "मुलांना वाटतं आपली आई कशी लहान असेल? पण मुलांच्या आयासुद्धां एके काळीं लहान होत्याच. किल्ल्याच्या मागच्या बाजूला आम्हीं राहात असूं. आई मला रोज मारायची अन् शाळेंत पोहोंचवायची. आमची शाळा अगदीं भिकार होती. तुझी शाळा कितीतरी उत्तम आहे. आमची शाळा धर्मशाळेसारखी होती. तिच्या भिंतींना खूप भगदाडे पडलेलीं असत. आमचे मास्तर केंस

पिकलेले, दांत पडलेले, भुईला वांकलेले असत. त्यांचं बोलणं आम्हांला समजायचं नाहीं आणि आम्ही काय बोलत असू तें त्यांना ऐकायला यायचं नाहीं. ते मग आम्हांला पट्टीनं खूप झोडपून काढायचे अन् आम्ही शाळेंतून पळून जायचं. घरीं जावं तर आई मारील ही भीति. मग आम्ही स्टेशनवर जात असूं. वाटेनं झाडं दिसलीं कीं त्यांवर चढावं. सूरपारंब्या खेळाव्या–एखाद्याच्या मळ्यांत हळूंच शिरावं–आईला कळलं म्हणजे मग तिनं खूप बडवून काढावं."

"मग तूं तर अगदींच गरीब आई आहेस. तूं मला किंवा विनूला बोटहि लावत नाहींस—" विजय म्हणाला.

"त्याचं कारण आहे. तुझी खोटी स्तुति करीत नाहीं; पण माझ्यापेक्षां तूं जास्त चांगला आहेस. चांगल्या मुलाला मारायला कोणती आई पुढें येईल? तुम्ही मुलं आमच्यापेक्षां जास्त हुशार आहां. तुम्हांला आमच्यापेक्षां चटकन् कळतं. मागच्या पिढीपेक्षां पुढची पिढी जास्त हुशार असते. बरं पण; तें राहूं दे. तुझा तो लबाड गवंडी किती दिवस कामावर होता बरं? काय काय ठरलं होतं?—"

—आणि पांच मिनिटांत विजयला तें उदाहरण झकास समजलें. आणि रोज आईजवळ बसून नियमानें दहा उदाहरणें सोडवण्याचा त्यानें आपला निर्धार जाहीर केला.

त्या दिवसापासून अण्णांनीं आपलें पंतोजीपण आनंदानें सोडून दिलें! विजयला आईचें शिकवणें एकदम पसंत पडलें. त्यानें एके दिवशीं आईला विचारलेंदेखील कीं तूं कां मास्तर होत नाहींस? पोराच्या डोक्यावर प्रेमानें हात फिरवीत मातामाउली शांतपणानें म्हणाली, "विजय, त्याचं उत्तर मी दिलं तर या वेळीं तुला तें समजायचं नाहीं. तुझी

सुनंदाताईदेखील हाच प्रश्न मला नेहमीं विचारीत असे. बायकांचं जिणं कसं असतं हें त्या वेळीं तिला कळलं नव्हतं. आज तो प्रश्न ती मला विचारायची नाहीं. तूं मुलगा आहेस हेंच चांगलं आहे. तुला आम्हां बायकांची स्थिति किती परावलंबी असते याची कल्पना आज मुळींच यावयाची नाहीं. पण मोठा झालास म्हणजे तुला सारं कांहीं आपो-आप समजून येईल—"

ह्या उत्तरानें विजयचें समाधान झालेंसें दिसलें नाहीं. त्याची समजूत काढण्यासाठीं त्याची आई हंसून म्हणाली, " अरे वेडचा, असा गोंधळांत कां पडला आहेस ? मी उद्यां शाळेंत जाऊन तुझ्यासारख्या मुलांना शिकवूं लागलें तर तुला जेवायला स्वयंपाक कोण करील ? विनूला आंघोळ घालून पाळण्यांत कोण झोंपवील ? निवडणं आहे, टिपणं आहे, तुमचे कपडे फाटले तर ठिगळं जोडायचं काम आहे, तें कोण करील ? बायकांना घरीं ठिगळं जोडायचं काम फार असतं—"

विजयला हें कारण मात्र तावडतोब पटलं. त्याच्या विजारी आणि सदरे हा भरपूर पुरावा होता.

— या खेपेस विजय आईला सोडून जातांना पूर्वी-इतका बिथरला नाहीं. नाहीं म्हटलें तरी त्याचीं कानशिलं तापलीं होतींच. शब्द बाहेर पडायला राजी नव्हते. डोक्यांत चमक मारूं लागली होती. पण असहाय्य भावनेनें तो पूर्वींसारखा रडला नाहीं. फक्त सहा महिन्यांनीं पुन्हां परत यायचेंच आहे ह्या विचारानें त्यानें स्वतःवर ताबा ठेवला होता. गाडी वळणाच्या पुढें गेल्यावर तो एक दीर्घ श्वास सोडून किंचित् उदास मुद्रा करून जाग्यावर बसला!

विजयला पाहतांक्षणींच माईंनीं कपाळाला आंठ्या चढवल्या. त्यांची फार फार इच्छा होती कीं ही ब्याद परस्पर टळेल. सुटींत विजय घरीं गेला त्या दिवशीं त्यांनीं यजमानांकडून एक खलिता लिहून घेऊन त्याचे त्याच्या आलेल्या सदू पोर्टरला बजावून दिला होता. सुनंदेच्या सासऱ्याला तें काम आवडलें नाहीं परंतु घरांत तंटा नको या विचारानें त्यांनीं पत्रांतील मजकूर पत्नीच्या सांगण्यावरून लिहिला. मात्र तो सदूला देतेवेळीं पहिला कागद फाडून फेंकून दिला आणि त्याचे जागीं दुसरा पाकिटांत घातला. हा दुसरा कागद अर्थात्‌च निराळ्या मजकुराचा होता. त्यांत त्यांनीं एवढेंच म्हटलें होतें कीं 'मुलाची प्रगति निराशाजनक आहे हें अगदीं खरें आहे. पण त्यांत त्याचा कांहीं एक दोष नाहीं. परिस्थितीप्रमाणें बदलण्याची कला सर्वांनाच कांहीं लवकर साधत नाहीं. त्यांतून त्याला आईचें वेड बरेंच आहे असें तुमच्या मुलीच्या सांगण्यावरून समजतें. बच्चा आहे अजून तो. एकदोनदां ठेंच लागली म्हणजे शहाणा होईल.'

माईच्या मजकुरांत आणि या लिखाणांत जमीनअस्माना-चें अंतर होतें. माईंची तक्रार स्पष्ट होती कीं 'मुलाचें वागणें अगदीं तऱ्हेवाईक आहे. त्याला शिस्त मुळींच नाहीं. ती लावण्याचा प्रयत्न केला तर तो रडत सुटतो. तेव्हां अशा परिस्थितींत त्याच्याकडून यश मिळेल असें वाटत नाहीं.' इ. इ.

अण्णांना अर्थात् हा मजकूर वाचायला मिळाला नाहीं. मिळाला असता तर त्यांनीं काय केलें असतें हें जाणणें सोपें नाहीं. अपेक्षेविरुद्ध मुलगा पुन्हां आलेला पाहून अण्णांच्या

तोंडावर माई कांहीं बोलल्या नाहींत—पण अण्णा गेल्यावर त्यांनीं धुसफूस करायला सुरुवात केली. सुनंदाला राहून राहून वाटे की अण्णांना आणि आईला हा खरा प्रकार एकदां स्वच्छ सांगून टाकावा. उगाच त्या मुलाचे हाल काय म्हणून? पण तिच्या नवऱ्यानें तिला या भानगडींत न पडण्याविषयीं निक्षून सांगितलें होतें. नवऱ्याचें सांगणें आणि सासऱ्याचा दुजोरा या दुहेरी दडपणामुळें सुनंदा गप्प राहिली. घराची अब्रू झांकून ठेवणें तिला भाग पडलें. घरांत पडलेले हे दोन तट तिला आज दिसत नव्हते. गेलीं दोन अडीच वर्षें ती माईंचा माणूसघाणेपणा आणि नवऱ्याला आणि सासऱ्याला मनांतून वाटणारें इतरांचें अगत्य हे दोन विरोधी प्रवाह अनुभवीत होती. माईंचा कुजका स्वभाव तिलाहि कैक वेळां असह्य होई. नवऱ्याकडे किंवा सासऱ्याकडे आलेल्या एखाद्या माणसाला चहाचा कप देण्याचीसुद्धां तिला त्या घरांत चोरी होती. माई कुठें पुराणाला गेल्या किंवा नात्याच्या ठिकाणीं सणावारानिमित्त कांहीं करूं लागायला गेल्या म्हणजे तिला हायसें वाटे. त्या दिवशीं ती आल्यागेल्याचें स्वागत करी, आणि सासू घरीं येण्याच्या आंत सर्व पुरावा नाहींसा करण्यासाठीं जिवाचें रान करी.

विजय आलेला पहातांच तिला एक प्रकारें बरें वाटलें. तेवढाच एक आईच्या विश्वासाचा पुरावा झाला. आणि या खेपेस तिला सासऱ्यानें विश्वासांत घेऊन पोरावर लक्ष ठेवण्यासाठीं आग्रहाची सूचना देऊन ठेवली होती. कांहीं विशेष अडचण आली तर आपल्याला सांगण्याविषयीं

सासऱ्यानें तिला बजावून ठेवलें होतें. अर्थात् माईंना ही घरांत शिजत असलेली घटना बिलकूल माहीत नव्हती.

विजयला पहिले आठ दिवस बरेच जड गेले. आश्वासनें देतांना मनुष्य ज्या परिस्थितींत असतो ती परिस्थिति आश्वासनें पुरी करण्याचे समयीं टिकून रहात नसते. त्यानें आईजवळ वचन देऊन ठेवलें होतें, वाईट वाटून घेणार नाहीं. घरची आठवण काढणार नाहीं. अभ्यास झटून करीन. पण पहिल्या दिवशीं अभ्यासासाठीं तो पुस्तक उघडून बसला आणि बदललेल्या परिस्थितीची त्याला एकदम तीव्र जाणीव झाली. पुस्तकांतलें एक अक्षर त्याला वाचतां येईना. प्रत्येक अक्षर 'आई' 'आई' 'आई'! दुसरें कांहींच त्याला दिसेना. खरंच, आपल्याला मन नसतं तर— हा विचारहि त्या चिमुकल्या मेंदूला चाटून गेला! पुस्तकें त्यानें तशींच गोळा करून ठेवलीं व तो खिडकींत उभा राहून समोरच्या नारळीच्या झाडाकडे टक लावून पाहूं लागला. शेंड्याला नारळाचे झुपके लहडलेले दिसत होते. आईच्या खांद्यावर तीं बाळें किती विश्वासानें बसलीं होतीं. कितीहि जोरानें वारा आला तरी आईचा त्यांना भरभक्कम आधार होता. आकाशांत तळपणाऱ्या सूर्यनारायणानें बारा डोळे उघडले तरी त्या बाळांना आईच्या सांवलीची खात्री होती. आईला बिलगणारीं तीं सतेज बाळें पाहिल्यावर त्याचा कंठ दाटून आला.

पाठीमागें येऊन उभ्या राहिलेल्या माईंची चाहूल त्याला बिलकूल लागली नाहीं. तो तें समोर दिसणारें विलोभनीय दृश्य पाहण्यांत चूर झाला होता. मनानें तो त्या झाडाच्या शेंड्यावर आरूढ झाला होता. वीज

कडाडावी त्याप्रमाणें माई गरजल्या, "भरल्या घरांत रडायला लाज वाटत नाहीं? बोलावलं होतं का कुणी? मेणा अबदागीर धाडलीं नव्हतीं आम्हीं—"

विजयनें दचकून मागें पाहिलें. कधीं नव्हत् पहिल्या प्रथम त्यानें माईच्या दृष्टीला दृष्टी भिडवली.

"बेरडासारखा पाहतोस काय माझ्याकडे? आणखी डोळे फाडलेस म्हणून कांहीं तुझ्या डोळ्यांत मावणार नाहीं मी. मऊ लागलं म्हणून लागले कोपरानं खणायला. गांवांत बोर्डिंगं काय ओस पडलीं आहेत का—" माई संतापानें म्हणाल्या.

विजय कांहीं एक न बोलतां खालीं निघून गेला. कांहीं बायका देवता असतात आणि कांहीं बायका कैदाशिणीहि असूं शकतात हें सत्य पुष्कळ पुरुषांना संसार करूं लागल्यानंतर एकदोन वर्षांनीं पटूं लागतें; पण विजयला तें फार लवकर कळून आलें.

आणखी चारपांच दिवसांनीं त्याला हें सत्य अतिशय भडकपणानें पटलें.

दिवाळींत वाड्यांतल्या मुलांनीं अंगणांत मातीचा किल्ला केला होता. किल्ल्यावर मांडण्यासाठीं लागणारीं मातीचीं चित्रें मुलांनीं घरोघर भीक मागून गोळा केलीं होतीं. माईच्या चिरंजीवांनीं एक मातीचा वाघ आईच्या मागें भुणभुण लावून खरेदी केला आणि किल्ला तयार करणाऱ्या मंडळींत स्वतःसाठीं हक्काची जागा मोठ्या मिनतवारीनें मिळवून घेतली. दिवाळी संपून महिना होत आला तरी किल्ला अजून शाबूद होता. किल्ल्याचें प्रदर्शन भरवण्याचा मुलांचा हेतु होता. त्यासाठीं रोज निरनिराळी व्यवस्था

आंखली जाऊं लागली. मुलांचा उत्साह दांडगा असतो. पण त्या मानानें कार्य करण्याची क्षमता बेताबाताची असते. अनेक तंटेबखेडे होत. मुलें आपापसांत वर्दळीवर येत. एखादा मुलगा चिडून आपला भाग उचलून नेई परंतु दुसऱ्या दिवशीं दिलजमाई होई आणि काल गेलेलीं चित्रें आज त्या त्या जागीं निमूटपणें उभीं राहात.

माईंचा बाळू नुकताच आईच्या पावलांवर पाऊल टाकूं लागला होता. दिवसांतून एकदोनदां तरी त्याचें गाडें अडून बसे. त्या दिवशीं दुपारीं त्याची लहर फिरली. किल्ल्या-भोंवतीं रात मांडून शिकारी रानांत शिकारीसाठीं हिंडत आहेत असा देखावा करण्याचा मुलांचा बेत होता. बाळूचा वाघ जाळींत दडून बसला आहे असा भास निर्माण करायचा होता. पण आपल्याला आधीं विचारलें नाहीं या मुद्यावर बाळूनें खो घालायचा चंग बांधला. त्याची समजूत होण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां एकदोन मुलें विजयला सांगूं लागलीं. विजयला त्या मुलांच्या म्हणण्यांत कांहीं गैर दिसलें नाहीं. त्यानें बाळूला परोपरीनें सांगून पाहिलें पण बाळू माघार घेईना.

अखेरीस त्यानें आपला वाघ उचलला व तो तेथून जाऊं लागला. वाघाचें चित्र एकच असल्यामुळें मुलांची धांवपळ सुरू झाली. विजयनें बाळूचा हात घट्ट धरला. दुसऱ्या मुलानें बाळूचा वाघ पकडला. आणि गर्दीगर्दींत वाघ जमिनीवर पडला. बाळूनें सप्तमांत सूर धरून आईच्या कानांवर तक्रार घातली. मात्र वस्तुस्थितीचा पूर्ण विपर्यास करून त्यानें आईला सांगितलें कीं, 'विजयनें माझ्या हातांतून वाघ हिसकावून घेतला आणि फोडून टाकला.'

माईंना कारण पुरलें. त्यांनीं मुलाचा कैवार घेऊन जें थैमान घातलें त्याला तोड नव्हती !

माईंचा रणचंडीचा अवतार पाहून मुलांनीं तेथून पळ काढला. पण विजय कुठें पळणार होता—? माईंनीं विजयला जिभेच्या तलवारीनें शतशः जखम करून अर्धमेला करून सोडला. चाळीस वर्षांचा अनुभव जमेस असणारी बाई एका अकरा वर्षांच्या अध्र्याकच्च्या पोरावर तुटून पडल्यावर ह्या लढतीचा परिणाम न सांगतांहि समजणारा आहे. विजयला हा अन्याय असह्य झाला. त्याचें डोकें तापलें आणि तिरमिरींत त्यानें संध्याकाळच्या समयीं घर सोडलें. सुनंदा एकटी घरांत होती. ती काय करणार ? आई अंबाबाईची करुणा भाकण्यापलीकडे ती कांहींहि करूं शकली नाहीं.

विजयनें रागाच्या सपाटचांत घराचा उंबरठा ओलांडला. पाय नेतील तिकडे तो जाऊं लागला. कुठें जायचें, काय करायचें ह्याचा निश्चय करण्यास त्याला पुरेसा अवधि मिळाला नव्हता. दीडदमडीचा वाघ आणि त्याच्यासाठीं ही बाई एवढा आक्रस्ताळीपणा करूं शकते हें पाहून वाडचांतील इतर माणसेंहि थक्क झालीं होतीं. विजयला या साऱ्या प्रकारांत आपल्यावर होणारा अन्याय सहन होत नव्हता. त्याचा हातहि काधाला लागला नव्हता. त्यानें एकदां नव्हे, दहा वेळां माईंना आपली भूमिका पटवून देण्याची व्यर्थ धडपड केली. अखेरीस त्यानें या घरांत पाणी प्यायला राहयचें नाहीं हा विचार कायम केला. पुढचामागचा कांहीं एक विचार न करतां तो रस्त्यावर आला.

रस्त्यावरच्या गार वाऱ्यानें त्याचें तापलेलें मस्तक थोडें ठिकाणावर आलें. पण घरांत पाऊल टाकायचें नाहीं हा विचार त्यानें सोडला नाहीं. आजची रात्र मंडईच्या मोकळ्या पटांगणांत झोंपून काढावी आणि उद्यां तडक स्टेशन गांठावें असें त्याला वाटूं लागलें. तिकिटाशिवाय प्रवास करण्याचा त्याचा हा पहिला प्रसंग. पण त्याहि दिव्याला तोंड देण्याची त्यानें मनाची तयारी केली. सांपडलों तर काय करावयाचें तें त्यानें अजून ठरवलें नव्हतें. पण आपल्याला सहसा कुणी अडवणार नाहीं अशी त्याची मनोदेवता त्याला सांगूं लागली.

आईला वाईट वाटेल! खरं आहे. पण त्याला आपण तरी काय करणार? आईचा राग आपण हरप्रयत्नानें दूर करूं. आपल्याला वाड्यांतल्या लोकांची साक्ष आहे. आपली तक्रार बरोबर आहे अशी आईची खात्री पटेलच पटेल.

अण्णा रागावतील! कबूल. पण त्यांना खरा प्रकार कळल्यावर— !

कोणी कांहींहि म्हटलें तरी त्याला आतां पर्वा नव्हती. इतक्या उप्पर आई रागावली तर आपण रानांत जाऊन ध्रुवबाळाप्रमाणें तपश्चर्या करूं असाहि विलक्षण विचार त्याच्या डोक्यांत या वेळीं चमकून गेला!

रात्रींचे दहाचे ठोके मंडईच्या घड्याळानें दिलेले त्यानें मोजले. गार वारा सुटला होता. थंडी नुकतीच चमकूं लागली होती. त्याच्या अंगांत एक साधा शर्ट होता. दुपारच्या जेवणानंतर त्याच्या पोटांत कांहींहि गेलें नव्हतें. खाण्यासाठीं त्याला आसुसल्यासारखें होऊं लागलें. पोटांत कावळे कावकाव करूं लागले. पण मंडईच्या कट्ट्यावर

त्याला कुजक्या पाल्याशिवाय दुसरें काय मिळणार?' एकाएकीं त्याला कसली तरी विलक्षण भीति वाटूं लागली. आपण थंडीनें गारठून आणि भुकेनें व्याकूळ होऊन कसल्या जागेवर मरून पडलों तर— ?

तर सरकार माईंना फांशी देईल. ही कल्पना त्यांतल्या त्यांत समाधानाची वाटली त्याला. पण फिरून माई फांशी जातांना आपल्याला दिसणार नाहींत या वैगुण्याचें त्याला वाईट वाटलें. छे: ! मरण्याची कल्पना त्यानें डोक्यांतून काढून टाकली. आपण मेलों तर आईला काय वाटेल या विचारानें त्याचें डोकें बधिर होऊन गेलें. वाऱ्याची पुन्हां एक झुळूक आली. भोंवतालीं पडलेला कांद्याचा पाचोळा हवेंत उडूं लागला. रात्र अंधारी होती. समोरच्या चिंचेच्या झाडाची गर्द छाया नाना प्रकारचें रूप धारण करूं लागली. विजयनें भीतीनें डोळे घट्ट मिटून घेतले.

—आणि त्याला वाटलें, आपल्याला नेण्यासाठीं यम जवळ आला आहे. प्रतिकार करण्यासाठीं त्यानें हातपाय झाडायला प्रारंभ केला. कुणी तरी त्याला दंडाला धरून हलवीत मंजुळ आवाजांत म्हणत होतें, "विजय, जागा झालास का ?"

विजयनें डोळे किलकिले करून अंधारांत डोळे फाडून पाहिलें. प्रथम त्याला वाटलें, आई ! आणि याच भ्रमानें त्यानें 'आई ! ' म्हणून सुनंदेच्या गळ्याला घट्ट मिठी मारली. विजय झोंपेंत होता. आणि सुनंदा अलीकडे अंग भरल्यामुळें थोडीशी आईसारखीच दिसूं लागली होती. अंधारामुळें विजयची फसगत झाली. आपली चूक समजून आल्यावर विजय दूर होण्यासाठीं चुळबुळ करूं लागला पण

सुनंदा त्याला घट्ट धरून उभी राहिली. कांहींशा रडक्या, कांहींशा चिडक्या आवाजांत ती त्याला म्हणाली, "मला न सांगतां घराबाहेर पडलास! आईला हें कळलं तर कोणत्या तोंडानें मी तिच्यापुढें उभी राहूं? भूक नाहीं का लागली तुला! मुकाट्यानं घरीं चल पाहूं—"

सुनंदेच्या सासऱ्यानें त्याचें बोट धरलें. कांकूं न करतां विजय त्या दोघांच्याबरोबर पुन्हां घरीं परत आला. सुनंदा त्यानंतर त्याला वाटेनें कांहीं बोलली नाहीं. तिचा सासराहि स्वतःच्याच विचारांत गर्क झाला असावा. फक्त एकदांच त्यानें तोंड उघडलें आणि तेंहि विशेष कुणाला उद्देशून असें नाहींच. एक दीर्घ श्वास सोडून तो म्हणाला—"भारी कठीण! अन् याला लोक म्हणतात संसार!" यानंतर कुणीच कांहीं बोललें नाहीं.

सुनंदेनें विजयसाठीं पाटताट मांडलें. सगळ्यांचीं जेवणें झालेलीं दिसलीं. माई अजून झोपल्या नव्हत्या. पण त्या खालीं आल्या नाहींत. सुनंदा मात्र अजून जेवली नव्हती. रक्ताची ओढ तिला जाणवल्याशिवाय कशी राहील? विजयच्या पानांतच तिनें आपलें अन्न वाढून घेतलें. आणि मौज ही कीं विजयनें तोंडावाटें एक अक्षर काढलें नाहीं. ह्या वेळीं तो आपल्या घरीं असता आणि ताईनें त्याच्यावर हा जुलूम केला असता तर त्यानें घर डोक्यावर घेतलें असतें. बायकांच्या पानांत जेवायला बसणें त्याला एकदम नामंजूर असे. फक्त आईच्या बाबतींत अपवाद करायला तो राजी असे.

जेवण उरकल्यावर तो मुकाट्यानें माडीवर जाऊं लागला. पण सुनंदेनें त्याला खूण करून म्हटलें, "तुझी गादी

खालीं आणून ठेवली आहे. माझ्याजवळ निजायचं आज-पासून–" विजयचा आनंद गगनांत मावेना.

सुनंदाचा नवरा कॉटवर वाचीत पडला होता. विजय आंत येतांक्षणींच त्यानें विजयची गादी स्वतः पसरून दिली. "कु` गेला होता हवा खायला?" म्हणून त्यानें विजयची उशी हातानें थोपटीत हंसून म्हटलें. विजयनें उत्तर केलें नाहीं. त्याला स्वतःची लाज वाटूं लागली. गादीवर अंग लवंडून त्यानें पायालगतचें पांघरूण अंगावर ओढून घेतलें आणि सुनंदा खोलींत येण्याचे आधीं तो गाढ झोपीं गेला!

सुनंदा आंत आली. दिव्याच्या प्रकाशांत तिनें भावाच्या शांत–प्रशांत दिसणाऱ्या चेहेऱ्याकडे टक लावून थोडा वेळ पाहिलें. वर मान करून ती नवऱ्याला म्हणाली, "त्याचा कांहीं अपराध नव्हता. बाळूची समजूत पटली नाहीं. पण मुलांच्या भांडणांत इतकं हिरीरीनं आपण मोठ्या माणसांनीं पडण्यांत काय अर्थ आहे—?"

तिचा नवरा दिवा बंद करून म्हणाला, "तुझं म्हणणं बरोबर आहे. पण माझ्या आईसारखीं माणसं जन्मांत कधीं मोठी होण्याची आशा नसते त्याला काय करणार? कांहीं माणसं वयानं वाढतात पण बुद्धीनं वाढायचं त्यांच्या ध्यानांत येत नाहीं!"

एवढ्यावर हें प्रकरण थांबलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं माईंनीं आपली स्वतःची ट्रंक भरली, गादी दोरीनें आवळली, धाकट्या दोन मुलींचे कपडे बांधून घेतले, टांगा बोलावून आणला आणि शनवारांतल्या आपल्या धाकट्या बहिणीच्या घरीं प्रयाण केलें. जातांना तिनें नवऱ्याला,

थोरल्या मुलाला आणि सुनेला लख्ख सांगितलें—"राज्य तुमचं आहे. खुशाल नाचा. घरांतली लक्ष्मी नकोशी झाली आहे. माझं तरी काय अडलं आहे खेटर ? व्याह्यांना हत्ती घोडे धाडून वाजतगाजत बोलावून आणा आणि मी मेलें म्हणून टोलेजंग सत्यनारायण करा. मी ही निघालें-" त्यांना कुणी अडवलें नाहीं. बाळूनें भोकाड पसरलें. पण वडिलांनीं त्याला गप्प केलें. वाड्यांतलीं सारीं माणसें हा अघटित प्रकार पाहून विस्मयचकित झालीं. "आठ दिवसांनीं परत येईल. तोंपर्यंत आम्हांला जेवायला करून घाल—" सुनंदेचा सासरा आणि नवरा, दोघेहि एकदमच म्हणाले. अति झालें म्हणजे कोणत्याहि गोष्टीचें हें असें हसं होतें !

★

— ६ —

परंतु या वातावरणाचा विजयच्या मनावर परिणाम झालाच. आपल्यामुळें एका घरांत उदासीनता निर्माण हावी ह्याचें त्याला राहून राहून वाईट वाटूं लागलें. वाड्यांतल्या लोकांना तोंड दाखवणें त्याला शरमेचें वाटूं लागलें. वास्तविक त्याचा कांहीं अपराध नसल्यामुळें त्याला खिन्न होण्याचें कारण नव्हतें. पण तो अकालीं गंभीर बनला हें मात्र खरें. शाळेमध्यें आजवर तो कधींच इतरांशीं मिसळून वागला नाहीं. आणि नुकत्याच घडून गेलेल्या या घरगुती भांडणामुळें तर तो जास्तच अंतर्मुख बनला.

एका क्षुल्लक प्रसंगानें आयुष्याची दिशा बदलल्याचे दाखले जगांत भरपूर आहेत. विजयच्या बाबतींत अगदीं तसाच चमत्कारिक प्रसंग शाळेंत घडून आला. एके दिवशीं मुलांना मनापासून न आवडणारे शिस्तप्रिय शिक्षक कांहीं घरगुती अडचणीमुळें शाळेंत येऊं शकले नाहींत. तास रिकामा राहातां कामा नये, अडणी रिकामी राहातां कामा नये असाच एखादा नियम शाळाधिकाऱ्यांच्या कोडांत असल्यास कोण जाणे! त्या रिकाम्या तासाला कोकिळ-गुरुजींची योजना झाली. वर्गावर येतांना त्यांना दहा मिनिटें उशीर झाला. तेवढ्या अवधींत दातेप्रभृति मंडळींनीं वेळ जाण्यासाठीं एक और खेळ शोधून काढला.

वर्गाचा चिटणीस दाते—आणि त्याचीच अभिनव कल्पना! मग मुलांच्या उत्साहाला भरती न आली तरच आश्चर्य! जागा कोणीहि सोडायची नाहीं. एका गैरसावध मुलाचें दप्तर टपाल पद्धतीनें वर्गांत हातोहात फिरवायचें. हा खेळ सर्वांच्या दृष्टीनें मोठा करमणुकीचा असे. पण ज्या दुर्दैवी मुलाची पिशवी त्या हिसकाहिसकींत सांपडेल त्याचे हाल मात्र वर्णन करण्याच्या पलीकडेच असतात. दप्तर हस्तगत करण्यासाठीं तो बिचारा रडका चेहरा करून या ठिकाणाहून त्या ठिकाणीं वणवण फिरूं लागतो—आणि त्याची ती केंविलवाणी अवस्था पाहून इतर हंसत सुटतात.

एका मुलाचें दप्तर वर्गांत टोलावलें जाऊं लागलें. तो पोरगा घरांतील कडक शिस्तीच्या भीतीनें थरथर कांपूं लागला आणि दप्तर मिळविण्यासाठीं रडतरडत सैरावैरा धांवूं लागला. दप्तर दातेच्या हातीं लागलें. त्यानें चलाखी करून शेजारीं बसलेल्या विजयच्या हातांत तें दप्तर कोंबलें. विजयनें दप्तर आपल्या दप्तराजवळ ठेवलें—त्या मुलाला देण्यासाठीं तो थोडा वेळ थांबला—आणि याच वेळीं कोकिळगुरुजी वर्गांत शिरले.

शिक्षक हा मुख्यतः शिक्षण देण्यासाठीं वर्गात येत असतो पण वेळप्रसंगीं त्याला न्यायनिवाडा देण्याचें कार्य अनाहूतपणें करावें लागतें. पिशवीच्या मालकानें रडत आपली फिर्याद दाखल केली. दप्तर कुणाजवळ आहे ही चौकशी फार वेळ करावी लागली नाहीं. विजयनें त्या मुलाची पिशवी टेबलावर नेऊन ठेवली. मुलगा पिशवी उचलून डोळे पुशीत जाग्यावर जाऊन बसला. आणि कदाचित् मुलांच्या तक्रारी फार मनावर घेण्याजोग्या नसतात या वृत्तीनें कोकिळगुरुजी

या प्रकरणीं खोलांत शिरले नसते. पण विंचू डसल्याप्रमाणें तो मुलगा किंचाळला,

"सर, माझं मराठीचं पुस्तक अन् इंग्रजीचं पुस्तक पिशवींत दिसत नाहीं--"

"आणलं होतंस का पण--?" गुरुजींच्या या प्रश्नाला जोराचें होकारार्थी उत्तर आल्यावर कोकिळांनीं किंचित् सलगीच्या सुरांत म्हटलें, "अरे, आतां ही थट्टा फार झाली हं! देऊन टाका त्याचीं पुस्तकं पाहूं—" प्रत्येकानें आपल्याला माहीत नाहीं अशा अर्थाच्या मुद्रा केल्या. कोकिळ-गुरुजी आतां मात्र गंभीर झालेसे दिसले.

"तुम्ही प्रथम हा घाणेरडा खेळ खेळणं वाईट आहे. तो कां वाईट आहे हें तुम्ही प्रत्यक्ष पाहतां आहां. थट्टेची बाजू संपून गुन्हेगारीची प्रवृत्ती केव्हां सुरू होते हें नीट सांगतां येत नाहीं. आतां थट्टा संपली आहे. गुन्हेगारीची प्रवृत्ति कोणी नि केव्हां सुरू केली हें आतां आपल्याला पाहणें भाग आहे. अजून मी सांगतों, ज्यानं पुस्तकं घेतलीं असतील त्यानं कबूल करावं. त्याला मी सोडून देईन. फक्त पुन्हां असली थट्टा न करण्याचें त्यानें वचन दिलें पाहिजे. बोला, कोण वीरपुरुष कबुली देण्याचें धैर्य करतो—?"

वर्ग शांत होता! खेळकरपणाचें वातावरण जाऊन त्या ठिकाणीं स्मशानशांतता दिसूं लागली.

पुढील पाऊल स्पष्ट होतें. तो अप्रिय प्रकार टाळण्याची गुरुजींना फार, फार इच्छा होती. पण आतां मागें पाऊल घेणें म्हणजे भ्याडपणा ठरला असता आणि शिवाय चोराला उत्तेजन दिल्यासारखें झालें असतें. कोकिळांनीं तोंड वांकडें करून म्हटलें, "ठीक आहे, माझा नाइलाज आहे. मी

दोन वेळां संधी दिली आहे. तिसऱ्यांदा पुन्हां सांगतों. नाही कुणी कबूल होत?—नाहीं?—मग मला तुमच्या पिशव्या तपासल्या पाहिजेत. सर्व पिशव्या ओळीनं माझ्या टेबलावर आणून ठेवा. गोंधळ नको, गडबड नको. एकेकानं यावं."

सर्वांच्या पिशव्या टेबलावर गोळा झाल्या. तऱ्हेतऱ्हेच्या पिशव्यांचा एक लहानसा डोंगर टेबलावर उभा राहिला. प्रत्येक पिशवी तपासून कांहीं नाहीं असें दिसतांच ज्याची त्याला परत मिळूं लागली. सुमारें पंधरा पिशव्या अशा तऱ्हेनें निरपराध म्हणून ज्याच्या त्याला परत मिळाल्या.

—आणि सोळाव्या पिशवींत त्या मुलाचीं हरवलेलीं दोन पुस्तकें सांपडलीं. पिशवी कुणाची?

विजय कावराबावरा होऊन जागचा उठून उभा राहिला. अडखळत तो म्हणाला, "पिशवी माझी आहे पण त्यांत माझ्या पुस्तकांशिवाय दुसऱ्याचं पुस्तकं येणं शक्य नाहीं."

"तें आलं आहे खरं! आतां मी पुढें या बाबतींत काय करावें हें तूंच सांग म्हणजे झालं—" कोकिळगुरुजी अत्यंत सभ्यपणानें म्हणाले. पण विजयला ते शब्द करवती-प्रमाणें भासले. त्यानें खालीं मान घातली आणि डोळ्यांत उगम पावणारे अश्रुबिंदू कोटाच्या बाहीनें पुशीत तो म्हणाला, "मी चोर नाहीं. पुस्तकं मी घेतलीं नाहींत—"

"हें पहा, बाळ, रडून नेहमींच कांहीं लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकतां येत नाहीं. तूं मुद्देमालासह सांपडला आहेस. हीं पुस्तकं तुझ्या दप्तरांत सांपडलेलीं आहेत. सगळ्या वर्गानं तीं पाहिलीं आहेत. आतां उगीच कांगावा कशाला करतोस? तूं नवीन आलेला मुलगा नाहीं का?

तुला आणि तुझ्या वडिलांना मीं पहिल्या दिवशीं पाहिलं होतं. तुझ्या वडिलांचा पत्ता एका कागदावर लिहून शाळा सुटल्यावर मला आणून दे. तुला शिक्षा काय करायची हें त्यांच्याच तोंडून निघालं म्हणजे चांगलं होईल. बापाला तरी आपल्या चिरंजिवांची लायकी एरव्हीं कशी कळणार?"

इतक्यांत त्या पुस्तकांचा मालक मधेंच उठून म्हणाला, "सर सर—"

कोकिळांनीं त्याला खालीं बैस म्हणून खूण केली आणि म्हटलें, "मला आतां यापुढें कुणाचाहि खुलासा नको. अप्रिय गोष्टी टाळण्यासाठीं मी आधीं धडपडत असतों. पण त्या टाळतां आल्या नाहींत तर त्यांना निर्भयपणानें तोंड देण्याची माझी खंबीरपणाची वृत्ति असते. बरं का रे बाळ, शाळा सुटल्यावर मला शिक्षकांच्या आरामशाळेंत भेटायला ये—"

—आणि त्याच वेळीं तासाची घंटा झाल्यामुळें कोकिळ-गुरुजी निघून गेले.

विजयला दिवस अत्यंत वाईट गेला. चोरीचा आरोप्य आपल्यावर आहे हें आईला कळलें तर— जी गोष्ट स्वप्नांत सुद्धां आपण करणार नाहीं ती गोष्ट आपण केली आहे, भरपूर पुरावा आपल्याविरुद्ध आहे आणि कोकिळ-गुरुजींसारखा सच्छील शिक्षक आपल्याविरुद्ध तक्रार करीत आहे—म्हणजे आपला निरपराधीपणा आपल्या आईला देखील मान्य करतां येणार नाहीं हें त्याला स्वच्छ दिसूं लागलें. म्हणजे हा काय नसता गोंधळ—?

शाळा सुटल्यावर तो आरामशाळेच्या रोखानें जाऊं लागला. त्याच्याबरोबर दुसराहि एक मुलगा तिकडेच

निघाला. हरवलेल्या आणि नंतर सांपडलेल्या पुस्तकांचा मालक त्याच्याबरोबर आला होता. विजय त्याच्याशीं बोलण्याच्या मन:स्थितींत नव्हता. तो मुलगा आपण होऊन म्हणाला, "मी सरांना सागणार आहे. खऱ्या चोराचं नांव मला माहीत आहे."

परंतु मुलाच्या गोंगाटांत विजयला तें ऐकूं आलें नाहीं. परिस्थितीचीं भेसूर चित्रें त्याच्या डोक्यांत तुफानी वेगानें धांगडधिंगा घालीत होतीं. शून्य मनानें तो कोकिळ-गुरुजींच्या समोर उभा राहिला. मघाचा तो मुलगा त्याच्या पाठोपाठ आंत गेला. कोकिळगुरुजी त्या दुसऱ्या मुलाला खुणेनें 'जा' म्हणून सांगूं लागले. पण तो मुलगा गेला तर नाहींच, उलट गुरुजींच्या डोळ्याला डोळा देऊन आवेशानें म्हणाला, "पण चोर निराळा आहे. दातेनं माझी पिशवी घेतली आणि याच्याजवळ देण्याच्या आधीं पुस्तकं काढून घेतलीं. शेजारीं बसलेल्या परांजपेला विचारा. दाते रागवेल म्हणून त्यानं मघाशीं सांगितलं नाहीं. दाते नेहमींच अशा चोऱ्या करतो. श्रीमंताचा मुलगा आहे म्हणून कुणाला त्याचा संशय येत नाहीं. पण त्याच्या वडिलांनीं एकदां-दोनदां अशा चोऱ्या केल्याबद्दल त्याला मारलं आहे. परांजप्याला सगळं ठाऊक आहे. तो त्यांच्या बंगल्यांत राहात असतो. त्यानं मला मधल्या सुट्टींत सगळं सांगितलं आहे."

"मग तूं मला वर्गांत काय सांगणार होतास—?" कोकिळांनीं उत्सुकतेनें विचारलें.

"मला शंका आली होती. याचें दप्तर दात्याच्या हातांत असल्याचा मला अर्धवट संशय आला होता. म्हणून मी—"

"ठीक आहे. तूं जा आतां. उद्यां दात्याची मीं चौकशी करीन."

तो मुलगा विजयच्या तोंडाकडे आनंदानें पहात निघून गेला. आपलें काम झालें, या एका मोठ्या संकटांतून आपण अचानक सुटलों, अशा विचारानें विजय माघारीं जाण्यासाठीं वळला.

"अरे, थोडा थांब; तुला घरीं जायची फार घाई आहे का? नसली तर माझं एक काम आहे म्हणून विचारलं–" बोलतां बोलतां कोकिळगुरुजींनीं विजयच्या दोन्ही खांद्यांवर आपले हात टेकवले. संध्याकाळीं ८ वाजेपर्यंत आपण घरीं गेलों नाहीं तरी फारसें बिघडणार नाहीं हें विजयला ठाऊक होतें.

"अच्छा! मग तुला आत्तां माझ्या घरीं आलं पाहिजे. आपल्यांत एक जुनी समजूत आहे. साधूच्या छळासाठीं प्रायश्चित्त म्हणून परमेश्वराला देखील बळीच्या दारावर पहारा करण्याचें काम कांहीं वेळ करावें लागलें. थांब, आलं माझ्या लक्षांत; तसंच केवळ मी करणार आहें अशांतला भाग नाहीं. पण कां कुणास ठाऊक, मला तुला कांहीं इतर गोष्टी विचाराव्या असं वाटूं लागलं आहे. तुझा अन् माझा परिचय फार थोडा आहे. तो वाढवावा असं मला वाटतं आहे. असं कां वाटावं म्हणून विचारशील तर त्याला मला उत्तर देतां येणार नाहीं. वाटतं एवढं खरं आहे. चलतोस—?"

विजयला त्यांच्या बोलण्याचें अतिशय कौतुक वाटलें. एवढा मोठा गृहस्थ आपल्याएवढ्या मुलाशीं बरोबरीच्या नात्यानें बोलतो हीच एक गोष्ट त्याच्या दृष्टीनें नवलाची

होती. इतका गोडीनें बोलणारा हा एकच शिक्षक त्याला आजवरच्या आयुष्यांत पहिल्या प्रथम भेटला होता. त्यांच्या साध्या स्पर्शांत देखील किती आपुलकी भरलेली होती ? ते बोलतांना तोंडांत खडीसाखर धरीत असावे. विजय त्यांच्या पाठोपाठ चालूं लागला !

शनवारांतल्या एका जुनाट वाड्यापाशीं ते दोघे थांबले. कोकीळ अंगणांत गेल्याबरोबर एक परकरी पोरगी 'काका, काका' करीत त्यांच्या दिशेनें धांवत आली. तिला वर उचलून घेऊन कोकिळांनीं विजयकडे हात करून म्हटलें, "मथु, तुला आज एक दोस्त आणला आहे खेळायला. पाहिलास ! तुझ्यासारखाच रडका आहे वरं का तो. वरं नाहीं ऽऽ! आई आहे का घरांत—! तिला म्हणावं, आम्ही माडीवर आहोंत. आम्हांला काय लाडू, पोळ्या, जिलब्या देणार आहांत त्या माडीवरच धाडून द्या हं. अन् बरणींतला खाऊ तूं स्वत: घेऊन ये बरं का ! दोस्ताला कांहीं तरी खायला द्यावं लागतं पहिल्या प्रथम. उगाच कोण कुणाची दोस्ती पत्करील ? "

विजय त्या मुलीकडे पहात गुरुजींच्या मागोमाग माडी-वर गेला. मथु त्याच्यापेक्षां दोनतीन वर्षांनीं लहानच होती. पण एक नंबरची इरसाल ! नव्या दोस्ताच्या पाठींत एक हलकेच गुद्दा मारून ती आईच्या नांवानें पुकारा करीत आंत पळून गेली !

बोलतां बोलतां विजयनें त्या दिवशीं आपलें अंत:करण उघडें करून दाखविलें. त्याच्या मनावर पडलेलीं दडपणें त्याला असह्य झालीं होतीं. तीं दडपणें तो आपल्या आईला विश्वासांत घेऊन दूर करूं शकला नाहीं. आईला दु:ख

होईल, तिला त्रास होईल या विचारानें अनेक तक्रारी त्यानें आजवर मनांतल्या मनांत दाबून ठेवल्या होत्या. त्या सांचत सांचत आल्या होत्या. त्या ढिगाऱ्याखालीं तो चेपला गेला होता. कुणाजवळ तरी त्या सांगून टाकण्यास तो उत्सुक झाला होता, अधीर झाला होता. कोकिळांचा आणि त्याचा परिचय सकृत्‌दर्शनीं पाहिलें तर अतिशय अल्प होता. पण कांहीं माणसें इतक्या गोड स्वभावाचीं असतात कीं शत्रुत्वाचा का होईना पण त्यांच्याशीं संबंध यावा असें आपल्याला वाटत असतें. आणि या ठिकाणीं तर मित्रत्वाच्या नात्यापेक्षांहि जवळचें नातें निर्माण झालें होतें. त्या नात्याला नांव देतां येत नव्हतें. पण मनांतून विजयची खात्री होती कीं हा गृहस्थ भला आहे.—आपल्या आईइतकाच भला आहे.

कोकिळांनीं त्याला मधेंच अडवलें नाहीं. लक्ष लावून त्यांनीं विजयची सारी कर्मकहाणी ऐकून घतली. कहाणीचा शेवट होतांच विजय एकदम शरमिंदा होऊन म्हणाला, "पण सर, हें मी कुणाला सांगणार नव्हतों. आईला देखील मी यांतलं कांहींएक सांगितलं नाहीं. कुण्णाकुण्णाला सांगायचं नाहीं असं मीं ठरवलं होतं."

त्याच्या पाठीवर हात ठेवून कोकीळ म्हणाले, "तेंच तुझं चुकलं. आणि त्यामुळंच तुला असा हा त्रास सहन करावा लागला. आईजवळ बोलला नाहींस हें ठीक झालं. पण तुझ्या वहिणीजवळ तरी बोलायचं होतं! दुःख गिळून टाकल्यानं तें पोटांत राहतं आणि तिथें वाढीस लागतं. कॅन्सरच्या रोगाप्रमाणें दुःख पसरत जातं. त्याची कायमची चिरफाड करायची म्हणजे एकच मार्ग. विश्वासांतल्या

माणसाजवळ त्याची वाच्यता जरूर करावी. माझ्याजवळ तूं आज बोललास हें फार छान केलंस. जरा हलकं वाटायला लागलं असेल! खरं कीं नाहीं?"

विजयचे डोळे चमकले. तो कसल्या तरी अनिर्वचनीय आनंदानें म्हणाला, "अगदीं खरं आहे—"

"माझा स्वतःचा हाच अनुभव आहे अगदीं! आणि विजय तुला दोन गोष्टी मी आणखी सांगणार आहें. तुझ्या हिताच्या आहेत त्या; रागावूं नकोस. पण प्रथमपासून तूं चुकला आहेस. आईवेगळं राहण्याची तुला एवढी खंत कां वाटावी? तुझी आई शंभर दीडशें मैल लांब असली तरी तुला वाटलं असतं तर तूं केव्हांहि तिला भेटूं शकला असतास. पण वयाच्या तिसऱ्या वर्षीं माझी आई स्वर्गाला निघून गेली. मला ती कुठें भेटली असती? माझ्यासारखीं दुर्दैवी माणसं जगांत काय थोडीं आहेत? वर्गांत चौकशी कर. कुणाचे वडील नाहींत, तर कुणाची आई नाहीं. असले वडील तर ते अंथरुणाला खिळलेले आणि असलीच आई तर तुझ्या बहिणीच्या सासूसारखी जहांबाज! असा हा दुनियेचा खेळ आहे. म्हणून म्हणतों, माणसानं फार मनाला लावून घेऊं नये. परमेश्वर करो अन् तुझी प्रेमळ आई तुला म्हातारपणापर्यंत उरो. पण एक लक्षांत ठेव, आईवेगळीं मुलं अत्यंत हुशार निघतात, हा जगाचा अनुभव आहे. आईच्या ओच्याला धरून उभं राहणारं पोर जन्मभर दुबळं राहतं. आईचा आधार नसलेलीं मुलं परिस्थिति तावडतोब हेरतात आणि स्वतःच्या पायावर उभें राहण्याची धडपड करतात.

प्रेमळ आई मिळणं हा सुदैवाचा भाग आहे; पण तिच्या लाडा-मुळं आपण आपलं भवितव्य विसरून कसं चालेल ? आज तूं लहान आहेस. उद्यां मोठा होशील. वयानं आणि बुद्धीनं मोठा होतो तोच मुलगा आईचे उपकार फेडतो. तूं वेडाटोणपा राहिलास तर हीच आई तुला लांकडानं मारील. माणसानं कालचा विचार विसरावा, उद्यांची काळजी करूं नये. आज काय चाललें आहे तिकडे लक्ष द्यावें. थोडासा बेडरपणा धरावा म्हणजे सगळं जमतं. मी नाहीं वाढलों ? आई गेली, वडील गेले, चुलत्यानें घराबाहेर हांकलून दिलें. तरी जगलों, मोठा झालों, वार लावून शिकलों. बेडरपणा धरावा म्हणजे आयुष्य सुखावह होतं. माणसांत मिसळावं, खूप खेळावं, खूप दांडगाई करावी, डरूं नये, सत्य सोडूं नये आणि असत्याकडे डोळे वटारून पहावं. तुझ्या आईला अन् वडिलांना एकदां भेटायची मला इच्छा आहे. असलीं प्रेमळ माणसं सहसा मिळत नाहींत. ”

कोकिळगुरुजींचें हें पल्लेदार भाषण विजय मन लावून ऐकत होता. त्यांचा प्रत्येक शब्द त्याच्या हृदयाचा ठाव घेत होता. हा अनुभव त्याला अगदीं नवीन होता. मोठा माणूस इतक्या कळकळीनें बोलतांना त्यानें आजच प्रथम पाहिला होता. वेळ काळ विसरून तो ऐकतच राहिला. आणि तें भाषण संपल्यावर आणखी कांहीं ऐकायला मिळेल तर बरें असें त्याला मनापासून वाटलें. वडिलांनीं कदाचित् चेष्टेनें म्हटलें असेल पण मथूनें खरोखरीच लाडू, करंज्या ताटांत घालून त्यांच्यापुढें आणून ठेवल्या.

“ हं उचल. खूप खावं एवढं सांगायचं मी विसरलों. पण माझ्या मुलीनं मला सांवरून धरलं आहे— ” असें

म्हणून कोकिळगुरुजी खूप जोरानें हंसूं लागले. लाडवाचा तुकडा तोंडांत टाकून ते पुढें म्हणाले—

"आपण उगीच काळजी करतों आणि न येणारीं संकटें कल्पनेनें निर्माण करतों. संकटें कधीं येणारच नाहींत असं माझं म्हणणं नाहीं. आयुष्यांत सगळेच दिवस सुखाचे कसे येतील? सुखाबरोबर दुःख हें येणारच. पण जें संकट टाळतां येणार नाहीं त्याबद्दल रडून तरी काय उपयोग? उद्यां आभाळ कोसळणार असेल तर पळण्याची घाई करून उपयोग काय? संकट आलें तरी जागा सोडूं नये. तोंडावरचं हंसूं कायम राहिलं पाहिजे. आतां हेंच बघ. ही आमची नकटी मथू कोण पत्करणार म्हणून मी रडत बसलों तर—"

वडिलांच्या तोंडावर दोन्ही हात ठेवून मथू चिडक्या सुरांत म्हणाली, " काका, हें हो काय? मी लग्नच करणार नाहीं—" " छान! म्हणजे तिकडून मला काळजी! पण मथे, मी शांत आहें. तूं कितीहि धमक्या दिल्यास तरी मला जें जें करायचं आहे तें मी मुकाट्यानं करीन. वेळ आली कीं हात धरून हांकलून देईन घरांतून—"

"आई, बघ ग—" म्हणत पाय आपटीत मथू खालीं निघून गेली.

घड्याळांत आठाचे ठोके पडलेले ऐकतांच विजय घरीं जाण्यासाठीं उठला. नाइलाजानें तो उठला. मनांतून त्याला कायमचें याच घरांत रहावें असें वाटत होतें. पण घरीं सुनंदा वाट पाहील म्हणून तो घरीं जाण्यास निघाला. रस्त्यांत आल्यावर कोकिळांनीं त्याला निरोप देण्यापूर्वीं आग्रहानें म्हटलें, " विसरूं नकोस. तुला जेव्हां लहर लागेल तेव्हां आमचं घर तुझंच आहे. आमच्या घरांतलीं आम्ही

तीन माणसें खरोखरी चांगलीं आहोंत, हंसतोस काय ? आपली आपण स्तुति करणारा मनुष्य नेहमींच कांहीं मूर्ख असत नाहीं. हा आमचा आत्मविश्वास आहे. अच्छा ऽऽ—"

विजय रस्त्यानें निघाला तेव्हां त्याच्या पाठीवरचें दुःखाचें गाठोडें तो कोकिळगुरुजींच्या माडीवरच विसरला होता !

★

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३३८४ नों. दि ........
वि. ओ. ९८ क्र. ........

## — ७ —

दुसऱ्याच दिवशीं त्यांच्या घरापुढें टांगा उभा राहिला. माई आणि त्यांच्या दोन मुली गेल्या तशा परत आल्या होत्या. दारांत उभ्या असलेल्या विजयकडे जाळून भस्म करण्याच्या दृष्टीनें पाहात माई घरांत आल्या. आपल्या-वांचून घराचें कांहीं अडलें नाहीं हें पाहून त्यांना अत्यंत वाईट वाटलें. पण बोलायला तोंड नाहीं हें त्यांनीं ओळखलें. खोटया नम्रतेनें त्यांनीं सुनेशीं बोलायला प्रारंभ केला. "काय ग, मी सैंपाक केला तर चालेल का ? हो, आपलं घराच्या मालकीणबाईंना विचारलेलं बरं ! परवानगी देणार असलीस तर चार भांडीं उतरतें चुलीवरचीं आणि कष्टाचे दोन घास खातें. दिवस फिरले. कुणाला बोलून दाखवायचं? या घरांतच मरायचं आहे माझ्या नशिबीं. पाठची बहीण पण तिलाहि माझी अडगळ वाटायला लागली. राहिलं माझं. आतां राज्य तुमचंच आहे—"

सुनंदा खरोखरीच आईला शोभणारी मुलगी होती. एका शब्दानें तिनें सासूला दुखवलें नाहीं. सासूचा स्वभाव आतां तिला पाठ झाला होता. अद्दल घडलेली सासू परत आली म्हणून तिला उलट उत्तर करणें सुनंदेला उचित वाटलें नाहीं. पण, एवढं मात्र तिला बरें वाटलें कीं सासूच्या न कळत उच्चारलेल्या भविष्यवाणीप्रमाणें आतां तिचे बरे दिवस आले होते. आतां घरांतला बेबनाव पूर्वी-

इतका प्रखर राहणार नाहीं हें पाहून तिला समाधान वाटलें. आणि खरोखरीच माईंच्या स्वभावांत हळूहळू पालट होत गेला. अर्थात् पिंजऱ्यांत कोंडलेली वाघीण प्रथम प्रथम शेपटी आपटणारच. पण पुढें पुढें शेपटींतला जीव नाहींसा होत जातो. वहिणीचा आधार कवडीकिंमतीचा आहे हा अनुभव आल्यामुळें माईंच्या डोळ्यावरची झांपड नाहींशी झाली. घरांतल्या माणसांशीं मिळतें 'घेण्यांतच शहाणपणा आहे हें धाकटया वहिणीनें शिकवलेलें शहाणपण त्यांना मुकाटयानें गिळावें लागलें. जें मानाचें सिंहासन त्यांनीं आततायीपणानें एकदां सोडलें तें मात्र त्यांना पुन्हां कधींच मिळालें नाहीं. घरांतील मंडळींनीं त्यांना शब्दानें सुनावलें नाहीं तरी पण कृतीनें त्यांनीं माईना जाणवून दिलें कीं जी बाई घराचा उंबरठा ओलांडते तिला पुन्हां कधींहि घरांत मालकीण म्हणून मिरवतां येत नाहीं.

माई धुसफुसत राहिल्या. स्वभावाला ठेंच हेंच एक औषध आहे. मात्र त्याचा गुण फार मंदगतीनें येत असतो. येतो एवढें निश्चित. सुनंदा त्यांना मान देई; पण विरोधाचा वास आला कीं आपल्याला जें योग्य दिसेल तें करून टाकी. होतां होईतों सासूला दुखवायचं नाहीं पण रास्त असेल तर आपला मुद्दा सोडायचाहि नाहीं हें तिचें यापुढचें धोरण ठरून गेलें!

—विजयच्या रदबदलीमुळें दातेची शिक्षा सौम्य झाली. आपल्याला त्या मुलाबद्दल एवढी आपुलकी कां वाटावी ह्याचें उत्तर त्याला कधींच सांपडलें नाहीं. दातेनें त्याला प्रथमपासून त्रासच दिला होता. तरी पण दाते आपला मित्र राहावा हीच विजयची इच्छा होती. दातेचें वर्गाचें

चिटणीसपद गेलें. त्याचे सर्व अधिकार काढून घेण्यांत आले. त्याच्याकडून अपराधाची लेखी कबुली घेण्यांत आली. तेव्हांपासून दाते विजयच्या वाटेस गेला नाहीं.

——दिवस भराभर जात नाहींत. किंवा ते रेंगाळतहि सरकत नाहींत. मनुष्य आपल्या विशिष्ट मनोभूमिकेवरून त्यांच्यावर आरोप करीत असतो. विजयला वाटलें. दिवस भराभर निघून गेले. कारण त्याच्या मनावरचें दडपण दूर झालें होतें. त्याला एक खराखुरा ‘ दोस्त ’ मिळाला होता. कोकिळगुरुजींच्या विषयीं त्याची ही भावना होती. त्यांच्या घरीं तो एकदोन दिवसांआड जरूर जायचा. अभ्यासांत कांहीं अडलें तर गुरुजी त्याला वेळांत वेळ काढून सांगत असत. सांदिपनीच्या आश्रमांत कृष्णानें लांकडाच्या मोळ्या आणून टाकल्याची पुराणांतरींची गोष्ट जुनी झाली. विजय अडल्या वेळेस मोठ्या तत्परतेनें गुरुपत्नीसाठीं धांवत जाई आणि वाण्याकडून काय मीठ–मोहऱ्या आणायच्या असतील त्या आणून देई. आपल्या आईसारखी दुसरी बाई जगांत आहे हा त्याला लागलेला शोध कांहीं कमी महत्त्वाचा नव्हता.

——त्या वर्षीं विजय परीक्षेंत पास झाला. तीनशें मुलांत त्याचा चाळीसावा नंबर आला असेल. एका विषयांत त्याला वँडेजची पट्टी मागावी लागलीच. पण त्याला वरच्या वर्गांत जातां आलें. सदू पोर्टर त्याला घरीं नेण्यासाठीं आला. सुनंदेनें त्याला रात्रीं निजण्यापूर्वी आपल्याजवळ घेतलें आणि आसपास कोणी नाहीं असें पाहून म्हटलें, “ विजय, आतां तूं शहाणा झाला आहेस. मुलांनीं मोठ्या माणसांच्या विषयीं इकडचं तिकडे कांहीं सांगूं नये हें तुला कळतं आहे. मोठ्यांच्या अडचणी मुलांनीं वाढवण्याचं पाप करूं नये.

लग्न झाल्यावर मी तुमच्या घरीं दोनतीन वेळां माहेरपणासाठीं आलें होतें. पण इकडचं कांहींहि आईला कळूं दिलं नाहीं. आईनं आपल्या पसंतीनं जें घर मुलीला पाहून दिलं तें घर तिच्या कल्पनेपेक्षां थोडं निराळं आहे हें आईला कळलं तर तिला अतिशय दुःख होईल म्हणून मीं गप्प बसलें. तुला आमच्या घरीं ठेवावा असं आई आणि अण्णा म्हणाले तेव्हां मी घाबरलें. पण त्यांना स्पष्ट नाहीं म्हणून मला म्हणतां येईना घराची अब्रू मी संभाळायची नाहीं तर कुणी? तूं आलास म्हणजे अनेक भानगडी होणार हें माझं भाकित होतं. माझं भाकित थोडंसं खरं ठरलं. पण यांतलं आईला अक्षर कळूं द्यायचं नाहीं. आईला कळलं तर आई मला फाडून खाईल—"

सुनंदेच्या गळ्याची शपथ विजयनें घेतली. आणि ती त्यानें अत्यंत काटेकोरपणानें पाळली. मुलीच्या घरीं मुलाचें चांगलें चाललें आहे या आनंदानें विजय घरीं आल्यावर त्याच्या आईनें मोठा टोलेजंग सत्यनारायण केला!

★

— ८ —

पावसाळा सुरू झाला. नव्या वर्षाला प्रारंभ झाला आणि विजयनें कोकिळगुरुजींना एकीकडे गांठून म्हटलें, "सर, मला क्रिकेट खेळण्याची फार इच्छा आहे–"

"होय का? मला सुद्धां विमान उडवण्याची फार फार इच्छा आहे. पण प्रश्न इच्छेचा नसून लायकीचा आहे––" या गुरुजींच्या उत्तरावर विजय आवेशानें म्हणाला, "मग मला एकदां शाळेच्या छोटया गटांत खेळण्याची संधि द्या. मला जर खेळतां आलं नाहीं तर मी पुन्हां विनंति करणार नाहीं––"

कोकिळांच्या विनंतीस मान देऊन क्रीडा–शिक्षकांनीं शाळेच्या छोटया गटांत विजयला एक महिनाभर खेळूं दिलें. एका मित्रत्वाच्या सामन्यामध्यें विजयला प्रवेश मिळाला. त्या मॅचमध्यें विजय अपेक्षेप्रमाणें चमकला नाहीं. एकच डाव त्यांच्या संघाला खेळायला मिळाला. अवघ्या दहा धांवांतच विजयला परतावें लागलें. पण चूक त्याची नव्हती. फलंदाजानें धांव घेण्यासाठीं त्याला पाचारण केलें आणि ऐन वेळीं त्यानें बेत बदलला. विजय परत फिरला. परंतु कित्येक यार्डानें तो धांवचीत झाला. परंतु फलंदाजींत घालवलेली अब्रू त्यानें गोलंदाजींत भरून काढली. विरुद्ध बाजूनें आघाडीच्या गोलंदाजांना दमवलें आणि टोलवा-

टोलवी चालवली. विजयच्या हातांत चेंडू आला आणि विजयनें अवघ्या ४९ धांवा देऊन चार बळी घेतले.

पुण्यांतल्या शाळांमधून दरवर्षी चढाओढीचे सामने खेळण्याची आज बऱ्याच वर्षांपासून प्रथा आहे. सर्व शाळांना जिंकणाऱ्या संघाला एक शील्ड त्या वर्षापुरतें बहाल करण्यांत येतें त्या सन्मानासाठीं मोठी चुरशीची लढत होत असते. आधीच पुण्यांतला प्रेक्षक आरडाओरडा करण्यांत नांवाजलेला, त्यांत मुलांचा दांडगा उत्साह! मग काय विचारतां? विजय छोटया गटांतून पांच सामने त्या वर्षी खेळला. शेवटचा निकाली सामना त्याच्या शाळेनें जिंकला. या सामन्यांत विजयनें पराक्रमाची शर्थ केली. सामन्याच्या पहिल्या डावांत त्यानें ६२ धांवा काढल्या आणि दुसऱ्या डावांत त्याला (नाबाद) ३७ धांवा मिळाल्या. गोलंदाजांत त्याला आतां आघाडीवरचें स्थान मिळूं लागलें. दुसऱ्या डावांत त्यानें विरुद्ध पक्षाचे आठ बळी घेतले आणि फक्त ६८ धांवा देऊन.

विजयचें नांव शाळेंत सर्वतोमुखीं झालें. सामने सप्टेंबर-अखेर संपले आणि कोकिळांनीं विजयला वेठ मारून अभ्यासाला बसवलें. प्रारंभीं विजयची थोडीशी चेष्टा करून नंतर गंभीरपणानें ते त्याला म्हणाले,—

"आतां अभ्यास. ज्या तन्मयतेनें तुम्ही मुलं क्रिकेट खेळतां ती तन्मयता अभ्यासांतहि दिसून आली पाहिजे, तरच तुमचं कौतुक. कित्येक शाळांतून अशी प्रथा आहे कीं खेळाडू मुलगा हा शाळेचा जांवई मानण्यांत यावा. म्हणजे तो अभ्यासांत मागें पडला तरी डोळे झाकून वरच्या वर्गांत त्याला प्रवेश मिळावा. कांहीं मुलांच्या दृष्टीनं ही व्यवस्था

कदाचित् चोख असेल. पण शेवटीं ती त्यांनाच नडवते, तुला काय वाटतं--? "

विजय निश्चयाच्या सुरांत म्हणाला, "मी उद्यांपासून अभ्यासाला लागणार आहें—"

"आजपासून! उद्यांचा विचार करावयाचा नाहीं हें आपलं सूत्र इतक्यांत विसरलास? घरीं सांगून ठेव. शाळा सुटल्यावर तास, दीड तास खेळ आणि नंतर इथें आमच्या घरीं तासभर अभ्यास झालाच पाहिजे."

आणि याहि बाबतींत विजयनें आपल्या गुरूचें नांव बद्दू होऊं दिलें नाहीं. दिवाळीच्या आधीं सहामाही परीक्षा झाल्या. विजयनें एकाहि विषयांत पहिला क्रमांक गांठला नाहीं हें खरें; परंतु कोणत्याहि विषयांत त्याला बँडेजची पट्टी मागावी लागली नाहीं. सहामाहीच्या परीक्षेचें निकालपत्र घेऊन या खेपेस तो एकटा घरीं गेला. सदूला धाडूं नका म्हणून त्यानें मुद्दाम अण्णांना आगाऊ कळविलें होतें. स्वतःच्या पायावर उभें राहण्यास तो शिकत होता.

दिवाळीच्या सुटीनंतर शाळेचें वातावरण पार बदलून जातें म्हणजे काय होत असतें?

सर्वत्र उत्साहाचें वातावरण पसरतें. डिसेंबरांत नाताळाची सुट्टी पडेपर्यंत संमेलनादि उत्सव गाजत असतात. संमेलनाच्या निमित्तानें प्रदर्शन, विविध गुणदर्शन, नाट्य इत्यादि अनेक विषयांत मुलांना आपल्या अंगांतील सुप्त गुण पारखून घ्यायला सांपडतात आणि इतरांच्या निदर्शनास आणून देतां येतात. शाळेचें स्नेहसंमेलन म्हणजे मुलांना आनंदाची पर्वणी, यांत तिळमात्र शंका नाहीं. दिवाळीनंतर मुलें संमेलनाकडे डोळे लावून बसतात.

विजयचें हें दुसरें स्नेहसंमेलन. गेल्या वर्षी तो संमेलनास हजरहि राहिला नव्हता. पण या वर्षी हजर तर राहयचेंच, शिवाय कशांत तरी भाग घ्यावा असें त्याच्या मनानें घेतलें. त्याच्या या निश्चयाला आणखी एक महत्त्वाचें कारण होतें. त्याच्या आईनें आणि अण्णांनीं या खेपेस त्याला वचन दिलें होतें. संमेलनास येणाऱ्या मुख्य पाहुण्याच्या हस्तें बक्षिसें वाटलीं जातात. क्रिकेटबद्दल विजयला बक्षीस मिळणार होतें. विजयची तीव्र इच्छा होती कीं आईनें त्या समारंभाला यावें. त्याच्या आईनें चटकन् कबुली दिली. अण्णांनीं रजा मागून ठेवण्याचें कबूल केलें. आईला चकित करून सोडावें या विचारानें तो भारला गेला. सुनंदाला त्यानें सल्ला विचारला. सुनंदा हंसून म्हणाली, "नाटक्या आहेस तूं. मला मान देण्यासाठींच तूं विचारीत असशील. पण मला माहीत आहे कीं तुझं आधीं कांहींतरी ठरलं असेल. क्रिकेटच्या वेळीं मला एका अक्षरानं तरी आधीं विचारलं होतंस का?—"

सुनंदेच्या पहिल्याच शब्दानें त्याला कल्पना आली.

समेलनप्रसंगीं एक नाटयप्रयोग विद्यार्थ्यांमार्फत करण्यांत येणार होता. पात्रांचीं कामें अजून ठरावयाचीं होतीं. नाटक 'आग्ऱ्याहून सुटका' हें मुक्रर झालें होतें, अर्थात् मुलांसाठीं म्हणून स्त्रीपात्रविरहित संक्षिप्त आवृत्ती मुद्दाम एका शिक्षकांकडून करून घेण्यांत आली होती. विजयनें मनांत ठरवलें पाहूं तर खरं!

मुलांच्या अभिनयाची, आवाजाची एक प्राथमिक आणि तांत्रिक कसोटी घेण्यांत आली. त्या वेळीं प्रथम विजयला घ्यावें न घ्यावें याचा निश्चित निर्णय घेतला गेला नाहीं.

मुलांच्या मानापमानाच्या कल्पना शालेय जगांत फार तीव्र स्वरूपांत दिसून येतात. एका मुलाला अपेक्षित काम मिळालें नाहीं म्हणून त्यानें नकार दिला. तें काम विजयला द्यायचें ठरलें. काम साधें होतें. पण विजयची हौस, चिकाटी आणि भूमिका समजून काम करण्याची तत्परता पाहून शिक्षकांनीं त्याला महत्त्वाचें काम म्हणजे शिवाजीचें देण्याचें ठरविलें. अंगापिंडानें विजय त्याच्या वयाच्या मानानें मोठाड असला तरी हा शिवाजी फार लहान दिसेल असें सल्लागार मंडळींचें मत पडलें. पण सल्लागार मंडळींत कोकिळगुरुजी असल्यामुळें विजयचें काम निश्चित ठरलें.

तालमींना सुरुवात झाली. विजय हळहळू शिवाजीच्या भूमिकेशीं समरस होऊं लागला.

— आणि तो दिवस उगवला. इतर दिवसांप्रमाणें तोहि दिवस होता. पण विजयला तो दिवस सोन्याचा वाटला. आज दुपारच्या गाडीनें त्याचे जन्मदाते येणार होते. आदल्याच दिवशीं त्यांचें पत्र आलें होतें. एकच क्षणभर त्याला वाटलें, आईला आणण्यासाठीं आपण सुनंदेला घेऊन स्टेशनवर जावें. पण त्याला तें शक्य नव्हतें. सकाळपासून शाळेंत त्याला जावें लागणार होतें. सकाळीं काव्यगायनाचा कार्यक्रम होता. त्यानंतर एका बोलपटगृहांत मुद्दाम शाळेनें आणविलेल्या चित्रपटाचें दर्शन होतें. नंतर शाळेंत अल्पोपाहार—आणि संध्याकाळीं पांच वाजेपर्यंत इतर करमणुकीचे कार्यक्रम ! छे: ! एक क्षणभरदेखील त्याला मोकळीक मिळणें शक्य नव्हतें. पांच वाजतां नाटकाला प्रारंभ व्हावयाचा आणि सात वाजतां मुख्य पाहुण्यांच्या हस्तें बक्षीस-समारंभ.

सकाळीं साताच्या ठोक्याला तो घरांतून बाहेर पडला. जातांना त्यानें सुनंदाला एकदां, नव्हे दहा वेळां बजावून ठेवलें. "अरे हो, बाबा! कितीदां सांगशील? आईला आणीन, अण्णांना आणीन, झालंच तर आम्ही सगळे येऊं. पण तुझ्या बक्षिसांतला अर्धा वाटा मला मिळाला पाहिजे बरं का—" म्हणून सुनंदा म्हणाली.

विजय दिवसभर शाळेंत होता. प्रत्येक कार्यक्रमास तो हजर होता. मुलांच्या चेष्टेंत हौसेनें भाग घेत होता. दात्याचा हात धरून त्याला आपल्या बरोबरीनें मिरवीत होता. अगदीं मजेनें हंसत होता, मजेनें खेळत होता.

पण त्याचें सारें लक्ष घराकडे लागलें होतें. दुपारीं दोन वाजतां गाडी स्टेशनवर येणारी होती. दोन वाजतां तर त्याची अस्वस्थता इतकी वाढली कीं दाते आश्चर्यानें त्याला म्हणाला, "भितोस काय असा—? अजून खूप अवकाश आहे नाटकाला. अन् तुझं भाषण तर झकास पाठ झालं आहे—"

विजयनें सावध होऊन त्याचा हात हलकेच दाबला!

चौकांतल्या घड्याळाचे कांटे भराभर सरकत होते. विजयला वाटलें, एकदां तरी घरीं डोकावून यावें—पण साडेतीन वाजतां त्याला रंगायला जाण्याची सूचना मिळाली. खिन्नतेची छटा लपवून तो रंगपटांत शिरला. नाट्यप्रयोगाची जबाबदारी अंगावर घेणारे शिक्षक अतिशय गोड स्वभावाचे होते. मुलांच्यांत मिसळण्याची त्यांना कधीहि शरम वाटली नाहीं. आपली शिक्षकाची भूमिका कायम ठेवून मुलांना रिझविण्याचें अजब कसब त्यांना साधलें होतें. ते स्वत: हंसत आणि मुलांनाहि हंसवीत. पण त्यांचें हास्य

ग्रंथ संग्रहालय,

दहा मुलांच्या पेक्षांहि वरताण असे. कोटी, विनोद इत्यादि भाषाभूषणें त्यांच्या जिव्हाग्रावर नाचत असत. ते स्वतः विजयला रंगवायला बसले. हीहि कला त्यांच्या अंगीं होती.

त्यांचें गंमतीचें भाषण चालू असतां विजय रंगला आणि रंगून तयार झाला. शिवाजीची दाढी तयार झाली. प्रेमाख चढविण्यांत आला. आणि त्याच्या डोक्यावर जिरेटोप चढवून त्या शिक्षकांनीं विजयला आरशासमोर उभे केलें. “ शिवाजी नाहींस असं शपथेवर कबूल कर— ” हंसत हंसत ते शिक्षक म्हणाले. कोकिळांनीं हा बालशिवाजी पाहिला—आणि त्यांनाहि आश्चर्य वाटलें. दाते तर सारखा विजयकडे टक लावून पहात उभा राहिला.

बाहेरून मुलांचा गलका मोठ्या प्रमाणांत कानांवर आदळूं लागला. अजून अर्धा तास अवकाश होता तरी सारीं मुलें नाटक पहाण्यासाठीं जागा धरून बसलीं होतीं. निमंत्रित पाहुणे मंडळी येऊं लागली. शाळेचा बँड बाहेरच्या बाजूस गर्जना करूं लागला. पहिली घंटा देण्यांत आली. धूपाचा वास सर्वत्र दरवळला. लोकांची आंत ये–जा सुरू झाली. कोणी तरी ओरडलें, “ अरे, स्वयंसेवकाला म्हणावं, आतां कुणाला सोडूं नका. ” हार आला. सरस्वतीच्या फोटोला हार घालण्यांत आला. दुसरी घंटा झाली. आवाज सुटण्या-साठीं गोळ्या आणल्या होत्या. त्या नाटक चालू होण्याच्या आंतच नटवर्गानें खाऊन टाकल्या. मुख्याध्यापक मधेंच आंत डोकावून गेले. रंगलेल्या मुलांनीं आनंदानें त्यांच्या पायावर डोकें ठेवलें. त्यांना दोन धीराच्या गोष्टी सांगून पाहुण्यांची व्यवस्था पाहण्यासाठीं ते बाहेर निघून गेले.

--आणि तिसऱ्या घंटेचा घणघणाट शांत होण्याच्या आंत पडदा वर गेला! सरदार जयसिंग तंबूंत येरझारा घालूं लागले. प्रेक्षकांनीं टाळ्यांचा कडकडाट करून आपली पसंती व्यक्त केली. आणि आपला शिवाजी विंगमध्यें उभा राहून प्रेक्षकवर्ग न्याहाळून पाहूं लागला. एखाद्या स्वारीहून परत आल्यावर तीनशें वर्षांपूर्वींच्या शिवाजीनें ज्या प्रेमानें जिजामातेकडे पाहिलें असेल त्या दृष्टीनें बालशिवाजी तिसऱ्या रांगेंत बसलेल्या आपल्या आईकडे पाहूं लागला. त्याला वाटलें, असेंच जावें आणि कडकडून मिठी मारावी आईला! पण इकडे जयसिंगाच्या भेटीला जाण्याचें महत्त्वाचें काम त्याच्याकडे होतें. चुळबूळ करीत तो जाग्यावर उभा राहिला.

शिवाजी दृष्टीस पडतांच मुलांनीं मंडप डोक्यावर घेण्याचेंच काय तें ठेवलें! समोर दिसणारा शिवाजी मुलांना एकदम पसंत होता. ही शिवाजीची चालण्याची, उभ राहण्याची ऐट त्यांना बेशक मान्य होती!

शिवाजीची आणि जिजामातेची दृष्टादृष्ट झाली. दुरून त्यांची भेट झाली. जिजामातेनें खालीं वांकून पदराच्या टोकानें डोळे कोरडे केले. शिवाजी पहिलीं दोन वाक्यें कापऱ्या आवाजांत म्हणाला. एकदां अडखळला. पण भारताचें भवितव्य खांद्यांवर घेतल्याची त्याला जाणीव झाली आणि सावध होऊन त्यानें घोडा पुढें फेंकला.

"दिल्लीच्या पातशहापुढें हा मर्द मराठा कधींहि मान वांकवणार नाहीं—" शिवाजीची ही गर्जना ऐकून लोकांनीं पसंतीच्या टाळ्या दिल्या! प्रेक्षकवर्ग शिवाजीवर निहायत खूष होता!

विजय बक्षीस घेऊन आला आणि परत येतांना दोरीला त्याचा पाय अडखळला. तें बक्षीस आणि तो दोघेंहि एकदमच आईच्या अंगावर कोसळले. विजयला आईनें पोटाशीं धरलें. विजयचें बक्षीस त्याच्या आईच्या पायाजवळ पडलें होतें—!

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

## अभ्यास

( १ ) सदू पोर्टरची मूर्ति डोळ्यांपुढें आणा. त्या मूर्तीचें सुमारें १५ ओळींत सुरेख वर्णन करा पाहूं.

( २ ) विजयचे वडील कोणतें काम करीत असत? ह्यामुळें विजयची खूप 'चंगळ' होई म्हणे. कोणती ती 'चंगळ'?

( ३ ) विजयला पुण्यास कां जावें लागलें? त्यामुळें त्याला काय वाटलें? त्याच्या आईला काय वाटलें असेल?

( ४ ) विजय पुण्याला कुणाकडे राहिला? त्या ठिकाणीं राहणें त्याला कां आवडलें नाहीं?

( ५ ) परक्या घरीं तुम्ही प्रथम गेलां तर तुम्हांला काय वाटेल?

( ६ ) विजयचे वडील ज्या स्टेशनवर असत त्या स्टेशनचें थोडक्यांत शब्दचित्र द्या.

( ७ ) सुनंदा विजयची कोण लागते? तिचा स्वभाव थोडक्यांत सांगा.

( ८ ) माईंना विजयचें आपल्या इथें राहाणें कां आवडलें नाहीं?

( ९ ) माईंनीं विजयला कसें शिस्तींत धरलें?

(१०) प्रथम विजयचें मन शाळेंतहि रमलें नाहीं. कां?

(११) दाते आणि विजय यांचें वितुष्ट कां आलें?

(१२) तुम्हीं पाहिलेल्या व खेळलेल्या एखाद्या क्रिकेट मॅचचें वर्णन करा.

(१३) पहिल्या सहामाहीनंतर विजय घरीं गेला. तेव्हां त्याची सर्व दृष्टीनें झालेली पिछेहाट पाहून त्याच्या आईला काय वाटलें असेल?

(१४) विजय पुण्याला गेल्यावर त्याचा आणि बाळूचा खटका कोणत्या मुद्यावर उडाला? त्या खटक्याचें पर्यवसान काय झालें?

(१५) कोकिळगुरुजींचें विजयकडे लक्ष वेधण्यास कोणती गोष्ट कारणीभूत झाली?

(१६) कोकिळगुरुजींचा स्वभाव तुम्हांला खास आवडेल. कां तें सांगाल का?

(१७) विजयच्या रागावर घरांतून बाहेर पडलेल्या माई परत कां आल्या? आणि परत आल्यावर त्या विजयशीं कसें वागल्या?

(१८) विजयला पुण्याला असतांना जो त्रास झाला त्याबाबत त्यानें आपल्या आईबापांना कांहीं सांगितलें का? कां?

(१९) शाळेच्या संमेलनांत मुलांचें नाटक होत असतें. कल्पना करा कीं तुम्हीं त्यांत भाग घेतला आहे आणि तुमचें नाटक पाहावयास तुमची आई समोर बसली आहे. सांगा बरं तुम्हांला काय वाटेल? तुमच्या आईला काय वाटेल? (आईला विचारून पाहा.)

(२०) 'विजयला आईनें पोटाशीं धरलें.' कां?

अनुक्रम
दिनांक
IRBK-0103394
IRBK-0103394

## सुट्टींत काय वाचाल ?

(१) माझें लहानपण.

(२) तुकारामाचा परीस.

(३) मीनाच्या गोष्टी.

(४) राधाराणी.

(५) किशोरकुंज : भाग १ आणि भाग २.

(६) मराठी नाट्यप्रवेश : भाग १ ते ५

ठाणे, ★ शाखा.
3308


मिळण्याचें ठिकाण—

आदर्श मुद्रणालय,

३९५।५ सदाशिव पेठ, पुणें २.